# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०९/ २०१८** **दिनांक २२.०८.२०१८**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- दुपारी ०३.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा बुधवार दि.२२.०८.२०१८ रोजी शिर्डी येथील संस्थानचे साईनिवास अतिथीगृहामध्ये दुपारी ०३.०० वाजता आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/२३९२/२०१८, दि.१४.०८.२०१८ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते. त्यानुसार बुधवार दि.२२.०८.२०१८ रोजी दुपारी ०३.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

०१. मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष ०२. मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष
०३. मा.ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य ०४. मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य
०५. मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य ०६. मा.सौ.योगिता अभय शेळके पाटील, सदस्या
मा.श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से.
मुख्यकार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत, समिती सदस्य मा.श्री.प्रताप सखाहारी भोसले व मा.डॉ.राजेंद्र राजाबाली सिंग यांनी दूरध्वनीद्वारे कळविले होते, याची समितीने नोंद घेऊन, त्यांना अनुपस्थित राहण्याची अनुमती दिली.

मा.डॉ. मनिषा कायंदे, सदस्य यांनी ई-मेलव्दारे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.२२ ऑगस्ट,२०१८ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. परंतू या बैठकीस मी हजर रहाणार नाही. हया संदर्भात शिवसेना सचिव श्री.अनिल देसाई व पर्यावरण मंत्री मा.श्री.रामदास कदम यांनी मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली होती व मा.मुख्यमंत्र्यांनी शिवसेनेला व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष पद देण्यास संमती दिली होती. परंतु याबाबत अजूनपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नसल्यामुळे खेद वाटत आहे. त्यामुळे या बैठकीस उपस्थित राहण्यास मला स्वारस्य नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच मा.श्री.रविंद्र गजानन मिर्लेकर,सदस्य व मा.श्री.अमोल गजानन कीर्तिकर,सदस्य हे कुठलीही पुर्वपरवानगी न घेता सभेसाठी अनुपस्थित होते.

सभेस आवश्यक गणपुर्ती नसल्यामुळे विधी व न्याय विभागाकडील दि.१३ जुलै, २०१७ रोजीचे अधिनियम दुरुस्तीतील कलम ३ (क) पोटकलम (२) मधील तरतूदीनुसार तीस मिनीटाकरीता सभेचे कामकाज तहकुब करणेत येऊन, त्यानंतर दुपारी ०३.३० वाजता सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

सभेचे सुरुवातीस भारताचे माजी पंतप्रधान कै.मा.अटलबिहारी वाजपेयी, तामिळनाडूचे माजी मुख्यमंत्री कै.मा.एम.करुनानिधी, कै.मा.खासदार गुरुदास कामत, माजी क्रिकेटपटू कै.अजित वाडेकर व केरळमधील पुरांमध्ये मृत्युमुखी पडलेल्या नागरीकांना श्रध्दांजली वाहण्यात आली.

त्यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांनी विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु केली.

---

**विषय नं.१** **दिनांक २६.०७.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.५०६** दिनांक २६.०७.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या, त्यास मान्यता देण्यात आली.

१) निर्णय क्र.४८०

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तुत प्रकरणी खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

१. ५०० रुग्णवाहिकांचा प्रकल्प मान्यतेसाठी मा.छाननी समितीचे शिफारशीने शासनाकडे फेर प्रस्ताव पाठविण्यात यावा.

२. याकामी संस्थानने पात्र सेवाभावी संस्थाना प्रत्येकी रुपये ५ लाख उपलब्ध करुन दयावेत, उर्वरीत रक्कम संबधीत संस्थेने द्यावी.

३. संबधीत संस्थेशी करारनामा करुन घेण्यात यावा.

४. रुग्णवाहीकेसाठी महिंद्रा ॲन्ड महिंद्रा कंपनीचे BS –VI हे मॉडेल निश्चित करणेत यावे.

५. प्रत्येक रुग्णवाहीकेस GPS System बसवुन घेण्यात यावी.

६. रुग्णवाहीकेच्या नोंदणी व विम्याची जबाबदारी संबधीत संस्थेची राहील.

७. रुग्णवाहीकेवर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांचे सौजन्याने ‘श्री साई शताब्दी रुग्णवाहीका’ असे नमुद करण्यात यावे.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक,वाहन विभाग)

**याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तुत प्रकरणी खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

**१. ५०० रुग्णवाहिकांचा प्रकल्प मान्यतेसाठी मा.छाननी समितीचे शिफारशीने शासनाकडे फेर प्रस्ताव पाठविण्यात यावा.**

**२. याकामी संस्थानने पात्र सेवाभावी संस्थाना प्रत्येकी रुपये ५ लाख उपलब्ध करुन दयावेत, उर्वरीत रक्कम संबधीत संस्थेने द्यावी.**

**३. संबधीत संस्थेशी करारनामा करुन घेण्यात यावा.**

**४. रुग्णवाहीकेसाठी महिंद्रा ॲन्ड महिंद्रा कंपनीचे बोलेरो BS –IV हे मॉडेल निश्चित करणेत यावे.**

**५. प्रत्येक रुग्णवाहीकेस GPS System बसवुन घेण्यात यावी.**

**६. रुग्णवाहीकेच्या नोंदणी व विम्याची जबाबदारी संबधीत संस्थेची राहील.**

**७. रुग्णवाहीकेवर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांचे सौजन्याने ‘श्री साई शताब्दी रुग्णवाहीका’ असे नमुद करण्यात यावे.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक,वाहन विभाग)**

---

२) निर्णय क्र.४९८-

उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात आली, संस्थानचे या प्रकल्पाचे सल्लागार आर्कीटेक्ट श्री.उदय कापरे यांचे यावेळी समक्ष अभिप्राय घेण्यात आले. उपरोक्त कामाची निवीदा प्रथम दि.१५.०३.२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली असुन तिची मुदत दि.१७.०४.२०१७ पर्यंत होती. यास प्रथम दि.२५.०४.२०१८ व दुसऱ्यांदा दि.१०.०५.२०१८ अखेर मुदतवाढ देण्यात आली होती. या निविदा प्रक्रियेत एकच निविदाधारक पात्र झाल्याने दुसऱ्यांदा नव्याने दि.२५.०५.२०१८ रोजी फेर ई-निविदा प्रसिध्द केली होती. तीचा कालावधी दि.२७.०६.२०१८ अखेर होता. यास प्रथम दि.३०.०६.२०१८ अखेर व दुसऱ्यांदा दि.०६.०७.२०१८ अखेर मुदतवाढ देण्यात आली होती. या निविदा प्रक्रियेत चार निविदा प्राप्त झाल्या असून त्यापैकी दोन निविदाधारक तांत्रिक छाननीमध्ये पात्र ठरलेले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाचे दि.१२.०४.२०१७ रोजीचे शासन निर्णयातील कलम ३(१) नुसार एखादया कामाची तातडीची निकड लक्षात घेता ई- निविदा प्रक्रियेच्या पहिल्या मागणीमध्ये जरी दोन निविदा तांत्रिक छाननीमध्ये पात्र झाल्यास त्यांचे वाणिज्यीक देकार उघडण्याची तरतुद आहे. श्री साईबाबा मंदिर दर्शन रांग प्रकल्पाचे बांधकाम जुने प्रसादालय परिसरात नियोजन असून त्या ठिकाणी असणाऱ्या साईप्रसाद १ व २ या इमारती डिसेंबर-२०१७ मध्ये संपुर्ण पाडण्यात आलेल्या आहेत. या इमारतीमध्ये साईभक्तांकरीता बायोमेट्रीक पास काउंटर्स, जनसंपर्क कार्यालय, पेड पास् काऊटर, लाडु काऊंटर्स, मोबाईल व चप्पल लॉकर्स, चौकशी व निवासस्थान कार्यालय इ.व्यवस्था कार्यरत होती. सदर इमारत पाडण्यात आल्यामुळे संस्थानला वर नमूद सर्व व्यवस्था तात्पुरत्या स्वरुपात इतरत्र हलवाव्या लागल्या आहेत. तसेच आता उत्सवांचे कालावधीत सदर ठिकाणी मंडप टाकून दर्शन रांगेची तात्पुरती व्यवस्था करण्यात येत आहे.

त्यामुळे नवीन दर्शन रांग प्रकल्पाचे बांधकाम हे तातडीने पुर्ण करणे गरजेचे असल्याने प्रस्तावात प्राप्त होणाऱ्या दोन ठेकेदाराचे वाणिज्यीक देकार उघडण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामध्ये भानु कंन्स्ट्रक्शन, मुंबई यांचे रक्कम रु.१०९,६०,४९,८७५/- मात्र हे दर निम्नतम असुन ते आजचे सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. समितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी चर्चेअंती रक्कम रुपये १०९ कोटी मात्र दर देऊ केले.

प्रस्तुत प्रकरणी शासनाने रक्कम रु.११२,४०,९९,०५९/- मात्र इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता दिलेली असुन प्राप्त झालेल्या निम्नतम निविदाधारक यांची वाटाघाटी नंतर देकार रक्कम रु.१०९ कोटी इतकी असुन प्रशासकीय मान्यतेपेक्षा ३% कमी आहे. त्यामुळे श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शन रांग इमारत बांधकामाकरीता निम्नतम निविदाधारक भानु कंन्स्ट्रक्शन, मुंबई यांनी चर्चेअंती देऊ केलेले रक्कम रुपये १०९ कोटी मात्र अंतिम दर स्विकारणेत येऊन, त्यांना तातडीने कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही-कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)

या ऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.

उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात आली, संस्थानचे या प्रकल्पाचे सल्लागार आर्कीटेक्ट श्री.उदय कापरे यांचे यावेळी समक्ष अभिप्राय घेण्यात आले. उपरोक्त कामाची निवीदा प्रथम दि.१५.०३.२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली असुन तिची मुदत दि.१७.०४.२०१७ पर्यंत होती. यास प्रथम दि.२५.०४.२०१८ व दुसऱ्यांदा दि.१०.०५.२०१८ अखेर मुदतवाढ देण्यात आली होती. या निविदा प्रक्रियेत एकच निविदाधारक पात्र झाल्याने दुसऱ्यांदा नव्याने दि.२५.०५.२०१८ रोजी फेर ई-निविदा प्रसिध्द केली होती. तीचा कालावधी दि.२७.०६.२०१८ अखेर होता. यास प्रथम दि.३०.०६.२०१८ अखेर व दुसऱ्यांदा दि.०६.०७.२०१८ अखेर मुदतवाढ देण्यात आली होती. या निविदा प्रक्रियेत चार निविदा प्राप्त झाल्या असून त्यापैकी दोन निविदाधारक तांत्रिक छाननीमध्ये पात्र ठरलेले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाचे दि.१९.०९.२०१७ रोजीचे शासन परिपत्रकातील कलम ३(१) नुसार एखादया कामाची तातडीची निकड लक्षात घेता ई- निविदा प्रक्रियेच्या पहिल्या मागणीमध्ये जरी दोन निविदा तांत्रिक छाननीमध्ये पात्र झाल्यास त्यांचे वाणिज्यीक देकार उघडण्याची तरतुद आहे. श्री साईबाबा मंदिर दर्शन रांग प्रकल्पाचे बांधकाम जुने प्रसादालय परिसरात नियोजन असून त्या ठिकाणी असणाऱ्या साईप्रसाद १ व २ या इमारती डिसेंबर-२०१७ मध्ये संपुर्ण पाडण्यात आलेल्या आहेत. या इमारतीमध्ये साईभक्तांकरीता बायोमेट्रीक पास काउंटर्स, जनसंपर्क कार्यालय, पेड पास् काऊटर, लाडु काऊंटर्स, मोबाईल व चप्पल लॉकर्स, चौकशी व निवासस्थान कार्यालय इ.व्यवस्था कार्यरत होती. सदर इमारत पाडण्यात आल्यामुळे संस्थानला वर नमूद सर्व व्यवस्था तात्पुरत्या स्वरुपात इतरत्र हलवाव्या लागल्या आहेत. तसेच आता उत्सवांचे कालावधीत सदर ठिकाणी मंडप टाकून दर्शन रांगेची तात्पुरती व्यवस्था करण्यात येत आहे.

त्यामुळे नवीन दर्शन रांग प्रकल्पाचे बांधकाम हे तातडीने पुर्ण करणे गरजेचे असल्याने प्रस्तावात प्राप्त होणाऱ्या दोन ठेकेदाराचे वाणिज्यीक देकार उघडण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामध्ये भानु कंन्स्ट्रक्शन, मुंबई यांचे रक्कम रु.१०९,६०,४९,८७५/- मात्र हे दर निम्नतम असुन ते आजचे सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. समितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी चर्चेअंती रक्कम रुपये १०९.५० कोटी मात्र दर देऊ केले.

प्रस्तुत प्रकरणी शासनाने रक्कम रु.११२,४०,९९,०५९/- मात्र इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता दिलेली असुन प्राप्त झालेल्या निम्नतम निविदाधारक यांची वाटाघाटी नंतर देकार रक्कम रु.१०९.५० कोटी इतकी असुन प्रशासकीय मान्यतेपेक्षा ३% कमी आहे. त्यामुळे श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शन रांग इमारत बांधकामाकरीता निम्नतम निविदाधारक भानु कंन्स्ट्रक्शन, मुंबई यांनी चर्चेअंती देऊ केलेले रक्कम रुपये १०९.५० कोटी मात्र अंतिम दर स्विकारणेत येऊन, त्यांना तातडीने कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही-कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)

---

विषय नं.२ दिनांक ३०.०७.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

निर्णय क्र.५०७ दिनांक ३०.०७.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

१ श्री साईसच्चरित पारायण सोहळयाचे आयोजनासाठी जागेची निश्चीती करणेबाबत.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

४) अधिनियमाचे कलम१७.(२) ठ-श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्याउपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

शासन निर्णयः- महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र. सासंवि २०१३/ प्र.क्र.०१/ का.१६ दि.२२/१०/२०१३ अन्वये मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखालील कृती आराखडा समितीने श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाकरीता रु.३,०२३.१७ कोटी इतक्या रकमेच्या कृती आराखड्यास दि.३१/०३/२०१७ रोजी मान्यता दिली आहे. सदर आराखडयात संस्थानचे प्रथम व व्दितीय प्राधान्य गटात असे एकुण रु.१,८२८.३१ कोटी इतक्या रकमेचे प्रकल्प प्रस्तावीत असून वरीलपैकी व्दितीय प्राधान्य गटातील रु.१,२५२.८५ कोटी निधीची मागणी करणारा प्रस्ताव केंद्र शासनास सादर करणेत आला आहे. तसेच प्रथम प्राधान्य गटातील अ.नं. १२ मध्ये विविध धार्मिकव सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजनासाठी रु.२५ कोटी मात्र अंदाजित खर्चास मान्यता मिळालेली असून, पारायण तसेच विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनानिमित्त ७० दिवसांकरीता मंडप टाकून त्यात अनुषंगिक व्यवस्था पुरविणे तसेच श्री साईचरित्र महापारायणाकरीता एकाचवेळी ५० हजार साईभक्त सामावू शकतील असे नियोजन करणे, असे नमुद केले आहे.

मा. व्यवस्थापन समिती सभा निर्णयः-

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १७१.

"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्ताने दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.३१ ऑक्टोबर, २०१७ अखेर ३८६ दिवस दररोज साईभक्तांसाठी धार्मिक, सामाजिक, साईबाबांची शिकवण, सेवाभाव दर्शविणा-या भव्य स्वरूपाच्या कार्यक्रमांचे आयोजन करणेत यावे",

२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/०६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ४४१/९.

श्री साईचरित्र पारायण सोहळा दि.१६/०८/२०१८ ते दि. २३/०८/२०१८ या कालावधीत आयोजित करणेत यावा. श्री साईचरित्र पारायण सोहळा श्री साई प्रसादालयासमोरील श्री शिवाजी गोंदकर यांचे जागेत करणेत यावा.

प्रस्तावनाः- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी हे नाट्यरसिक संचाचे सहकार्याने गेली २३ वर्षे श्री साई सच्चरित पारायण सोहळा साजरा करीत आलेले आहे. श्री साईबाबा समाधी महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने यावर्षी महापारायण सोहळा साजरा करण्याचा मानस असल्याने श्री.आप्पासाहेब खंडू कोते, अध्यक्ष, नाटयरसिक संच ,शिर्डी यांनी यापुर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी सो. यांना अग्रेषित केलेल्या दि.०९/०४/२०१८ रोजीचे पत्रांमध्ये दरवर्षी श्री साईचरीत्र पारायण सोहळयासाठी पुरुष व महिला मिळून अंदाजे ६००० पारायणार्थी बसतात. यंदा महापारायण सोहळा आयोजित करावयाचा असल्याने यावर्षीचे पारायणाचे नियोजन श्री शिवाजी गोंदकर, शिर्डी यांचे श्री साई प्रसादालयासमोरील सर्व्हे नं. १६४/०९ मधील जागेत करावे. सदर जागेचे एकूण क्षेत्रफळ ५५ गुंठे असून त्याची लांबी ९०० फुट तर रुंदी ३०० फुट आहे. याशिवाय आवश्यकता वाटल्यास श्री गोंदकर यांचे शेजारील जागा – प्लॉट रिकामा करुन देण्यास तयार आहेत. तरी यावर्षीचे श्री साई सतचरित्र पारायण सोहळयाचे नियोजन दि.१६/०८/२०१८ ते दि.२३/०८/२०१८ या कालावधीत श्री शिवाजी गोंदकर, शिर्डी यांचे जागेत करुन तेथे मंडप व इतर अनुषंगिक सर्व सुविधा उपलब्ध करुन द्याव्यातहि विनंती, असे कळविले होते.

त्यानुसार मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/०६/२०१८ रोजीचे सभेत सविस्तर प्रस्ताव सादर करणेत आला त्यावर निर्णय क्रं.४४१/९ अन्वये -------------- श्री साईचरित्र पारायण सोहळा श्री साई प्रसादालयासमोरील श्री शिवाजी गोंदकर यांचे जागेत करणेत यावा असे ठरलेले आहे.

आता श्री तुकाराम शंकरराव गोंदकर, अध्यक्ष, योगीराजश्री गंगागिरिजी महाराज १७१ वा अखंड हरिनाम सप्ताह समिती शिर्डी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांना अग्रेषित केलेल्या दि.१३/०७/२०१८ रोजीच्या पत्राव्दारे,"आम्ही यापुर्वी आपणास श्री साईचरित्र पारायण सोहळयासाठी प्रसादालयासमोरील श्री शिवाजी अमृतराव गोंदकर व शेळके कुटूंबियांची जागा निश्चित केली होती. परंतु प्रसादालयासमोर होणारी गर्दी लक्षात घेता सदर पारायण त्या जागेवर न करता श्री रमेश भाऊसाहेब गोंदकर व इतर यांची प्रसादालयासमोरील पश्चिम बाजूला असलेली जागा निश्चित करीत आहोत असे नमूद करुन गोंदकर बंधूनी हि जागा या वर्षी श्री साईचरित्र पारायणाकरीता विनामोबदला दिली आहे, असे कळविलेले आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी वनाटय रसिक संच तसेच शिर्डी गामस्थ यांचे संयुक्त विद्यमाने सन १९९५ पासून म्हणजेच गेल्या २३ वर्षापासून दरवर्षी श्रावण शु.१ ते श्रावण शु.८/९ या तिथीत

सामुदायिक श्री साईसच्चरित पारायण सोहळयाचे मंदिर परिसरात व आता १६ गुंठे जागेत (आताचा श्री साईबाबा समाधी शताब्दी मंडप) आयोजन करण्यात येत होते. यावर्षी शताब्दी महोत्सवी वर्षाचे निमित्ताने पारायणार्थींची संख्या सुमारे २० हजार पर्यंत जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सन २०१७ मधील साईचरित्र पारायण सोहळयासाठी सुमारे ६००० पारायणार्थी पारायणासाठी बसले होते व या सोहळयाचे आयोजन श्री साईबाबा समाधी शताब्दी मंडपात आयोजित केले होते आणि यासाठी सुमारे रु.१२,७२,२९८.०० मात्र इतका प्रत्यक्ष खर्च झालेला आहे. तथापि या वर्षी समाधी शताब्दी वर्ष असल्याने पारायणार्थींची संख्या वाढण्याची शक्यता असल्याने पारायणाची जागा निश्चित करणे आवश्यक असल्याने श्री साई चरित्र पारायण सोहळयाचे आयोजनाबाबतच्या सर्वसमावेशक बाबींवर निर्णय होणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०२/०५/२०१८ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आला होता.

त्यावर निर्णय क्रं. २९१ अन्वये, “श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षात दरवर्षी प्रमाणे माहे ऑगष्ट मध्ये श्री साईचरीत्र पारायण सोहळयाचे आयोजन करणे व त्याबाबतच्या अनुषंगिक सुविधा उभारणेकामी मा.श्री.चंद्रशेखर कदम, उपाध्यक्ष, मा. श्री. भाऊसाहेब वाकचौरे, सदस्य व मा. श्री. बिपीनदादा कोल्हे, सदस्य यांनी ग्रामस्थांशी चर्चा करुन पारायणाच्या तारखा व स्थळ याबाबत अंतिम निर्णय घ्यावा, असे ठरले आहे.”

तसेच मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांनी श्री साई चरित्र पारायण सोहळयाचे आयोजनासाठी जूने प्रसादालय परिसराची जागा योग्य असलेबाबत निर्देश दिले आहेत.

आता अखंड हरिनाम सप्ताह समितीने प्रसादालयासमोर होणारी गर्दी लक्षात घेता सदर पारायण त्या जागेवर न करता श्री रमेश भाऊसाहेब गोंदकर व इतर यांची प्रसादालयासमोरील पश्चिम बाजूला असलेली जागा सूचविलेली आहे.

याबाबत बांधकाम विभागास सदर जागेची पाहणी करुन सदर ठिकाणी पारायण सोहळयाचे आयोजन करता येईल किंवा कसे याबाबतचा अहवाल सादर करणेबाबत दि.१३/०७/२०१८ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

बांधकाम विभागाने दि.१६/०७/२०१८ रोजीचे पत्रान्वये श्री रमेश गोंदकर, शिर्डी व इतर यांचे जागेत पारायण सोहळयाचे आयोजन करावयाचे झाल्यास

१) दि. १६/०८/२०१८ ते दि. २३/०८/२०१८ या कालावधीत योगिराज गंगागिरी महाराज यांचे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन श्री साई प्रसादालयाजवळील मौजे निमगांव को-हाळे शिवारातील शेती महामंडळाचे जागेत करणेत येणार आहे. सदर कालावधीतच श्री साईचरित्र पारायण सोहळा असल्याने श्री साई प्रसादालय समोरील श्री रमेश गोंदकर व इतर यांचे जागेमध्ये आयोजन केल्यास दोन्ही कार्यक्रमासाठी भाविक मोठया प्रमाणात येणार असल्याने त्यांची एकाच ठिकाणी गर्दी होईल व ते नियोजनाचे दृष्टीने जिकरीचे होईल,

२) श्री साईप्रसादालय समोरील श्री गोंदकर यांची जागा शिर्डी शहराच्या नाल्या नजिकची आहे. जादा प्रमाणात पाऊस झाल्यास या क्षेत्रात पावसाचे पाणी साचण्याची शक्यता नाकारता येत नाही.

३) सदरहू क्षेत्रामध्ये पारायण करावयाचे झाल्यास तेथिल शेतामध्ये कडूनिंबाचे एकूण १३ मोठे उंच झाडे आहेत. त्यामुळे सदरहू ठिकाणी मंडप उभारणीस अडचण होणार आहे. त्याबाबत उपाययोजना करावी लागणार आहे.

४) सदरहू क्षेत्रामध्ये जवळपास अर्ध्या भागात मुरुम टाकून जागेच्या सपाटीकरणासह रोलींग करावी लागेल.

५) सदरहू क्षेत्राच्या दक्षिणेस असलेल्या शिर्डी शहराच्या नाल्यावर भाविकांना येण्या-जाण्यासाठी कच्चा पुल तयार केलेला आहे. सदरहु पुलाची आरसीसी पाईप टाकून रुंदी वाढवावी लागेल.

६) ११ ते १२ हजार पारायणार्थी यांची पार्कींग व्यवस्था तसेच टॉयलेट –बाथरुमची व्यवस्था स्वतंत्र करावी लागेल. असे नमूद केले आहे.

विभागाचा अभिप्रायः- श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षात दरवर्षीप्रमाणे आयोजित करावयाच्या पारायण सोहळयासाठी पारायणार्थींची संख्या लक्षात घेता अखंड हरिनाम सप्ताह समितीने सूचविलेल्या खाजगी जागेची निश्चिती करणेपुर्वी बांधकाम विभागाने सदरहू क्षेत्रामध्ये पारायण करावयाचे झाल्यास तेथील शेतामध्ये असलेल्या १३ मोठया कडूनिंबाच्या झाडामुळे मंडप उभारणीस अडचण होणार आहे. तसेच सदरहू क्षेत्रातील जवळपास अर्ध्या भागात मुरुम टाकून जागेच्या सपाटीकरणासह रोलींग करावे लागेल. त्यामुळे संस्थानला अशा खाजगी जागेचा विकास करणेसाठी शासनाची पुर्वपरवानगी घ्यावी लागेल. तरी सप्ताह समितीने आता सूचविलेल्या जागेत पारायण आयोजन करणे उचित ठरणार नाही, असे मत आहे.

प्रस्तावः- श्री साईसच्चरित पारायण सोहळयाचे आयोजन अखंड हरिनाम सप्ताह समितीने सूचविलेल्या श्री रमेश भाऊसाहेब गोंदकर व इतर यांचे श्री साईप्रसादालयासमोरील जागेत करावे किंवा संस्थानचे जूने प्रसादालय परिसरात आयोजित करावे किंवा संस्थानचे साईनगर पाठीमागील नव्याने अतिक्रमण काढलेल्या जागेवर करावे.

निर्णयार्थ सविनय सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.रमेश भाऊसाहेब गोंदकर हे सदर जागेतील झाडे तोडून देणार आहेत, तसेच मुरुम टाकुण देणार आहेत. त्यामुळे दि. १६/०८/२०१८ ते दि. २३/०८/२०१८ या कालावधीत श्री साईसच्चरित पारायण सोहळयाचे आयोजन श्री साई प्रसादालयासमोरील श्री.रमेश भाऊसाहेब गोंदकर व इतर यांचे जागेत करुन तेथे मंडप व इतर अनुशंगीक सर्व सुविधा उपलब्ध करुन देणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात यावी तसेच सदरची कार्यवाही तातडीने करण्यात यावी, अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- शताब्दी कक्ष प्रमुख)**

---

२ **श्री साईसच्चरित पारायण कालावधीत ग्रामस्थांनी सुचविलेले कार्यक्रम निश्चित करणेस व मानधन ठरविणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे. व कलम २१ मधील पोट कलम १(ड) श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

मा. व्यवस्थापन समिती ठरावः- मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/०६/२०१८ रोजीचे सभेत निर्णय क्र.४४१/९ खालीलप्रमाणे पारित करण्यात आलेला आहे.

-------------श्री साईसच्चरित पारायण सोहळा दि.१६.०८.२०१८ ते दि.२३.०८.२०१८ या कालावधीत आयोजित करण्यात यावा. श्री साईचरित्र पारायण कालावधीत आयोजित कार्यक्रमासाठी येणा-या निमंत्रीत कलाकार, कीर्तनकार,प्रवचनकार यांचे निवास व दर्शन व्यवस्था करावी. श्री साईचरित्र पारायण निमंत्रण पत्रिका,मिरवणूक,फुल सजावट,प्रासंगिक कर्मचारी, नाष्टा,चहा पाणी व वाहतूक खर्च इ. बाबींसाठी सुमारे रक्कम रु.३५,००,०००/- खर्चास मान्यता देण्यात आली. समाधी शताब्दी वर्ष असल्याने श्री साईचरित्र पारायण कालावधीत कलाकारांना द्यावयाचे मानधनात यावर्षी रु. १० लक्ष पर्यंत वाढ करण्याची मागणी नाट्य रसिक संच व ग्रामस्थ यांनी केली. याबाबत नाट्य रसिक संच व ग्रामस्थ यांनी सविस्तर माहितीसह प्रस्ताव दि.३०.०६.२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेपूर्वी सादर करावा व कलाकार कार्यक्रमासाठी द्यावयाच्या मानधनाबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

प्रस्तावनाः- श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर २०१८ रोजी (विजयादशमी) १०० वर्षे पूर्ण होत आहेत. श्री साईबाबा संस्थानच्यावतीने दि.०१ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ हा कालावधी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष म्हणून साजरा करण्यात येत आहे. यासाठी शताब्दीचे संपूर्ण वर्षभरात वेगवेगळया धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक व प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. जेणेकरुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल यादृष्टीने कामकाज चालू आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे सौजन्याने व शिर्डी ग्रामस्थ तसेच नाट्यरचिक संच, शिर्डी यांचे सहकार्याने २४ वा साईसच्चरित पारायण सोहळा साजरा करण्यात येणार आहे. सदर पारायण सोहळयात करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी दि.२५.०६.२०१८ रोजीचे स्थानिक उपसमितीचे सभेत

ठरल्याप्रमाणे शिर्डी ग्रामस्थ ( अखंड हरिनाम समिती व नाटय रसिक संच,शिर्डी ) यांनी दि.१६.०७.२०१८ चे पत्रान्वये साईसच्चरित पारायण कालावधीत आयोजित करावयाचे सांस्कृतिक कार्यक्रम व त्यांचे मानधन कळविलेले आहे त्याची यादी खालीलप्रमाणे.

| अ.नं. | दिनांक व वेळ | कलाकाराचे नांव | ठिकाण | संपर्क | कार्यक्रम | कलाकार संख्या | मानधन रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | गुरुवार, दि. १६.०८.२०१८ सायं.४ ते ६ | श्रीराम महिला भजन मंडळ | गोवा | ७८८८२३५२२९ | भावगीत,भक्तीगीतां चा अनमोल ठेवा | १६ | २१,०००/- |
| | रात्रौ ७.३० ते १० | रविराज नासेरी | मुंबई | ९८९२३०६१७३ | साई भजन संध्या | १२ | ८०,०००/- |
| ०२ | शुक्रवार दि.१७.०८.२०१८ सायं.४ ते ६ | प्राथमिक विदया मंदिर | शिर्डी | ०२४२३-२५५०८६ | सांस्कृतिक कार्यक्रम | १५० | विनामूल्य |
| | सायं.६ ते ७ | पारायणार्थी महिला मंडळ | शिर्डी | - | हळदीकुंकू | - | - |
| | रात्रौ ७.३० ते १० | श्री प्रसाद कांबळी | मुंबई | ९८२१६५४१८९ | धार्मिक - नाटक-देवबाभळी | २५ | १,५००००/- |
| ०३ | शनिवार दि.१८.०८.२०१८ सायं.४ ते ६ | कुडाळेश्वर मित्रमंडळ, | कुडाळ | ९८२००४११८२ | नाटक-दशावतारी | ४० | ५५,०००/- |
| | रात्रौ ७.३० ते १० | श्री मनहर उधास, | मुंबई | ९८२१०७७५५१ | साई भजन | १५ | विनामुल्य |
| ०४ | रविवार दि.१९.०८.२०१८ सायं.४ ते ६ | स्वर निनाद वाद्यवृद वसंतराव आजगांवकर | मुंबई | ९८७०९८६६३२ | नाद विठ्ठल विठ्ठल | १५ | ५०,०००/- |
| | रात्रौ ७.३० ते १० | नक्षत्र वादय वृंद | मुंबई | ९८७०९८६६३२ | महाराष्ट्र उत्सव | २५ | ८०,०००/- |
| ०५ | सोमवार दि.२०.०८.२०१८ सायं.४ ते ६ | शरद उपाध्ये | मुंबई | ९२२३३०३१२५ | राशी चक्र | ०४ | ९५,०००/- |
| | रात्रौ ७.३० ते १० | श्री प्रमोद पवार | मुंबई | ९८६९०२४७४७ | सामाजिक नाटक-अनन्या | २० | १,०१,०००/- |
| ०६ | मंगळवार दि २१.०८.२०१८ सायं.४ ते ६ | नरेंद्र नाशिरकर | नागपूर | ९८५०३५२१३० ९५१८९७६९२५ | संगीतमय साई विचार कथा | ०४ | ५,०००/- |
| | रात्रौ ७.३० ते १० | कलापिनि कोमाकली कुमार गंधर्व संगीत अकॅडमी | देवास (म.प्र.) | ९८२६०८००४९ ७०५९५८००४९ | भजन व अभंग | १० | ५०,०००/- |
| ०७ | बुधवार दि.२२.०८.२०१८ सायं.४ ते ६ | हरिश ग्वाला | मुंबई | ९८६७४९१४९९ | भजन | ०८ | ४५०००/- |
| | रात्रौ ७ .३०ते १० | सुनिल सरगम, राहुल गुप्ता | दिल्ली | ९२१२७३५१५० | श्रीकृष्ण रासलिला व शंकर भगवान तांडव नृत्य | ३० | ५०,०००/- |
| | | | | | | **एकूण रु.** | **७,८२,०००/-** |

उपरोक्त कलाकार ऐनवेळेस उपलब्ध न झाल्यास, खालीलप्रमाणे पर्यायी कलाकारांच्या कार्यक्रमाचे नियोजन करता येईल.

**पर्यायी कार्यक्रम**

| अ.नं. | कलाकाराचे नांव | ठिकाण | संपर्क | कार्यक्रम | कलाकार संख्या | मानधन रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | अजय मोरे | ठाणे | ९८१९८७२३६४ | साई स्वरानंद | १८ | १४,०००/- |
| ०२ | विनित कुमार शर्मा | चंदीगड | ९०२३०७०३८२ | श्री साईबाबांचाजीवनावर लाईट ॲन्ड साऊंड शो | ५० | ५०,०००/- |
| ०३ | दिलीप शडंगी | छत्तीसगड | ७३५४४५४४४४ | हिंदी साईभजन | २५ | ३०,०००/- |
| ०४ | अनंत पांचाळ | मुंबई | ९९३०१२६३२७ | हिंदी साईभजन | १५ | ३०,०००/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ०५ | प्रा. चंदन परांजपे | मुंबई | ९५८८४३०९५० | शब्द सुरांच्या हिंदोळयावर – भक्तीगित, भावगीत | १५ | ३०,०००/- |
| ०६ | सच्चिदानंद आप्पा | मुंबई | ९८२०१४८६७८ | साईभजन संध्या | १० | -- |

विभागाचा अभिप्राय:- श्री साईसच्चरित पारायण सोहळा २०१७ मध्ये आयोजित केलेल्या कलाकार कार्यक्रमासाठी रक्कम रु.१,५६,०००/- इतके मानधन आदा करण्यात आलेले आहे. श्री साईबाबा समाधी महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने यावर्षी महापारायण सोहळा साजरा करण्याचा मानस असल्याने कलाकार मानधनासाठी यावर्षी रक्कम रु.१० लाख मात्र इतकी तरतुद करण्यात आलेली आहे.

श्री साईसच्चरित पारायण सोहळा आयोजित करणेसाठी जागेच्या निश्चितीबाबत मा.व्यवस्थापन समितीसमोर पुनः प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. त्यामुळे श्री साईसच्चरित पारायण सोहळ्याची जागा अजुनपर्यंत निश्चित झालेली नाही. तथापि अखंड हरिनाम सप्ताह व श्री साईसच्चरित पारायण सोहळा या दोन्ही कार्यक्रमांचा कालावधी एकच आहे. अखंड हरिनाम सप्ताहात दररोज सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत प्रवचन, कीर्तनाचे कार्यक्रम आयोजित केलेले असतात. त्यामुळे साईसच्चरित पारायणाचे ठिकाणी उपरोक्त प्रस्तावात नमुद ०४ ते ०६ या वेळेत आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी भक्तांची फारशी गर्दी होणार नाही, त्यामुळे ०४ ते ०६ यावेळेत कार्यक्रम आयोजीत करावे किंवा कसे याबाबत विचार व्हावा परंतु रात्री ७.३० ते ९.३० या वेळेत उपरोक्त पत्रात नमुद केलेल्या कार्यक्रमांचे आयोजन करणेस हरकत नाही असे मत आहे.

प्रस्ताव – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी ग्रामस्थ व नाट्यरसिक संच यांचे संयुक्त विद्यमाने गेली २३ वर्षे श्री साईसच्चरित पारायण सोहळा आयोजित करण्यात आलेला आहे. श्री साईबाबा समाधी महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने यावर्षी महापारायण सोहळा साजरा करण्याचा मानस असल्याने शिर्डी ग्रामस्थ व नाट्यरसिक संच यांनी दि.२५.०६.२०१८ चे स्थानिक उपसमितीचे सभेत ठरलेप्रमाणे उपरोक्तप्रमाणे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणेबाबत सुचित केले आहे. मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०.०६.२०१८ रोजीचे सभेत श्री साईसच्चरित पारायण सोहळ्यात आयोजित करावयाच्या कलाकार कार्यक्रमासाठी मानधन म्हणून रक्कम रु.१० लाख मात्र इतक्या तरतुदीस मान्यता दिलेली आहे.

तरी याकामी खालील बाबींवर विचार विनिमय होवून धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे.

१) शिर्डी ग्रामस्थ (अखंड हरिनाम समिती व नाटय रसिक संच,शिर्डी ) यांनी उपरोक्त प्रस्तावनेत नमुद केलेल्या कलाकारांचे कार्यक्रम आयोजित करणेबाबत.

२) उपरोक्त नमुद कार्यक्रमासाठी रक्कम रु. ७,८२,०००/- मात्र इतके मानधन आदा करणेबाबत.

३) अखंड हरिनाम सप्ताहात दररोज सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० या वेळेत प्रवचन,कीर्तन यासारखे धार्मिक कार्यक्रम आयोजित केलेले असतात त्यामुळे साईचरित्र पारायणाचे ठिकाणी दुपारी ४.०० ते ६.०० यावेळेत धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे ठिकाणी भक्तांची फारशी गर्दी होणार नाही त्यामुळे दुपारी ४.०० ते ६.०० यावेळेत कार्यक्रमाचे आयोजन करावे किंवा कसे याबाबत निर्णय घेणे.

४) साईचरित्र पारायणाचे ठिकाणी रात्री ७.३० ते ९.३० या वेळेत उपरोक्त नमुद कार्यक्रमाचे आयोजन करणेबाबत.

तरी उपरोक्त बाबींवर निर्णय होणेस सविनय सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे साईचरित्र पारायणाचे ठिकाणी शिर्डी ग्रामस्थ (अखंड हरिनाम समिती व नाटय रसिक संच,शिर्डी ) यांनी प्रस्तावीत केल्याप्रमाणे कलाकारांचे पुढील कार्यक्रम आयोजीत करणेस व सदर कार्यक्रमासाठी रक्कम रु.७,८२,०००/-मात्र इतके मानधन म्हणून देण्यात यावे, अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

| अ.नं. | दिनांक व वेळ | कलाकाराचे नांव | ठिकाण | संपर्क | कार्यक्रम | कलाकार संख्या | मानधन रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | गुरुवार, दि. १६.०८.२०१८ सायं.४ ते ६ | श्रीराम महिला भजन मंडळ | गोवा | ७८८८२३५२२९ | भावगीत,भक्तीगीतां चा अनमोल ठेवा | १६ | २१,०००/- |
| | रात्रौ ७.३० ते १० | रविराज नासेरी | मुंबई | ९८९२३०६१७३ | साई भजन संध्या | १२ | ८०,०००/- |
| ०२ | शुक्रवार दि.१७.०८.२०१८ सायं.४ ते ६ | प्राथमिक विदया मंदिर | शिर्डी | ०२४२३-२५५०८६ | सांस्कृतिक कार्यक्रम | १५० | विनामूल्य |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | सायं.६ ते ७ | पारायणार्थी महिला मंडळ | शिर्डी | - | हळदीकुंकू | - | - |
| | रात्रौ ७.३० ते १० | श्री प्रसाद कांबळी | मुंबई | ९८२१६५४१८९ | धार्मिक - नाटक- देवबाभळी | २५ | १,५००००/- |
| ०३ | शनिवार दि.१८.०८.२०१८ सायं.४ ते ६ | कुडाळेश्वर मित्रमंडळ, | कुडाळ | ९८२००४११८२ | नाटक-दशावतारी | ४० | ५५,०००/- |
| | रात्रौ ७.३० ते १० | श्री मनहर उधास, | मुंबई | ९८२१०७७५५१ | साई भजन | १५ | विनामुल्य |
| ०४ | रविवार दि.१९.०८.२०१८ सायं.४ ते ६ | स्वर निनाद वाद्यवृद वसंतराव आजगांवकर | मुंबई | ९८७०९८६६३२ | नाद विठ्ठल विठ्ठल | १५ | ५०,०००/- |
| | रात्रौ ७.३० ते १० | नक्षत्र वादय वृंद | मुंबई | ९८७०९८६६३२ | महाराष्ट्र उत्सव | २५ | ८०,०००/- |
| ०५ | सोमवार दि.२०.०८.२०१८ सायं.४ ते ६ | शरद उपाध्ये | मुंबई | ९२२३३०३१२५ | राशी चक्र | ०४ | ९५,०००/- |
| | रात्रौ ७.३० ते १० | श्री प्रमोद पवार | मुंबई | ९८६९०२४७४७ | सामाजिक नाटक- अनन्या | २० | १,०१,०००/- |
| ०६ | मंगळवार दि २१.०८.२०१८ सायं.४ ते ६ | नरेंद्र नाशिरकर | नागपूर | ९८५०३५२१३० ९५१८९७६९२५ | संगीतमय साई विचार कथा | ०४ | ५,०००/- |
| | रात्रौ ७.३० ते १० | कलापिनि कोमाकली कुमार गंधर्व संगीत अकॅडमी | देवास (म.प्र.) | ९८२६०८००४९ ७०५९५८००४९ | भजन व अभंग | १० | ५०,०००/- |
| ०७ | बुधवार दि.२२.०८.२०१८ सायं.४ ते ६ | हरिश ग्वाला | मुंबई | ९८६७४९१४९९ | भजन | ०८ | ४५०००/- |
| | रात्रौ ७ .३०ते १० | सुनिल सरगम, राहुल गुप्ता | दिल्ली | ९२१२७३५१५० | श्रीकृष्ण रासलिला व शंकर भगवान तांडव नृत्य | ३० | ५०,०००/- |
| | | | | | | एकूण रु. | ७,८२,०००/- |

**(कार्यवाही- शताब्दी कक्ष प्रमुख)**

---

**विषय नं.२** **दिनांक ३०.०७.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.५०७** दिनांक ३०.०७.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

३ **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष महोत्सव वर्षानिमीत्त दि.१० आक्टोंबर,२०१८ ते १९ आक्टोंबर,२०१८ या कालावधीमध्ये सांस्कृतीक, धार्मीक व सामाजीक कार्यक्रमाचे आयोजनाबाबत.**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः-

१) अधिनयामाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास आधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे. मंदिरामध्ये रूढी व प्रथेनुसार धार्मिक व पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे आणि या अधिनियामान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्त व्यववस्थेची उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील.

२) अधिनियामाचे कलम २१ मधील पोट कलम (१) (ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा समारंभ व उत्सव आयोजित करणे व पा

३) अधिनियामाचे कलम २१ मधील पोट कलम (१) (ग) भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे.

४) अधिनयामाचे कलम १७ मधील पोट कलम (२) (ण) मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देणे.

५) अधिनियमाचे कलम २१ (२) पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर आणि विश्वस्त व्यवस्थेच्या उद्देशासाठी आणि मंदिराच्या नजीकच्या भविष्यातील गरजा, आवश्यकता व सुधारणा यासाठी तत्सम तरतूद केल्यानंतर जर विश्वस्तव्यवस्था निधीमध्ये, जादा शिल्लक राहीली तर, त्या जादा शिलकीच्या काही भागाचा समितीस, वेळोवेळी, पुढीलप्रमाणे सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी विनियोग करता येईल.

२१ (२) पोटकलम (१) (ग) मध्ये राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रीडा अकादमी अथवा संस्था, सार्वजनिक ग्रंथालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रीत अथवा शारीरीकदृष्ट्या विकलांग व्यक्तीसाठी आधारगृह किंवा धर्मादाय अथवा धार्मिक संस्था किंवा सोसायटी नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी केलेली, कला व साहित्य या क्षेत्राशी संबंधीत असलेली कोणतीही अन्य बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटना अथवा सोसायटी स्थापन करणे व त्याची देखभाल करणे किंवा स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानाच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी अशा संस्थाना अथवा व्यक्तींना किंवा शिर्डी नगरपंचायतीला वित्तसहाय्य देणे.

शासन निर्णयः- महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र. सासंवि २०१३/ प्र.क्र.०१/ का.१६ दि.२२/१०/२०१३ अन्वये मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखालील कृती आराखडा समितीने श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाकरीता रु.३,०२३.१७ कोटी इतक्या रकमेच्या कृती आराखड्यास दि.३१/०३/२०१७ रोजी मान्यता दिली आहे. सदर आराखडयात संस्थानचे प्रथम व व्दितीय प्राधान्य गटात असे एकुण रु.१,८२८.३१ कोटी इतक्या रकमेचे प्रकल्प प्रस्तावीत असून वरीलपैकी व्दितीय प्राधान्य गटातील रु.१,२५२.८५ कोटी निधीची मागणी करणारा प्रस्ताव केंद्र शासनास सादर करणेत आला आहे. तसेच प्रथम प्राधान्य गटातील अ.नं. १२ मध्ये विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजनासाठी रु.२५ कोटी मात्र अंदाजित खर्चास मान्यता मिळालेली असून, पारायण तसेच विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनानिमित्त ७० दिवसांकरीता मंडप टाकून त्यात अनुषंगिक व्यवस्था पुरविणे तसेच श्री साईचरित्र महापारायणाकरीता एकाचवेळी ५० हजार साईभक्त सामावू शकतील असे नियोजन करणे, असे नमुद केले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णय- मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १७१ खालीलप्रमाणे पारीत झालेला आहे.

"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्ताने दि. ०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि. ३१ ऑक्टोबर, २०१७ अखेर ३८६ दिवस दररोज साईभक्तांसाठी धार्मिक, सामाजिक, साईबाबांची शिकवण, सेवाभाव दर्शविणा-या भव्य स्वरूपाच्या कार्यक्रमांचे आयोजन करणेत यावे", असे ठरलेले आहे.

प्रस्तावनाः- श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जात आहे.

यासाठी शिर्डी येथे भाविकांकरीता संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणेत येत असून, या कार्यक्रमांचे आयोजनाबाबतचे प्रारूप वार्षिक कॅलेडर तयार करण्यात आलेले होते.

त्यानुसार शताब्दी वर्षामध्ये विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. आता श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव अंतिम टप्यातील धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे नियोजन करण्यात येत आहे.

विभागाचा अभिप्रायः- श्री साईबाबा समाधी शताब्दी माहे-ऑक्टोबर-२०१८ मध्ये दि.१० ऑक्टोबर, २०१८ ते दि.१९ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीमध्ये साईभजन संध्या, सांस्कृतिक कार्यक्रम, पुण्यतिथी उत्सव, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रम, मान्यवरांच्या हस्ते टपाल तिकट प्रकाशन, श्री साईबाबा प्रशासकीय प्रबोधिनीचे उदघाटन या कार्यक्रमांचे आयोजन करणेस यापूर्वी मान्यता देण्यात आलेली आहे.

श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाच्या समाधी शताब्दी समारोपाच्या निमित्ताने खालील तपशिलात नमूद केल्याप्रमाणे कार्यक्रम आयोजित करावे असे नम्र मत आहे.

| अ.नं | दिनांक | प्रस्तावित कार्यक्रामांचा तपशिल | कार्यक्रमांचे प्रस्तावित ठिकाण |
|---|---|---|---|
| ०१. | १०/१०/२०१८ | भक्त मंडळाचे सभासदाचे महासंमेलन | साईनगर मैदान किंवा शताब्दी मंडप साईआश्रम भक्तनिवास किंवा शेतीमहामंडळाची जागा |
| ०२. | ११/१०/२०१८ | एक दिवसीय अखंड पारायण सोहळा | साईनगर मैदान किंवा |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | शताब्दी मंडप साईआश्रम भक्तनिवास |
| ०३. | १२/१०/२०१८ | महाआरोग्य शिबीर (रक्तदान शिबीर, सर्व रोग निदान शिबीर, नेत्र तपासणी-नेत्र शस्त्रक्रीया व चष्मे वाटप अपंग व जयपूर, प्लॅस्टीक सर्जरी, कर्णबधिर यंत्रवाटप, जयपूर फुट शिबीर इत्यादी ) | साईनगर मैदान |
| ०४. | १३/१०/२०१८ | साई सेवक संमेलन | साईनगर मैदान किंवा शताब्दी मंडप साईआश्रम भक्तनिवास |
| ०५. | १४/१०/२०१८ | माजी. अध्यक्ष, उपाध्यक्ष व विश्वस्त, माजी. कार्यकारी अधिकारी, उपकार्यकारी अधिकारी, लेखाधिकारी, निवृत्त प्रशासकीय अधिकारी व अधिक्षक, प्र, अधिक्षक व कर्मचारी यांचे संमेलन | साईनगर मैदान किंवा शताब्दी मंडप साईआश्रम भक्तनिवास |
| ०६. | १५/१०/२०१८ | जागतिक साईमंदिर संमेलन | शताब्दी मंडप साईआश्रम भक्तनिवास |
| ०७. | १६/१०/२०१८ | ५०० अॅम्बुलन्स वाटप कार्यक्रम (शासन मान्यतेस अधिन राहून चेक वाटप) / श्री साईबाबा संस्थान कर्मचारी यांचे स्नेह संमेलन. | साईनगर मैदान |
| ०८. | १७/१०/२०१८ | पुण्यतिथी उत्सव, साईभजन संध्या / इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साईनगर किंवा जुने साईप्रसाद निवासस्थान मैदान किंवा शताब्दी मंडप |
| ०९. | १८/१०/२०१८ | पुण्यतिथी उत्सव, साईभजन संध्या / इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साईनगर किंवा जुने साईप्रसाद निवासस्थान मैदान किंवा शताब्दी मंडप |
| १०. | १९/१०/२०१८ | पुण्यतिथी उत्सव, साईभजन संध्या / इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साईनगर किंवा जुने साईप्रसाद निवासस्थान मैदान किंवा शताब्दी मंडप |

प्रस्तावः- श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाच्या अंतिम टप्यातील दि.१० ऑक्टोबर,२०१८ ते दि.१९ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीतील प्रत्येक दिवसाचे कार्यक्रमांचे स्वरूप व व्याप्ती, पुण्यतिथी उत्सवाचे स्वरूप, कार्यक्रमांचे ठिकाण, समारोप कार्यक्रमासाठी निमंत्रीत मान्यवरांची निश्चिती करणे. कार्यक्रम निश्चित झालेनंतर संस्थानचे विविध विभागामार्फत अंदाजपत्रक तयार करणे. यावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय होणेकामी सदरहू प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपूढे सविनय सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष महोत्सव वर्षानिमीत्त दि.१० आक्टोंबर,२०१८ ते १९ आक्टोंबर,२०१८ या कालावधीमध्ये सांस्कृतीक, धार्मीक व सामाजीक कार्यक्रमाचे आयोजनाबाबत खालील प्रमाणे शिफारशी करण्यात आल्या.**

| अ.नं | दिनांक | प्रस्तावित कार्यक्रामांचा तपशिल | कार्यक्रमांचे प्रस्तावित ठिकाण | कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| **०१.** | **१०/१०/२०१८** | **भक्त मंडळाचे सभासदाचे महासंमेलन** | **साईनगर मैदान किंवा शताब्दी मंडप साईआश्रम भक्तनिवास किंवा शेतीमहामंडळाची जागा/शेती महामंडळाची जागा** | **प्र.अधिक्षक,आस्थापना विभाग** |
| **०२.** | **११/१०/२०१८** | **एक दिवसीय अखंड पारायण सोहळा** | **साईनगर मैदान किंवा शताब्दी मंडप साईआश्रम भक्तनिवास** | **प्र.अधिक्षक, शताब्दी कक्ष / प्र.अधिक्षक,मंदिर विभाग** |
| **०३.** | **१२/१०/२०१८** | **महाआरोग्य शिबीर (रक्तदान शिबीर, सर्व रोग निदान शिबीर, नेत्र तपासणी-नेत्र शस्त्रक्रीया व चष्मे वाटप अपंग व जयपूर, प्लॅस्टीक सर्जरी, कर्णबधिर यंत्रवाटप, जयपूर फुट शिबीर इत्यादी )** | **साईनगर मैदान** | **वैद्यकीय अधिक्षीका, श्री साईनाथ रुग्णालय वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल** |
| **०४.** | **१३/१०/२०१८** | **साई सेवक संमेलन** | **साईनगर मैदान किंवा शताब्दी मंडप साईआश्रम भक्तनिवास** | **प्र.अधिक्षक, कामगार विभाग** |
| **०५.** | **१४/१०/२०१८** | **माजी. अध्यक्ष, उपाध्यक्ष व विश्वस्त,माजी.कार्यकारी अधिकारी, उपकार्यकारी अधिकारी, लेखाधिकारी, निवृत्त** | **साईनगर मैदान किंवा शताब्दी मंडप साईआश्रम भक्तनिवास** | **जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क विभाग** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | प्रशासकीय अधिकारी व अधिक्षक, प्र, अधिक्षक व कर्मचारी यांचे संमेलन | | |
| ०६. | १५/१०/२०१८ | जागतिक साईमंदिर संमेलन | शताब्दी मंडप साईआश्रम भक्तनिवास | जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क विभाग |
| ०७. | १६/१०/२०१८ | ५०० ॲम्बुलन्स वाटप कार्यक्रम (शासन मान्यतेस अधिन राहून चेक वाटप) / श्री साईबाबा संस्थान कर्मचारी यांचे स्नेह संमेलन. | साईनगर मैदान | वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल प्र.अधिक्षक,वाहन विभाग / प्र.अधिक्षक, आस्थापना विभाग |
| ०८. | १७/१०/२०१८ | पुण्यतिथी उत्सव, साईभजन संध्या / इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साईनगर किंवा जुने साईप्रसाद निवासस्थान मैदान किंवा शताब्दी मंडप | प्र.अधिक्षक, शताब्दी कक्ष /प्र.अधिक्षक,मंदिर विभाग |
| ०९. | १८/१०/२०१८ | पुण्यतिथी उत्सव, साईभजन संध्या / इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साईनगर किंवा जुने साईप्रसाद निवासस्थान मैदान किंवा शताब्दी मंडप | प्र.अधिक्षक, शताब्दी कक्ष, / प्र.अधिक्षक, मंदिर विभाग |
| १०. | १९/१०/२०१८ | पुण्यतिथी उत्सव, साईभजन संध्या / इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साईनगर किंवा जुने साईप्रसाद निवासस्थान मैदान किंवा शताब्दी मंडप | प्र.अधिक्षक, शताब्दी कक्ष, प्र.अधिक्षक,मंदिर विभाग |

अ.नं.२ एक दिवसीय अखंड पारायण सोहळा आयोजीत करणेबाबत मंदिर पुजारी यांचेशी चर्चा करुन तारीख निश्चीत करावी.

यापुर्वी सन २०१८ शताब्दी वर्षात भारतातील व जगातील साईमंदिराचे प्रतिनिधींचे साई संमेलनाचे दोन कार्यक्रम झालेले असल्याने उपरोक्त प्रस्तावातील अ.नं.६ ‘ जागतीक साई संमेलन’ या कार्यक्रमाबाबत मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत चर्चा करुन निर्णय घेणेत यावा.

अ.नं.७- ५०० ॲम्बुलन्स वाटप कार्यक्रम शासन मान्यतेस अधिन राहून निश्चित करणेत यावा. उर्वरीत कार्यक्रमांना मान्यता देण्यात यावी.

उपरोक्त दि.१० ऑक्टोबर,२०१८ ते दि.१९ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीतील प्रत्येक दिवसाचे कार्यक्रमांचे स्वरूप व व्याप्ती, पुण्यतिथी उत्सवाचे स्वरूप, कार्यक्रमांचे ठिकाण, समारोप कार्यक्रमासाठी निमंत्रीत मान्यवरांची निश्चिती करणे इत्यादी कार्यक्रम निश्चित झालेनंतर संस्थानचे संबधीत विभागाने अंदाजपत्रक तयार करुन कार्यक्रमाबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

या प्रसंगी साईबाबांचे चरित्रावर आधारीत रांगोळी प्रदर्शनाचेही आयोजन करणेत यावे, तसेच शताब्दी वर्षानिमीत्त श्री साईबाबा संस्थानचे अधिकारी व कर्मचारी तसेच प्रतिनियुक्तीवरील अधिकारी यांना चांदीचे नाणे अथवा इतर वस्तु भेट म्हणून देण्यात यावी.

उपरोक्त १ दिवसीय अखंड पारायण सोहळा कार्यक्रम वगळता उर्वरीत सर्व कार्यक्रम सकाळी १० ते २ या एकासत्रात आयोजीत करावे, अशी उपसमितीची शिफारस होती. (कार्यवाही- शताब्दी कक्ष प्रमुख)

यावर सविस्तर चर्चा होऊन, खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

| अ.नं | दिनांक | प्रस्तावित कार्यक्रामांचा तपशिल | कार्यक्रमांचे प्रस्तावित ठिकाण | व्यवस्थापन समितीचे निर्णय | कार्यवाही |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | १०/१०/२०१८ | भक्त मंडळाचे सभासदाचे महासंमेलन | साईनगर मैदान किंवा शताब्दी मंडप साईआश्रम भक्तनिवास किंवा शेतीमहामंडळाची जागा/शेती महामंडळाची जागा | सदर कार्यक्रम आक्टोंबर, २०१८ नंतर घेण्यात यावा. याएवेजी शालेय/ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी चित्रकला, निबंध, गायन व वकृत्व इ. स्पर्धांचे आयोजन करावे. | प्र.अधिक्षक,आस्थापना विभाग शैक्षणिक संकुल |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०२. | ११/१०/२०१८ | एक दिवसीय अखंड पारायण सोहळा | साईनगर मैदान किंवा शताब्दी मंडप साईआश्रम भक्तनिवास | एक दिवसीय अखंड पारायण सोहळा १६ गुंठे परिसरात आयोजित करणेत यावा. | प्र.अधिक्षक, शताब्दी कक्ष / प्र.अधिक्षक,मंदिर विभाग |
| ०३. | १२/१०/२०१८ | महाआरोग्य शिबीर (रक्तदान शिबीर, सर्व रोग निदान शिबीर, नेत्र तपासणी-नेत्र शस्त्रक्रीया व चष्मे वाटप अपंग व जयपूर, प्लॅस्टीक सर्जरी, कर्णबधिर यंत्रवाटप, जयपूर फुट शिबीर इत्यादी ) | साईनगर मैदान | प्रस्तावीत केल्याप्रमाणे शिबीराऐवजी सांधेरोपन शस्र् रिक्रिया शिबीर आयोजीत करावे. शिबीराचे दिवशी केवळ रुग्णांची तपासणी व नोंदणी करावी, व त्यानंतरच्या महिनाभरात शस्त्रक्रिया पुर्ण कराव्यात. | वैद्यकीय अधिक्षीका, श्री साईनाथ रुग्णालय वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल |
| ०४. | १३/१०/२०१८ | साई सेवक संमेलन | साईनगर मैदान किंवा शताब्दी मंडप साईआश्रम भक्तनिवास | सदरचा कार्यक्रम १५.१०.२०१८ रोजी आयोजीत करावा | प्र.अधिक्षक, कामगार विभाग |
| ०५. | १४/१०/२०१८ | माजी. अध्यक्ष, उपाध्यक्ष व विश्वस्त,माजी.कार्यकारी अधिकारी, उपकार्यकारी अधिकारी, लेखाधिकारी, निवृत्त प्रशासकीय अधिकारी व अधिक्षक, प्र, अधिक्षक व कर्मचारी यांचे संमेलन | साईनगर मैदान किंवा शताब्दी मंडप साईआश्रम भक्तनिवास | दि.१३ आक्टोबर,२०१८ रोजी माजी. अध्यक्ष, उपाध्यक्ष व विश्वस्त, माजी.कार्यकारी अधिकारी, उपकार्यकारी अधिकारी, लेखाधिकारी, निवृत्त प्रशासकीय अधिकारी यांचे संमेलन घ्यावे.<br>-------------------------<br>तसेच दि.१४.१०.२०१८ रोजी संस्थानमधील अधिक्षक, प्र, अधिक्षक व कर्मचारी यांचे संमेलन आयोजीत करावे. | शताब्दी कक्ष प्रमुख<br>-----------------<br>प्र.अधिक्षक, आस्थापना विभाग, |
| ०६. | १५/१०/२०१८ | जागतिक साईमंदिर संमेलन | शताब्दी मंडप साईआश्रम भक्तनिवास | बाहेरच्या देशातील मंदिराचे प्रतिनिधींनां नाताळच्या सुट्टयामध्ये येणे शक्य होते, त्यामुळे सदर कार्यक्रमाचे आयोजन आक्टोंबर मध्ये करणे उचीत होणार नाही. सबब सदर कार्यक्रम रद्द करणेत यावा. | जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क विभाग |
| ०७. | १६/१०/२०१८ | ५०० ॲम्बुलन्स वाटप कार्यक्रम (शासन मान्यतेस अधिन राहून चेक वाटप) / श्री साईबाबा संस्थान कर्मचारी यांचे स्नेह संमेलन. | साईनगर मैदान | सदर प्रकल्पास शासनाची मान्यता मिळाल्यानंतर कार्यक्रम आयोजीत करणेबाबत निर्णय घ्यावा. तुर्त स्थगित ठेवावा. | वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल प्र.अधिक्षक, वाहन विभाग/ प्र.अधिक्षक, आस्थापना विभाग |
| ०८. | १७/१०/२०१८ | पुण्यतिथी उत्सव, साईभजन संध्या / इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साईनगर किंवा जुने साईप्रसाद निवासस्थान मैदान किंवा शताब्दी मंडप | प्रस्तावीत केल्याप्रमाणे | प्र.अधिक्षक, शताब्दी कक्ष / प्र.अधिक्षक,मंदिर विभाग |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०९. | १८/१०/२०१८ | पुण्यतिथी उत्सव, साईभजन संध्या / इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साईनगर किंवा जुने साईप्रसाद निवासस्थान मैदान किंवा शताब्दी मंडप | प्रस्तावीत केल्याप्रमाणे | प्र.अधिक्षक, शताब्दी कक्ष, / प्र.अधिक्षक, मंदिर विभाग |
| १०. | १९/१०/२०१८ | पुण्यतिथी उत्सव, साईभजन संध्या / इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साईनगर किंवा जुने साईप्रसाद निवासस्थान मैदान किंवा शताब्दी मंडप | प्रस्तावीत केल्याप्रमाणे | प्र.अधिक्षक, शताब्दी कक्ष, प्र.अधिक्षक,मंदिर विभाग |

**(कार्यवाही- शताब्दी कक्ष प्रमुख)**

---

**विषय नं.३** **श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव–२०१८ साजरा करणेस व त्याकामी येणारे खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद** -श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम-२००४ मधील कलम नं १७ (१) मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे. राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्यामालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे,मंदीरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी,पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे. ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्नकामी लावणे. ही समितीची कर्तव्य असतील.

**प्रस्तावना-** २१(१)(ख) रुढी व प्रथांनुसार,मंदिरातील धार्मिक विधी, पुजा-अर्चा, समारंभ व उत्सव अयोजित करणे व पार पाडणे अशी तरतूद आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी तर्फे बुधवार दि.१७/१०/२०१८ ते शुक्रवार दि.१९/१०/२०१८ या तीन दिवस श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव साजरा होणार आहे. त्या कालावधीत खालील प्रमाणे कामे व तयारी करावी लागणार आहे.

| अ.नं. | तपशिल | उत्सवासाठी करावयाची तयारी व कामे |
|---|---|---|
| १. | उत्सव निमंत्रण पत्रिका व प्रसाद | संस्थान व्यवस्थापनामार्फत पूर्वापार चालत आलेल्या प्रथेप्रमाणे भक्तमंडळाचे आजीव व आश्रयदाते सभासदांना उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका छपाई करुन, पत्रिकेबरोबर उदीप्रसाद पाठवावा लागतो.यंदाचे श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवात सभासदांना १,८०,००० निमंत्रण पत्रिका पाठवाव्या लागतील.<br>तसेच नेहमीप्रमाणे निमंत्रण पत्रिका व उत्सवासंबधीत माहिती प्रेस नोट म्हणून वर्तमान पत्रातूनजनसंपर्क कार्यालयामार्फत प्रसिध्दीस देण्यात येईल. |
| २. | उत्सव व्यवस्था | **अ) कलाकार कार्यक्रम** |
| | बुधवार,दि.१७/१०/२०१८ ( प्रारंभ दिवस) | निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम नेहमीच्या प्रथेप्रमाणे सायंकाळी ७.३० ते रात्रौ.१०.०० पर्यत साईनगर मैदानाचेस्टेजवर ठेवण्यात येतो. आता मा. व्यवस्थापन समिती ठरवील त्या जागेवर आयोजित करता येईल. |
| | गुरुवार,दि.१८/१०/२०१८ (मुख्य दिवस) | निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम नेहमीच्या प्रथेप्रमाणे सायंकाळी ७.३० ते रात्रौ.१०.३० पर्यत साईनगर मैदानाचेस्टेजवर ठेवण्यात येतो. आता मा. व्यवस्थापन समिती ठरवील त्या जागेवर आयोजित करता येईल.<br>कलाकारांची सेवा हजेरी कार्यक्रम नेहमीच्या प्रथेप्रमाणे रात्री ११.०० ते पहाटे ५.०० या वेळेत श्री साईबाबा मंदिर शताब्दी मंडप (सोळा गुंठे) येथे आयोजित करता येईल.समाधी मंदिर दर्शनासाठी रात्रभर उघडे राहिल. |
| | शुक्रवार ,दि.१९/१०/२०१८ (सांगता दिवस) | निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम नेहमीच्या प्रथेप्रमाणे सायंकाळी ७.३० ते रात्रौ.१०.०० पर्यत साईनगर मैदानाचेस्टेजवर ठेवण्यात येतो. आता मा. व्यवस्थापन समिती ठरवील त्या जागेवर आयोजित करता येईल. |

| | | |
|---|---|---|
| | | **ब) कीर्तन कार्यक्रम** |
| | बुधवार,दि.१७/१०/२०१८ ते शुक्रवार,दि.१९/१०/२०१८ या कालावधीत नेहमीच्या वेळेप्रमाणे कीर्तन कार्यक्रम होतील. | श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवासाठी तीन दिवस किर्तन कार्यक्रम ठेवावयाचा आहे. निमंत्रीत कीर्तनकारांची व कलाकारांची निवासव्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात येईल. निमंत्रीत कीर्तनकारांचे व कलाकारांचे मानधन मंदीर विभागामार्फत अदा करण्यात येईल. कीर्तनकार निश्चिती करावयाची आहे. याकामी स्वतंत्र प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. |
| | | **क) विविध मिरवणूका** |
| | बुधवार,दि.१७/१०/२०१८ ते शुक्रवार, दि.१९/१०/२०१८ | पोथी, फोटो, वीणा, पालखी, रथ,भिक्षा झोळी,सिमोल्लंघन मिरवणूकप्रथेप्रमाणे करण्यात येतील व त्यातील सदस्यांच्या सहभागाविषयीचा प्रस्ताव स्वतंत्र सादर करण्यात येईल.<br>उत्सवाचे पहिले दिवशी दिनांक.१७/१०/२०१८ रोजी श्रींचे पालखीचे गावांतून रात्रौ. ९.१५ वा मिरवणूक निघेल व दुस-या दिवशी दि.१८.१०.२०१८ रोजी श्रींचे रथाची गावांतून रात्रौ. ९.१५ वा मिरवणूक निघेल. |
| | | **ड) आराधना विधी** |
| | | आराधना विधी समाधी मंदिराच्या पहिल्या माळयावर करण्यात येईल. सदरहू आराधना विधीचे थेट (Live telecast) टिव्हीवर व इतर माध्यमांना करण्यात येईल.यामुळे समाधी मंदिर परिसरातील दूरचित्रवाणीच्या संचावर व संपुर्ण जगात देखील भक्तांना हा सोहळा बघता येईल. समाधीमंदिर (बुटी वाडयास)१०० वर्ष झाल्याने जुनी वास्तू झाली असल्यामुळे गावकरी व इतर यांची वर्दळ वरती बंद करुन लाईव्ह दर्शन देणेत येईल. आराधना विधीकरीता जे यजमान (पतिपत्नी) यांची प्रसाद भोजनाची व्यवस्था मंदिराचे पहिल्या माळयावर हॉलमध्ये करणेत येईल, त्यांचे शिवाय इतरांना समाधी मंदीर हॉलवर प्रवेश दिला जाणार नाही. जे भोजन यजमान, ब्राम्हण सुवासिनीनादिले जाते.तेच शाहीभोजन गावकरी व मान्यवर यांना श्रीसाई प्रसादालयच्याव्ही.आय.पी. हॉलच्या बाजूला असलेल्या दोन हॉलमध्ये ठराविक वेळेत देण्यात येण्याची व्यवस्था करण्यात येईल. या दिवशी साईभक्त व गावक-यांसाठी श्री साई प्रसादालयामध्ये उत्सवाचे नेहमीचे प्रसाद भोजन संस्थानतर्फे मोफत देण्यात येईल. |
| ३. | अखंड पारायण व्यवस्था | उत्सव काळात बुधवार,दि.१७/१०/२०१८ रोजी पहाटे ५.१५ वा श्री व्दारकामाई मंदीरात श्री साईचरित्राचे अखंड पारायणास सुरुवात होईल.<br>दि.१८/१०/२०१८ रोजी पहाटे५.०० वा पारायण समाप्ती होईल. मा.व्यवस्थापनसमितीचे सदस्य पहिले ०५ अध्याय वाचतील व उर्वरितराहिलेले ४८ अध्याय प्रत्येकी एक असे ४८ साईभक्त वाचतील. इच्छुक भक्तांची नावे दि.१६/१०/२०१८ रोजी अनाऊंसमेंट सेंटर मधील मंदीर विभागातील कर्मचारी यांचेकडे नोंदवीले जातील. त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या नावाच्या चिठ्ठया काढून पारायणाकरीता नावे निश्चित केली जातील. पारायणात भाग घेणा-या प्रत्येक भक्तांस प्रसाद म्हणून एक श्रीफळ देण्यात येईल. |
| ४. | श्री साईसत्यव्रत पुजा व अभिषेक पुजा | उत्सव काळात बुधवार, दि.१७/१०/२०१८ ते शुक्रवार, दि.१९/१०/२०१८ अखेर श्री साईसत्यव्रत (सत्यनारायण पुजा) व अभिषेक पुजा गर्दीचा अंदाज घेवून बंद किंवा चालू ठेवणे बाबत निर्णय घेता येईल. |
| ५. | विद्युत रोषणाई | समाधी मंदीर, व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान व मंदीर परिसरात विद्युत रोषणाई करण्यात येईल. विद्युत विभागामार्फत विद्युत रोषणाई विनामुल्य करणा-या मंडळाची नेमणूक करण्यात येईल विद्युत रोषणाई करणा-या मंडळास शिर्डी येथे निवास, भोजन,चहा व नाष्टयाची व्यवस्था संस्थान मार्फत विनामुल्य करण्यात येते.मात्र ट्रक भाडे व जाणे-येण्याचा खर्च देण्याची प्रथा आहे. |
| ६. | गाव जेवण | उत्सवाच्या सांगतादिनी नेहमीप्रमाणे गावजेवण देण्यात येईल. |
| ७. | प्रसाद- भोजन,चहा, कॉफी, दुध, बिस्कीट , लाडु | उत्सव काळात प्रसादालयात मिष्टान्नासह भक्तांना मोफतप्रसाद भोजन दिले जाते. मा. व्यवस्थापन समितीचे सदस्य व त्यांचे कुटुंबिय तसेच निमंत्रित कलाकारांना स्वतंत्र प्रसाद भोजनाची व्यवस्था करण्यात येईल. पोलीस कर्मचारी व उत्सवात काम करणेकरीता मदतीसाठीयेणा-या व्यक्तीची प्रसाद भोजनाची व्यवस्था नेहमीप्रमाणे केली जाईल.<br>सन २०१८ चेदसराउत्सवात तीनही दिवसांचे प्रसाद भोजनात दयावयाचे मिष्टांन्न पदार्थ प्रशासकीय स्तरावर निश्चित करण्यात येतील. त्याप्रमाणे उत्सवात मिष्टान्न देता येईल. |

| | | |
|---|---|---|
| | | साईभक्तांचे सोयीसाठी चहा, कॉफी, दूध व बिस्कीटे इत्यादींची सेवा कॅटींनमध्ये २४ तास सुविधा नेहमीप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात येईल.<br>उत्सव काळात लाडू प्रसाद विक्री जास्तीत जास्त ठिकाणी सुरु करणेत येईल. या सबंधीत विभागाकडुन नियोजन करण्यात येईल. |
| ८. | संरक्षण विभाग | उत्सव काळात समाधी मंदीर व मंदीर परिसरात बंदोबस्त ठेवणेकामी संरक्षण विभागात ठेकेदारी पध्दतीने जादा गार्ड नेमण्यात येतील. तसेच शांतता व सुव्यवस्था राखणेसाठी पुरेसा बंदोबस्त ठेवणेकामी मा. पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांना तसेच कार्यक्रमासाठी ध्वनीक्षेपणपरवानगीबाबत मा.पोलिस निरिक्षक, शिर्डी यांना विनंती करण्यात येईल. |
| ९. | लेखाशाखा | उत्सवाचे मुख्य दिवशी मंदीर रात्रभर उघडे असल्याने देणगीकाऊंटर तीन शिफ्टमध्ये चालू ठेवण्यात येतील. |
| १०. | बांधकाम | उत्सव कालावधीत समाधी मंदीर परिसरात व इतर ठिकाणी तसेच आवश्यकतेनुसार मंडप/शामियाने व कलाकारांसाठी स्टेज इ.व्यवस्थाकेली जाईल. |
| ११. | जादा कंत्राटी कर्मचारी | उत्सवाचे पुर्वतयारी करणेकामी व उत्सव पार पाडणेकरीता लागणा-या जादा कर्मचारी वर्ग आवश्यकते नुसार ज्या त्या खात्यास नेमण्यात येईल. याकामी कामगार अधिकारी विविध खात्याकडून आलेल्या मागणीची छानणी करुन योग्य ते आदेश पारीत करतील. |
| १२. | भक्तांची प्रासंगिक निवास व्यवस्था | संस्थानचे साईआश्रम भक्तनिवासस्थान, साई धर्मशाळा,व्दारावती, साईबाबा भक्त निवासस्थान इ. इमारतीमधून पालखी पदयात्री व भक्तांची निवास व्यवस्था करण्यात येईल |
| १३. | रुग्णालय व्यवस्था | संस्थान मार्फत मंदीर परिसर,पिंपळवाडी रोड दर्शन रांग व श्री साई प्रसादालय या ठिकाणी प्रथमोपचार केंद्र सुरु करण्यात येतील. तसेच सुसज्य अशी रुग्णवाहिका मंदीर परिसरात ठेवण्यात येईल. |
| १४. | पालखी व्यवस्था | श्री पुण्यतिथी उत्सवात ब-याच ठिकाणाहून पालख्या येत असतात,उत्सवात येणा-या पालख्या ठेवण्याची व्यवस्था साईधर्मशाळा मध्ये करण्यात येईल. पालखीधारकांतील पदयात्रींना संस्थानमार्फत शिर्डी येथे आलेवर ०१ वेळचे भोजन प्रसाद म्हणून देण्यात येते.त्यानुसार यावर्षीही १ वेळचे भोजन प्रसाद म्हणून देण्यात येईल |
| १५ | पाणी पुरवठा | पाटबंधारे खात्यास उत्सवकाळात कॅनॉल चालू ठेवणे बाबत विनंती करण्यात येईल. नियमित पाणीपुरवठा राहील याची व्यवस्था करण्यात येईल. |
| १६ | खर्चाचे अंदाजपत्रक | श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव -२०१७ मध्ये अंदाजपत्रकीय रक्कम रु. ६४,६५,०००/- मात्र इतक्या रक्कमेस मंजुरी देण्यात आली होती. प्रत्यक्षात रु.६२,७०,४६९/- मात्र इतका खर्च झालेला आहे.<br>श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०१८ करीता अंदाजपत्रकीय रु.१,४९,१५,०००/- मात्रचा खर्च मंजुरीसाठी सादर केला आहे. |

श्री पुण्यतिथी उत्सव-२०१८ करीता झालेला खर्च व अपेक्षितखर्च तपशिलवार माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | विभाग | श्री पुण्यतिथी उत्सव-२०१७ | | श्री पुण्यतिथी उत्सव-२०१८ |
|---|---|---|---|---|---|
| | | | अंदाजे खर्च | प्रत्यक्ष खर्च | अंदाजे खर्च |
| १. | मंडप, कमानी, स्टेज व इतर खर्च | बांधकाम | ६,२५,००० | ४,१५,२१८ | ६०,००,००० |
| २. | कलाकार बिदागी – कीर्तनकार व निमंत्रित कलाकार कार्यक्रम, आराधन विधी पुजा साहित्य व इतर | मंदीर | १०,००,००० | ८,१९,५९२ | १०,००,००० |
| ३. | भक्तांना मिष्टान्न खर्च (गावजेवण व मजूरी) | प्रसादालय | ८,००,००० | ८,४९,३५१ | ८,९०,००० |
| ४. | विद्युत रोषणाई,१० दिवसाचा खर्च (जनरेटर भाडे, इंधन इ. खर्च) | विद्युत | १०,५०,००० | ११,१२,३४८ | २७,००,००० |
| ५ | साऊंड सिस्टीम भाडेतत्वावर | ध्वनिक्षेपण | - | - | ५,००,००० |
| ६ | व्हीडीओ शुटींग संबंधी कामांकरीता | सी.सी.टीव्ही | - | - | ३०,००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | फोटो प्रिंटींग, फोटो अल्बम, सी.डी/डी.व्ही.डी. मेमरी कार्ड खरेदी. | | | | |
| ५. | निमंत्रण पत्रिका,जाहिरात बोर्ड, पोष्टेज खर्च, स्टिकर , उदीप्रसाद भरणे मजूरीसह खर्च | सामान्य प्रशासन | २५,००,००० | २४,४८,७९२ | २३,४५,००० |
| ६. | जादा कंत्राटी कर्मचारी,स्वयंसेवक(विदयार्थी) मानधन खर्च | साईप्रसादालय, मंदीर, वाहन कॅन्टीन, सरक्षण साईबाबा भक्तनिवास, | २,००,००० | ५,६०,१९९ | ८,००,००० |
| ७. | पालख्याचे पिण्याचे पाणी व्यवस्था खर्च | पाणी पुरवठा | ५०,००० | - | ३,५०,००० |
| ८. | इतर खर्च – फर्निचर, फोल्डींग टेबल्स, टेबल क्लॉथ्स, झालर, खुर्च्या भाडे, क्रेन खर्च भाडोत्री मालवाहतुक. कार्या. वाहन खर्च | प्रसादालय, वाहन विभाग | ४०,००० | ६४,९६९ | १,००,००० |
| ९. | मंदिर व मंदीर परिसर फुलांची सजावट खर्च | बगीचा | २,००,००० | - | - |
| १०. | पार्किग / इतर कार्यक्रम | मालमत्ता विभाग | -- | -- | २,००,००० |
| | | एकूण रुपये - | ६४,६५,००० | ६२,७०,४६९ | १,४९,१५,००० |

विभागाचा अभिप्राय– श्री साईबाबा शताब्दी वर्षाची सांगता श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवाने होणार असल्याने, पुण्यतिथी उत्सवातील खर्च काही अंशी वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

प्रस्ताव- तरी उपरोक्त प्रमाणे श्री पुण्यतिथी उत्सव-२०१८ साजरा करणेस,त्यासाठी वरीलप्रमाणे कार्यवाही करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रु. १,४९,१५,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी, एकोणपन्नास लाख, पंधरा हजार) मात्र चे खर्चास मान्यतामिळणेसाठी सादर.

निर्णय क्र.५०८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव–२०१८ साजरा करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. १,४९,१५,०००/- मात्र चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही -शताब्दी कक्ष प्रमुख)**

---

**विषय नं.४ श्री पुण्यतिथी उत्सव–२०१८ कीर्तनकार ठरविणे व मानधन निश्चित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानमार्फत साजरा होणा-या श्री पुण्यतिथी उत्सव २०१८ मध्ये (दि. १७,१८,१९ ऑक्टोबर २०१८) मध्ये खालील कीर्तनकार यांनी कीर्तन सेवेची संधी मिळणेबाबतइमेलव्दारे विनंती केली आहे. तीन दिवसांचे तीन कीर्तन सेवांचे साथीदारांसह मानधन खालील प्रमाणे.

| अ.नं. | किर्तनकारांचे नाव | प्राप्त झालेले इमेलची तारीख | मानधन |
|---|---|---|---|
| ०१ | ह.भ.प. प्रशांत धोंड, शंकरवाडी, सिंधुदुर्ग | दि. ०८.०८.२०१८ | १८०००/- |
| ०२ | ह.भ.प. विवेक गोखले, नृरसिंहवाडी | दि.०९.०८.२०१८ | ६०,०००/- |
| ०३ | ह.भ.प. डॉ. दिलीप डबीर, नागपुर | दि.१०.०८.२०१८ | १,००,०००/- |
| ०४ | ह.भ.प. समीहन चन्द्रशेखर आठवले, पंढरपुर | दि.११.०८.२०१८ | संस्थान देईल ते |

संस्थानतर्फे साजरे केल्या जाणा-या उत्सवातील कीर्तन मंदिराच्या उत्तर बाजूच्या स्टेजवर होते.

ह.भ.प. दासगणू महाराज प्रतिष्ठाण, गोरटे यांनी पाठविलेल्या कीर्तनकाराचे कीर्तन श्री रामनवमी उत्सवात ठेवण्यात येते ही परंपरा ह.भ.प. दासगणू महाराज यांनी स्वतः रामनवमी उत्सवात कीर्तन सेवा देण्यास सुरुवात केल्यापासून आजतागायत अखंडीत सेवा चालू आहे. त्यानुसार ह.भ.प. दासगणू महाराज प्रतिष्ठाण, गोरटे यांनी पाठविलेल्या कीर्तनकाराचे कीर्तन रामनवमी उत्सवात परंपरेनुसार ठेवले जाते.

संस्थानमार्फत गुरुपौर्णिमा व पुण्यतिथी उत्सवात कीर्तनकारांचे प्राप्त झालेल्या सर्व अर्ज एकत्रित करुन कीर्तनकारांचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेत ठेवण्यात येतो, सदर प्रस्तावावर चर्चा होऊन योग्य कीर्तनकाराची निवड व मानधनाबाबत निर्णय घेण्यात येतो.

श्री गुरुपौर्णिमा व श्री पुण्यतिथी उत्सवात श्री रामनवमी उत्सवाप्रमाणे कोणत्याही कीर्तनकाराची कीर्तन सेवा करण्याची परंपरा नाही. मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे कीर्तनकाराची निवड केली जाते.

**श्री पुण्यतिथी उत्सवात सेवा दिलेल्या कीर्तनकारांची नांवे खालीलप्रमाणे..**

| अ.नं. | कीर्तनकाराचे नाव | पुण्यतिथी उत्सवात कीर्तन सेवा दिलेले साल |
|---|---|---|
| ०१ | ह.भ.प.शरद महाराज नेरळकर, नांदेड | दि.१/१०/२००६ ते दि.४/१०/२००६ |
| ०२ | ह.भ.प.शरद महाराज नेरलकर नांदेड | दि.२०/१०/२००७ ते दि.२३/१०/२००७ |
| ०३ | ह.भ.प.मंदार गंगाधर व्यास, डोंबीवली | दि.८/१०/२००८ ते दि.१०/१०/२००८ |
| ०४ | ह.भ.प. मनोहर दिक्षीत, औरंगाबाद | दि.२७/०९/२००९ ते दि.२९/०९/२००९ |
| ०५ | ह.भ.प.श्री. शरद महाराज नेरलकर, नांदेड | दि.१६/१०/२०१० ते दि.१९/१०/२०१० |
| ०६ | ह.भ.प.श्री.मनोहर महाराज, कोकलेगांवकर | दि.५/१०/२०११ ते दि.८/१०/२०११ |
| ०७ | ह.भ.प.मनोहर वा.कोकलेगांवकर, नांदेड | दि.२३/१०/२०१२ ते दि.२६/१०/२०१२ |
| ०८ | ह.भ.प. मनोहरबुवा बाळकृष्ण दिक्षित, औरंगाबाद | दि.१२/१०/२०१३ ते दि.१४/१०/२०१३ |
| ०९ | ह.भ.प. मनोहरबुवा बाळकृष्ण दिक्षित , औरंगाबाद | दि. ०२/१०/२०१४ ते दि. ०४/१०/२०१४ |
| १० | ह.भ.प. समीहन चन्द्रशेखर आठवले, पंढरपुर | दि. २१/१०/२०१५ ते दि. २४/१०/२०१५ |
| ११ | ह.भ.प. मंदार गंगाधर बुआ व्यास, डोंबिवली | दि.१०/१०/२०१६ ते दि.१३/ १०/ २०१६ |
| १२ | ह.भ.प. समिहन चन्द्रशेखर आठवले, पंढरपुर | दि.२९/०९/२०१७ ते दि.०२/१०/२०१७ |

श्री पुण्यतिथी उत्सव २०१७ मध्ये केलेल्या कीर्तनकारास चार दिवसाचे मानधन १५,००१/- देण्यात आले होते.

**विभागाचा अभिप्राय:-** श्री पुण्यतिथी उत्सव २०१८ मध्ये कीर्तनाची संधी मिळणेसाठी अर्ज केलेल्या चार कीर्तनकारांपैकी ह.भ.प.आठवले यांचे कीर्तन पुण्यतिथी उत्सव २०१७ मध्ये झालेले आहे. उर्वरीत तीन कीर्तनकारांपैकी २ कीर्तनकार ह.भ.प. विवेक गोखले व ह.भ.प. डॉ. दिलीप डबीर, हे नामवत कीर्तनकार असून ह.भ.प.प्रशांत धोंड यांचेबाबत फारशी प्रसिध्दी दिसत नाही. त्यामुळे फक्त दोन नामंवत कीर्तनकारांची नावे शिल्लक राहिली आहेत.

शताब्दी वर्षाची सांगता पुण्यतिथी उत्सवाने होणार असल्याने येणा-या पुण्यतिथी उत्सवात नेहमीप्रमाणे सर्वसाधारण कीर्तनकारांची कीर्तने ठेवणेऐवजी प्रसिद्ध् नामवंत किर्तनकाराचे कीर्तन ठेवल्यास शताब्दी वर्षात साईभक्तांना कीर्तनातून एक वेगळया प्रकाराचे प्रबोधन होऊ शकेल.

श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१८ मध्ये नामवंत कीर्तन ह.भ.प.चारुदत्त आफळे यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले होते. त्यांना मानधन रु.५१,०००/- आदा करण्यात आले होते.

श्रींचे समोर कार्यक्रम सादर करणा-या कीर्तनकार, प्रवचनकार, कलाकार यांची संस्थानमार्फत मोफत निवास, भोजन, चहापाणी, नाष्टा, दर्शन इ. सुविधा करणेबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दि.०७/०३/२०१८ रोजीचे सभेत निर्णय क्र.१५१ झालेला आहे.

**प्रस्ताव**–तरी श्री पुण्यतिथी उत्सवासाठी कीर्तनाची संधी मिळणेसाठी आलेल्या अर्जातून एका कीर्तनकाराचे नाव व मानधन निश्चित करणेसाठी सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.५०९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री पुण्यतिथी उत्सव–२०१८ साठी अनुभवी कीर्तनकाराची निवड करण्यात यावी, तसेच समिती सदस्य मा.ॲड मोहन जयकर साहेब यांनी नावे सुचवावीत, असे ठरले.**

**(कार्यवाही- शताब्दी कक्ष प्रमुख)**

---

विषय नं.५ **संस्थानचे साईउद्यान इमारतीमधील हॉलकडील बाजुचे टॉयलेट ब्लॉक नुतनीकरण करणेसाठी रु.३७,३३,१११/- इतक्या अपेक्षित अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता देणे.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद**-अधिनियमाचे कलम १७ मधील पोटकलम (१) मध्ये " भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देण्याची तरतुद आहे. तसेच

अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये "मंदिराच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना**– साईउद्यान इमारतीचे हॉल्स व खोल्यांकरीता प्रत्येक मजल्यावर जनरल संडास बाथरुमची व्यवस्था करण्यात आलेली आहे. सदर ठिकाणी असलेल्या पाणीपुरवठा लाईन्स, ड्रेनेज लाईन्स या जुन्या झालेल्या आहेत.त्यामुळे काही ठिकाणी पाण्याची गळती होते. याकरीता सदर लाईन्स तसेच संडास भांडे बदलणे, टाईल्स बदलणे, वॉटरप्रुफींग करणे, दरवाजे बदलणे इ. कामे करणे आवश्यक आहे. सदर इमारतीमधील खोल्यांकरीता असलेल्या जनरल टॉयलेटचे नूतनीकरण सन २०१४ मध्ये पूर्ण करण्यात आलेले आहे. हॉल्स बाजूकडील टॉयलेट ब्लॉकचे नूतनीकरणाचे काम करणे बाकी आहे. साईभक्तांचे सुविधेकरीता सदर नूतनीकरण काम करणे आवश्यक आहे.

हॉल्स बाजुकडील टॉयलेट ब्लॉक नूतनीकरण करणेकामी सार्वजनिक बांधकाम विभागाचे ईएसएसआर- २०१७-२०१८ चे दरसुचीनुसार खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| No | Description | Quantity | Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Removing existing Dado tiles | 535.47 | Sqm | 24 | 12851.20 |
| 2 | Removing brick bat waterproofing along with flooring tiles | 60.38 | Cum | 342 | 20650.00 |
| 3 | Removing door frames | 72 | No | 84 | 6048.00 |
| 4 | Removing ventilator (w/c & bath) | 80 | No | 70 | 5600.00 |
| 5 | Providing & laying waterproofing for w/c,bath, passage &basin area | 323.67 | Cum | 711 | 230129.00 |
| 6 | P & L Vitrified tiles for flooring | 263.39 | Sqm | 1293 | 340563.00 |
| 7 | P & L Ceramic tiles having size 30 cm x60 cm | 807.801 | Sqm | 1018 | 822341.00 |
| 8 | P & F steel ventilator | 44.64 | Sqm | 1933 | 86289.10 |
| 9 | P & F steel window | 25.92 | Sqm | 3055 | 79185.60 |
| 10 | P & F granite door frame15 cm wide | 105.3 | Sqm | 3380 | 355914.00 |
| 11 | P & F 30 mm thk. Solid PVC panel internal door shutter | 88.92 | Sqm | 3930 | 349456.00 |
| 12 | P & F Orissa type white glazed earthware 575 mmW/C pan | 36 | No | 2570 | 92520.00 |
| 13 | P & F 10 cm PVC Nahani Trap | 80 | No | 329 | 26320.00 |
| 14 | P & F white glazed earthenware WASH HAND BASIN of 55 cm x40 cm | 20 | No | 3266 | 65320.00 |
| 15 | P & F 32 mm dia. Flush valve | 56 | No | 3750 | 210000.00 |
| 16 | P & F C.P. BIB cock | 80 | No | 846 | 67680.00 |
| 17 | P & F CPVC pipe of various sizes | | | | |
| | i) 15 mm dia | 63 | Rmt | 147 | 9261.00 |
| | ii) 25 mm dia | 35.6 | Rmt | 209 | 7440.40 |
| | iii) 32 mm dia | 103.8 | Rmt | 262 | 27195.60 |
| | iv) 40 mm dia | 24 | Rmt | 336 | 8064.00 |
| | v) 50 mm dia | 50 | Rmt | 491 | 24550.00 |
| 18 | P & F SWR Pipe110 mm dia. | 98.8 | Rmt | 485 | 47918.00 |
| 19 | P & F SWR Pipe 75 mm dia. | 98.8 | Rmt | 350 | 34580.00 |
| 20 | Disposal of debris up to 3 km | 115 | Cum | 83.3 | 9581.80 |

| | | |
|---|---|---|
| | Total Amount(A) | 2939458.00 |
| | Contingencies- on (A) 4% on (A) | 1,17,578.00 |
| | Centage Charges- 5% on (A) | 1,46,973.00 |
| | GST @ 18 % on (A) | 5,29,102.00 |
| | TOTAL :- | 37,33,111.00 |

**विभागाचा अभिप्राय** – साईउद्यान इमारतीचे बांधकाम होऊन ३८ वर्षे झालेली आहेत. सदरहू इमारतीचे हॉल्सच्या बाजुचे टॉयलेट ब्लॉकमधील पाण्याच्या लाईन्स, ड्रेनेज लाईन्स, दरवाजे व टाईल्स जुन्या झालेल्या आहेत. त्यामुळे काही ठिकाणी पाण्याची गळती होते. करीता टॉयलेट ब्लॉकचे नूतनीकरण करणे आवश्यक आहे.

**प्रस्ताव** – संस्थानचे साईउद्यान इमारतीमधिल हॉल्सकडील बाजुच्या जनरल टॉयलेट ब्लॉकचे नूतनीकरण करणेसाठी वर नमूद केलेप्रमाणे येणा-या रु. ३७,३३,१११/- लक्ष मात्र इतक्या अपेक्षित अंदाजपत्रकीय खर्चास व सदर कामासाठी वर्तमानपत्रातील जाहीरातीव्दारे ई-निविदा मागविणेस मान्यतेकरीता सदरहू प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.५१० **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईउद्यान इमारतीमधील हॉल्सकडील बाजुच्या जनरल टॉयलेट ब्लॉकचे नुतनीकरण करणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्यासाठी येणाऱ्या रक्कम रु.३७,३३,१११/- मात्र अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

---

विषय नं.६ **"श्री पुण्यतिथी उत्सव-२०१८" करीता (श्रीसाईबाबा समाधी महोत्सव) श्री साई मंदिर, मंदिर परिसरात करावयाचे १० दिवस विद्युत रोषणाईसाठी व येणाऱ्या खर्चाबाबत.**

प्रस्ताव- अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करण्यात येईल :-

२१. (१) समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करण्यात येईल.

(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन ;

(ख) रुढीनुसार व प्रथेनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे ;

(ग) भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनसाठी व प्राथनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे;

वरील अधिनियम २१ (१) (ख) व शासन निर्णयास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांचेमार्फत रामनवमी उत्सवात, श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवात ह्या दोन्ही उत्सवात ०३ दिवस संपुर्ण मंदिर व परिसरात विद्युत रोषणाई केली जाते.

श्री रामनवमी उत्सव व श्री पुण्यतिथी उत्सव या दोन्ही उत्सवात विद्युत रोषणाई व देखावा उभा करण्यासाठी (ट्रान्सपोर्ट + मटेरियल भाडे + इंधन वगैरे ) प्रत्येक उत्सवात मिळून रु. ८ ते ९ लाख खर्च संस्थानमार्फत केला जातो. परंतु उत्सवात उभारण्यात येणा-या देखाव्यासाठी यापेक्षा जास्त खर्च येत असतो व त्याचा खर्च श्री व्दारकामाई मंडळाचे सहकारी स्वत: सहन करत असतात.

श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांनी आता दि.२७-०७-२०१८ रोजी एक व दि.२८-०७-२०१८ अशी दोन पत्रे संस्थानकडे सादर केली असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

दि.२७-०७-२०१८ रोजीचे पत्र.

विषय :- "श्री पुण्यतिथी उत्सव-२०१८" विद्युत रोषणाई आणि सजावट करण्याबाबत . . . .

मा.महोदया,

श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०१८ मध्ये प्रतिवर्षाप्रमाणे आम्ही, श्री व्दारकामाई मंडळ, याहीवर्षी विद्युत रोषणाई व सजावट करण्यास येत आहोत.

" श्री व्दारकामाई मंडळाचे आद्य संस्थापक कै.बारकुशेठ मांडवकर हे असून कै.बारकुशेठ मांडवकर यांनी संकल्प सोडल्याप्रमाणे व त्यांनी सुरु करुन दिलेल्या प्रथेनुसार गेल्या चाळीस वर्षापासून श्री साईबाबांच्या श्री रामनवमी उत्सव व गेल्या पंचवीस वर्षापासून श्री पुण्यतिथी उत्सव-दसरा उत्सव या उत्सवांमध्ये श्री साई भक्तांमध्ये

तसेच शिर्डीच्या पंचक्रोशीतील जनतेमध्ये उत्साहवर्धक वातावरणाची निर्मिती व्हावी तसेच मनाला आल्हाददायक वाटावे, त्याचबरोबर प्रबोधनही व्हावे, धार्मिक गोष्टींची माहिती व्हावी, यासाठी मुंबई येथून येऊन नयनरम्य विद्युत रोषणाई व प्रबोधनकारी देखावे सादर करण्याचे, आम्ही, श्री व्दारकामाई मंडळाच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न करीत आहोत. कै.बारकुशेठ मांडवकर यांनी दाखविलेल्या समाजसेवेच्या पायवाटेवरुन ही अल्पशी सेवा आम्ही श्री साई चरणी रुजू करीत असतो.

श्री व्दारकामाई मंडळ हे कै.बारकुशेठ मांडवकर यांचे नेतृत्वाखाली १५ ते २० विविध व्यवसायातील साईभक्तांनी एकत्र येऊन स्थापन झालेले आहे. त्यांचेमार्फत मुंबईतील विविध ठिकाणचे डेकोरेटर्स व त्यांचे कलाकार यांना एकत्र जमवून त्यांना शिर्डी येथे आणून विद्युत रोषणाई व सजावट करण्याचा प्रयत्न श्री व्दारकामाई मंडळ सतत करीत आहे.

श्री व्दारकामाई मंडळ हे हौशी साईभक्तांचे मंडळ आहे. या मंडळामार्फत कोणत्याही स्वरुपाचा व्यवसाय केला जात नाही. तसेच हे मंडळ श्री साईंची सेवा घडावी म्हणून फक्त शिर्डी येथील उत्सवाचे वेळीच एकत्र येऊन विद्युत रोषणाई करीत असते. यामध्ये व्यवसायाचा संबंध नसल्याने श्री व्दारकामाई मंडळाचे रजिस्ट्रेशन करण्याचा आजपर्यंत प्रसंग उदभवला नाही.

श्री व्दारकामाई मंडळाचे संचालक हे उत्सवाचे वेळी मुंबईच्या विविध भागातील विविध डेकोरेटरर्सशी प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष, फोनव्दारे संपर्क साधून त्यांना शिर्डी येथील उत्सवाचे वेळी एकत्र आणून उत्सवातील विद्युत रोषणाई करण्याचा प्रयत्न करीत असते. हे विविध डेकोरेटर्स तसेच त्यांचे कर्मचारी, त्यांचे अत्यंत नाजूक विविध रोषणाईचे साहित्य हे शिर्डी येथे सुखरुप आणणे, देखाव्यासाठी लागणा-या फळया शिर्डी येथे मुंबई येथून भाडयाने आणणे, उत्सवातील काळात डेकोरेटर्स व कर्मचारी यांचे औषधपाणी व त्यांचे किरकोळ वैयक्तिक खर्च, उत्सवात रोषणाई करतांना त्यांना लागणारे किरकोळ साहित्य हे सर्व खर्च रोखीने करणे, तसेच उत्सव संपल्यानंतर प्रत्येक डेकोरेटर्सला मंडळातर्फे भेट वस्तू देणे व पुन्हा मुंबईस सुखरूप नेणे ही सर्व कामे श्री व्दारकामाई मंडळ करीत असते.

सन १९८९ पर्यंत श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांचेमार्फत फक्त श्री रामनवमी उत्सवात विद्युत रोषणाई केली जात होती. तसेच विविध देखावे (एकाच वेळी अनेक) उभे केले जात होते. परंतू सन १९८९ साली ७० व्या पुण्यतिथी उत्सवात मा.व्यवस्थापन मंडळाने विद्युत रोषणाई करावयाची ठरविल्याने त्यावेळी कोटेशन मागविले असता फक्त विद्युत रोषणाईकामी बाहेरील डेकोरेटर्स / कॉन्ट्रॅक्टर्सनी फार मोठया रकमेची मागणी केली होती. त्यामुळे तत्कालीन मा.व्यवस्थापन मंडळाने श्री व्दारकामाई मंडळालाच ७० व्या पुण्यतिथीला विद्युत रोषणाई करण्यासाठी स्वत:हून निमंत्रित केले होते. व तेव्हापासून आतापर्यंत झालेल्या सर्व पुण्यतिथी उत्सवांमध्ये श्री व्दारकामाई मंडळामार्फतच विद्युत रोषणाई करण्यात येऊन व देखावे उभारण्यात आले होते.

श्री पुण्यतिथी-दसरा उत्सवाचे वेळी मुंबई येथे नवरात्र उत्सव मोठया प्रमाणात साजरा केला जात असल्या कारणाने डेकोरेटर्सचे साहित्य डेकोरेटर्सनी विविध ठिकाणी ऑर्डर्स् घेतलेल्या असल्याने गुंतलेले असते. त्यामुळे श्री पुण्यतिथी-दसरा उत्सवात शिर्डी येथे विद्युत रोषणाई करण्यासाठी श्री व्दारकामाई मंडळाला बाजारातून भाडयाने रोख रक्कम देऊन रोषणाईचे सामान आणावे लागते. कधीकधी रोषणाई करताना अचानक साहित्य कमी पडल्यास तातडीने मुंबई येथे माणूस पाठवून साहित्य मागवावे लागते.

परंतू यावर्षी १० दिवस श्री पुण्यतिथी-दसरा उत्सव साजरा होत असल्याने त्यादृष्टीने आम्ही तयारी केली असून नवरात्राचे अगोदरच आमचे कलाकार शिर्डीत दाखल होऊन कामास सुरुवात करणार आहेत. नवरात्राचे पहीलेच दिवशी सर्व काम पूर्ण होऊन विद्युत रोषणाई चालू झालेली असेल व विद्युत रोषणाई ही दरवर्षीपेक्षा मोठया (जादा) प्रमाणात करणार आहोत.

श्री साईबाबांचे मंदीर व संस्थान मंदीर परिसर याठिकाणी विद्युत रोषणाई व देखावा उभा करण्यासाठी सजावट करण्याकरीता श्री साईबाबा संस्थानमार्फत खालीलप्रमाणे व्यवस्था करण्याची आम्ही आपणास विनंती करीत आहोत. तसेच,

(०१). साहित्याची ने-आण करण्याकरीता हूड असलेल्या भाडोत्री ११ (अकरा) ट्रक आणि श्री साईबाबा संस्थानचा मोठा ट्रक मिळावा.

(०२). उत्सव काळात ०४ नग भाडोत्री जनसेट (१२५ केव्हीएचे)-१२ दिवसाकरीता मिळावेत.बाकीच्या व्यवस्थेबाबत (रुम, व इत्यादि) तसेच लागणा-या खर्चाबाबत आम्ही नंतर सविस्तर लवकरच कळवित आहोत. मटेरिअल मुंबईहून आणतेवेळी दोन ते तीन टप्प्यात आणावे लागणार आहे. यासाठी ट्रका पाठविण्यासाठी तपशीलवार तारीख नंतर कळवित आहोत.

श्री साईबाबा संस्थानचे मा.अध्यक्ष साहेब, मा.उपाध्यक्ष साहेब, मा.विश्वस्त, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया, मा.उपजिल्हाधिकारी, मा.उपकार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी आणि कर्मचारी यांचे गेल्या अनेक वर्षापासून श्री व्दारकामाई मंडळाला उत्तम प्रकारे मार्गदर्शन व सहकार्य मिळत आहे आणि श्री साईच्छेनुसार यापुढेही मिळत राहो, ही श्रींचे चरणी प्रार्थना.

०२). दि.२८-०७-२०१८ रोजीचे पत्र.

विषय:- "श्री पुण्यतिथी उत्सव-२०१८" विद्युत रोषणाई आणि सजावट करण्यासाठी लागणा-या खर्चाबाबत....

मा.महोदया,

श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०१८ मध्ये विद्युत रोषणाई व सजावट करण्याच्या निमित्ताने प्रतिवर्षाप्रमाणे आम्ही याहीवर्षी विद्युत रोषणाई व सजावट करण्यास येत आहोत.

श्री साईबाबांचे मंदीर व संस्थान मंदीर परिसर या सर्व ठिकाणी विद्युत रोषणाई व देखावा उभा करण्यासाठी सजावट करण्याकरीता श्री साईबाबा संस्थानमार्फत खालीलप्रमाणे व्यवस्था करण्याची आम्ही आपणास विनंती करीत आहोत व लागणा-या खर्चाचा तपशिल देत आहोत.

| अ.क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १ | २३० कलाकारांचे जाणे येणे सह एस.टी.प्रवास भाडे (येणे व जाणेसह) रु. ४७० x २३० x २ | २,१६,२००/- |
| २ | विद्युत रोषणाईसाठी सिरिंज, वायर, स्पॉट लाईट, हॅलोजन, मेटल हॅलाईड, पार लाईटस, टक्कर, मिक्सर व इतर भाडोत्री साहित्य (१० दिवसाकरीता) | २,५०,०००/- |
| ३ | देखाव्यासाठी प्लॅस्टर ऑफ पॅरीस, भाडोत्री लाकडी फळया, तसेच प्लायवुड, फ्रेम कपडा, भुसा, कलथान, लाकडी फ्रेम, पी.ओ.पी., मोल्डींग्ज व इतर साहित्य हमाली, उतराई, भराई, चढाई वगैरे (यात देखाव्यासाठी लागणा-या जादा लागणा-या इतर खर्चाचा समावेश नाही. तो आम्ही सहन करणार आहोत.) (१० दिवसाकरीता) | ३,११,०००/- |
| ४ | मुख्य देखावा उत्सवानंतर काही दिवस भक्तांना पाहण्यासाठी ठेवावा लागतो, त्यानंतर देखावा काढणेसाठी आणाव्या लागणा-या कलाकारांचे गाडी भाडे परतीसह ( रु. ४७० x रु. ४० x २ ) | ०,३७,६००/- |
| | एकुण रक्कम रु. :- | ८,१४,८००/- |

श्री पुण्यतिथी-दसरा उत्सवाचे वेळी मुंबई येथे नवरात्र उत्सव मोठया प्रमाणात साजरा केला जात असल्या कारणाने डेकोरेटर्सचे साहित्य डेकोरेटर्सनी विविध ठिकाणी ऑर्डर्स् घेतलेल्या असल्याने गुंतलेले असते. त्यामुळे श्री पुण्यतिथी-दसरा उत्सवात शिर्डी येथे विद्युत रोषणाई करण्यासाठी श्री व्दारकामाई मंडळाला बाजारातून भाडयाने रोख रक्कम देऊन रोषणाईचे सामान आणावे लागते. कधीकधी रोषणाई करताना अचानक साहित्य कमी पडल्यास तातडीने मुंबई येथे माणूस पाठवून साहित्य मागवावे लागते. त्याकामी संस्थानकडून रोख रक्कम मिळणे अपेक्षित असते. तसेच,

(०१). कलाकारांना राहण्यासाठी उत्सव चालू होण्यापुर्वी (काम चालू असताना) देखावा उभे करणारे कलाकार तसेच विद्युत रोषणाई करणारे यांच्यासाठी २५ खोल्या व उत्सव कालावधीत २५ ऐवजी फक्त १५ खोल्या मिळाव्यात.

(०२). रोषणाईचे साहित्य ठेवण्यासाठी अंदाजे ४० फूट x २० फूटाचा एक हॉल मंदीराचे परीसरात मिळावा.

(०३). प्रतीवर्षाप्रमाणे सर्व कलाकारांना तीन वेळचा चहा, सकाळचा नाष्टा, व दोन वेळचे जेवण याची सोय व्हावी.

(०४). गोल्टे-०६ फूटी ५० नग, ०८ फूटी ५० नग, १० फूटी ५० नग, १२ फूटी ५० नग उत्सवाच्या कालावधीत मिळावेत.

श्री साईबाबा संस्थानचे मा.अध्यक्ष साहेब, मा.उपाध्यक्ष साहेब, मा.विश्वस्त, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया, मा.उपजिल्हाधिकारी, मा.उपकार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी आणि कर्मचारी यांचे गेल्या अनेक वर्षापासून श्री व्दारकामाई मंडळाला उत्तम प्रकारे मार्गदर्शन व सहकार्य मिळत आहे आणि श्री साईच्छेनुसार यापुढेही मिळत राहो, ही श्रींचे चरणी प्रार्थना.

उत्सवामध्ये उभारण्यात येणा-या एका देखाव्यासाठी रु.१० ते १५ लाख (विद्युत रोषणाई व्यतिरिक्त) इतका जवळपास खर्च येतो व हा खर्च श्री व्दारकामाई मंडळाचे सहकारी स्वत: करतात, असे श्री व्दारकामाई मंडळाचे संचालक यांनी तोंडी सांगितले आहे. यामध्ये भाडोत्री फळया, पी.ओ.पी. तसेच फ्रेम कपडा, लाकडी फ्रेम, लोखंडी फ्रेम, मोल्डींग्ज तयार करणे, साचे तयार करणे, कंथन लावणे, कलर करणे, मुर्त्या मुंबईतून आणून त्या उभ्या करणे इत्यादि कामे करावी लागतात. प्रत्येक श्री रामनवमी उत्सव व श्री पुण्यतिथी उत्सव यामध्ये वेगवेगळे देखावे सादर केले जातात. एकाच प्रकारचा देखावा पुन्हा रिपीट केला जात नाही.

श्री पुण्यतिथी उत्सव-२०१७ मध्ये चार दिवसाकरीता विद्युत रोषणाई व उभारण्यात आलेल्या देखावा करीता श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांना रक्कम रु. ७,११,९२०/- इतकी संस्थानमार्फत अदा करण्यात आलेली आहे. तसेच मटेरियल वाहतुकीसाठी प्रती ट्रक रु.२९,०००/- (रु.एकोणतीस हजार) मात्र प्रमाणे ८ (आठ) ट्रक्सचे भाडे रु.२,३२,०००/- इतका खर्च आलेला आहे. उत्सव कालावधीतील डिझेल जनसेट इंधनकामी रक्कम रु. ९१,९६५/- श्री पुण्यतिथी उत्सव-२०१७ करीता (विद्युत रोषणाई व देखावा खर्च + मटेरियल वाहतुक खर्च + इंधन खर्च) सर्व मिळून एकत्रित खर्च रक्कम रु. १०,३५,८८५/- झालेला आहे.

प्रत्येक उत्सवाचे खर्चाबाबत प्रशासन शाखेच्या वशी-०५ मार्फत संस्थानच्या सर्व विभागांकडून अपेक्षित खर्चाचा व मागील वर्षी झालेल्या खर्चाचा तपशिल मागवून घेऊन तो एकत्रित करुन वशी-०५ मार्फत मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे तो मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला जात असतो.

यावर्षी बांधकाम-शताब्दी कडे (बांधकाम-शताब्दी कडील पत्र क्र.एसएसएस / बांधकाम-शताब्दी / १०१ / २०१८ दि.१३-०४-२०१८) विद्युत विभागामार्फत दि.१६-०४-२०१८ रोजी खालीलप्रमाणे खर्चाचा तपशिल कळविण्यात आला होता.

| अ.क्र. | तपशील | श्री पुण्यतिथी उत्सव-२०१७ साठी अपेक्षित खर्च (उत्सवाचा कालावधी ४ दिवस) | श्री पुण्यतिथी उत्सव-२०१७ मध्ये झालेला खर्च (४ दिवसासाठी) | श्री पुण्यतिथी उत्सव-२०१८ साठी अपेक्षित खर्च (१० दिवसासाठी) |
|---|---|---|---|---|
| १ | विद्युत रोषणाई + देखावा + कलाकारांचे येणेजाणेचे भाडे +विद्युत रोषणाईचे साहित्य+मटेरियल वाहतुक खर्च | रु. ८,००,०००/- | रु. ७,११,९२०/- | रु. २०,००,०००/- |
| २ | भाडोत्री जनसेट भाडे / इंधन खर्च | रु. २,५०,०००/- | रु. ३,२३,९६५/- | रु. ७,००,०००/- |
| | एकुण :- | रु. १०,५०,०००/- | रु. १०,३५,८८५/- | रु. २७,००,०००/- |

श्री पुण्यतिथी उत्सव-२०१८ मध्ये करावयाच्या विद्युत रोषणाईच्या अंदाजित खर्चाबाबत श्री व्दारकामाई मंडळ यांनी खालीलप्रमाणे खर्च कळविलेला आहे. या श्री पुण्यतिथी उत्सव-२०१८ मध्ये एकुण १० दिवस विद्युत रोषणाई करणार असून ही विद्युत रोषणाई (श्री साईचे समाधी शताब्दी वर्ष असल्या कारणाने) मोठया प्रमाणावर करणार आहे.

श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांनी श्री पुण्यतिथी उत्सव-२०१८ करीता कळविलेला खर्च :-

(श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांना संस्थानकडून अदा करावी लागणारी रक्कम)

| अ.क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १ | २३० कलाकारांचे जाणे येणे सह एस.टी.प्रवास भाडे (येणे व जाणेसह) रु. ४७० x २३० x २ | २,१६,२००/- |
| २ | विद्युत रोषणाईसाठी सिरिंज, वायर, स्पॉट लाईट, हॅलोजन, मेटल हॅलाईड, पार लाईटस, टक्कर, मिक्सर व इतर भाडोत्री साहित्य (१० दिवसाकरीता) | २,५०,०००/- |
| ३ | देखाव्यासाठी प्लॅस्टर ऑफ पॅरीस, भाडोत्री लाकडी फळया, तसेच प्लायवुड, फ्रेम कपडा, भुसा, कलथान, लाकडी फ्रेम, पी.ओ.पी., मोल्डींग्ज व इतर साहित्य हमाली, उतराई, भराई, चढाई वगैरे (त्यात देखाव्यासाठी लागणा-या जादा लागणा-या इतर खर्चाचा समावेश नाही. तो आम्ही सहन करणार आहोत.) (१० दिवसाकरीता) | ३,११,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ४ | मुख्य देखावा उत्सवानंतर काही दिवस भक्तांना पाहण्यासाठी ठेवावा लागतो, त्यानंतर देखावा काढणेसाठी आणाव्या लागणा-या कलाकारांचे गाडी भाडे परतीसह ( रु. ४७० x रु. ४० x २ ) | ०,३७,६००/- |
| | एकुण रक्कम रु.:- | ८,१४,८००/- |

ब) याव्यतिरिक्त श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांनी मागणी केल्याप्रमाणे ११ नग भाडोत्री ट्रक, १२५ केव्हीए क्षमतेचे ०४ नग भाडोत्री जनसेट तसेच जनरेटरसाठी लागणारे इंधन, संस्थानचे टेम्पोसाठी मुंबई येथे जाणे व येणेसाठी लागणारे इंधन, टोल व भाडोत्री २०० नग गोल्टे यासाठी अपेक्षित खर्च खालीलप्रमाणे:-

| अ.क्र. | तपशील | अपेक्षित खर्च |
|---|---|---|
| १ | ११ नग भाडोत्री ट्रकसाठी अपेक्षित खर्च<br>(रु. ३०,०००/- x ११ भाडोत्री ट्रक) | रु. ३,३०,०००/- |
| २ | ०४ नग भाडोत्री जनरेटरसाठी अपेक्षित खर्च १२ दिवस<br>(रु. ७,५००/- x १२ दिवस x ४ जनसेट) | रु. ३,६०,०००/- |
| ३ | भाडोत्री जनरेटरसेट करीता अपेक्षित इंधन खर्च (१२ दिवसाकरीता) | रु. ३,००,०००/- |
| ४ | संस्थानचे टेम्पोकरीता मुंबई येथे जाणे व येणेसाठी अपेक्षित इंधन खर्च<br>(प्रति फेरी रु.५,५२५/- x ४ फे-या = रु. २२,१००/-) +<br>टोलचा खर्च (प्रति फेरी रु.५००/- x ४ फे-या = रु. २,०००/-) | रु. ०,२४,१००/- |
| ५ | २०० नग भाडोत्री गोल्टेसाठी लागणारा अपेक्षित खर्च<br>(गोल्टे संख्या २०० नग x दर रु. २.५० x ३६ दिवस) | रु. ०,१८,०००/- |
| | एकुण अपेक्षित खर्च रक्कम :- | रु. १०,३२,१००/- |

क) संस्थानमार्फत श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांना पुरविणेकामी निवासस्थान, नाष्टा व चहा यासाठी अपेक्षित खर्च खालीलप्रमाणे:-

| अ.क्र. | तपशील | अपेक्षित खर्च |
|---|---|---|
| १) | (अ). उत्सवाचे अगोदर साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथे निवासव्यवस्थेसाठी लागणारा अपेक्षित खर्च कालावधी दि.२४-०९-२०१८ ते दि.१६-१०-२०१८ अखेर २५ रुम्स् (२५ रुम्स् x२३ दिवस x भाडे रु.१५०/-प्रतिदिन=रु.८६,२५०/-)<br>(ब). उत्सव काळात साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथे निवासव्यवस्थेसाठी लागणारा अपेक्षित खर्च कालावधी दि.१७-१०-२०१८ ते दि.२१-१०-२०१८ अखेर १५ रुम्स्(१५ रुम्स् x०५ दिवस xभाडे रु.१५०/-प्रतिदिन = रु.११,२५०/-) | रु. ९७,५००/- |
| २) | (अ). दि.२४-०९-२०१८ ते ०४-१०-२०१८ अखेर नाष्टा पाकिटे साठी येणारा अपेक्षित खर्च.<br>( कलाकार संख्या १५० x ११ दिवस x दर रु. ५/-= रु. ८,२५०/-)<br>(ब). दि.०५-१०-२०१८ ते २१-१०-२०१८ अखेर नाष्टा पाकिटे साठी येणारा अपेक्षित खर्च.<br>( कलाकार संख्या ८० x १७ दिवस x दर रु. ५/- = रु. ६,८००/-) | रु. १५,०५०/- |
| ३) | (अ). दि.२४-०९-२०१८ ते ०४-१०-२०१८ अखेर चहा साठी येणारा अपेक्षित खर्च.<br>(कलाकार संख्या १५० x ११ दिवस x ०३ वेळा x दर रु. २/- = रु. ९,९००/-)<br>(ब). दि.०५-१०-२०१८ ते २१-१०-२०१८ अखेर चहा साठी येणारा अपेक्षित खर्च.<br>(कलाकार संख्या ८० x १७ दिवस x०३ वेळा x दर रु. २/-= रु.८,१६०/-) | रु. १८,०६०/- |
| | एकुण अपेक्षित खर्च रक्कम :- | रु.१,३०,६१०/- |

श्री पुण्यतिथी उत्सव-२०१८ करीता श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांचेकडून विद्युत रोषणाई व देखावा उभारणीकामी उपरोक्तप्रमाणे (अ) रक्कम रुपये ८,१४,८००/- + (ब) रक्कम रुपये १०,३२,१००/- (क) रक्कम रु.१,३०,६१०/-अशी एकुण रक्कम रु.१९,७७,५१०/- इतका अंदाजे खर्च येणे अपेक्षित आहे.

संस्थानचा ०१ मोठा ट्रक ०४ वेळेस मुंबई येथे वेगवेगळया दिवशी विद्युत रोषणाईचे साहित्य आणणे व पोहोच करणेकामी पाठवावा लागणार आहे. तसेच संस्थानमार्फत देखावा उभारणीकामी गोल्टे ०६ फूटी ५० नग, ०८ फूटी ५० नग, १० फूटी ५० नग, १२ फूटी ५० नग पुरवावे लागणार आहे. तसेच कलाकारांना राहण्यासाठी उत्सव चालू होण्यापुर्वी (काम चालू असताना) देखावा उभे करणारे कलाकार तसेच विद्युत रोषणाई करणारे यांच्यासाठी २५ खोल्या व उत्सव कालावधीत २५ ऐवजी फक्त १५ खोल्या व रोषणाईचे साहित्य ठेवण्यासाठी अंदाजे ४० फूट x २० फूटाचा एक हॉल मंदीराचे परीसरामध्ये विनामुल्य मिळावा अशी श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांनी मागणी केलेली आहे. तसेच प्रतीवर्षाप्रमाणे २३० कलाकारांना तीन वेळचा चहा, सकाळचा नाष्टा, व दोन वेळचे जेवण याची सोय संस्थानमार्फत विनामुल्य करावी असे कळविले आहे.

विभागाचा अभिप्राय:- श्री पुण्यतिथी उत्सव-२०१७ मध्ये ०४ दिवसांकरीता (विद्युत रोषणाई+ देखाव्यासाठी लागणारे सर्व साहित्य+मटेरियल वाहतुक+ भाडोत्री जनसेट+भाडोत्री जनसेटसाठी इंधन खर्च) सर्व मिळून एकत्रित खर्च रक्कम रु.१०,३५,८८५/- इतका झालेला आहे. श्री पुण्यतिथी उत्सव-२०१८ (श्री साई समाधी शताब्दी महोत्सव) मोठया प्रमाणात साजरा करावयाचा असल्याने १० दिवसांकरीता विद्युत रोषणाई व देखावा उभारणीकरीता श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांनी दि.२७-०७-२०१८ व दि.२८-०७-२०१८ रोजीचे पत्रान्वये खर्चाचा प्रस्ताव संस्थानकडे सादर केलेला आहे. सदर उत्सवामध्ये विद्युत रोषणाई व देखावा उभारणीकरीता प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे (अ) रक्कम रु.८,१४,८००/- + (ब) रक्कम रु. १०,३२,१००/- (क) रक्कम रु.१,३०,६१०/- अशी एकुण रक्कम रु.१९,७७,५१०/- इतका अंदाजे खर्च येणे अपेक्षित आहे.

प्रस्ताव:- (०१) श्री पुण्यतिथी उत्सव-२०१८ (श्री साई समाधी शताब्दी महोत्सव) संस्थानमार्फत मोठया प्रमाणात साजरा करावयाचा असल्याने श्री पुण्यतिथी उत्सव-२०१८ मध्ये १० दिवसाकरीता श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांचेकडून मोठया प्रमाणात विद्युत रोषणाई व देखावा उभारणीचे काम करुन घ्यावे किंवा कसे ? किंवा विद्युत रोषणाईसाठी बाहेरील लाईटींग डेकोरेटर्स यांचेकडून ई-निविदा बोलवाव्यात किंवा कसे ? याबाबत निर्णय होणेस विनंती.

(०२) श्री पुण्यतिथी उत्सव-२०१८ मध्ये विद्युत रोषणाई व देखावा उभारणीकरीता प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे (अ) रक्कम रु.८,१४,८००/- + (ब) रक्कम रु. १०,३२,१००/- (क) रक्कम रु.१,३०,६१०/- अशी एकुण रक्कम रु.१९,७७,५१०/- इतका खर्च येणे अपेक्षित आहे. यावर निर्णय होणेस विनंती.

(०३) श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांचेकडून श्री पुण्यतिथी उत्सव-२०१८ साठी विद्युत रोषणाई व देखावा उभारणीचे काम करुन घ्यावयाचे असल्यास त्यासाठी त्यांनी त्यांचे पत्रात मागणी केलेप्रमाणे १२ दिवसाकरीता ०४ नग भाडोत्री जनसेटकरीता व ११ नग भाडोत्री ट्रक्स करीता विहीत पध्दतीने कोटेशन मागवावे किंवा कसे ? यावर निर्णय होणेस विनंती.

(०४) श्री पुण्यतिथी उत्सव-२०१८ साठी विद्युत रोषणाई व देखावा उभारणीकामी उपरोक्त प्रस्तावावर चर्चा होऊन निर्णय होणे आवश्यक आहे.

उपरोक्त प्रस्तावावर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.५११ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तुत प्रकरणी खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

**(०१) श्री पुण्यतिथी उत्सव-२०१८ (श्री साई समाधी शताब्दी महोत्सव) संस्थानमार्फत मोठया प्रमाणात साजरा करावयाचा असल्याने श्री पुण्यतिथी उत्सव-२०१८ मध्ये १० दिवसाकरीता श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांचेकडून मोठया प्रमाणात विद्युत रोषणाई व देखावा उभारणीचे काम करुन घेण्यात यावे.**

**(०२) श्री पुण्यतिथी उत्सव-२०१८ मध्ये विद्युत रोषणाई व देखावा उभारणीकरीता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे (अ) रक्कम रु.८,१४,८००/-+ (ब) रक्कम रु.१०,३२,१००/- (क) रक्कम रु.१,३०,६१०/- अशी एकुण रक्कम रु.१९,७७,५१०/- मात्र अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(०३) श्री व्दारकामाई मंडळ, मंबई यांचेकडून श्री पुण्यतिथी उत्सव-२०१८ साठी विद्युत रोषणाई व देखावा उभारणीचे काम करुन घेणेसाठी त्यांनी त्यांचे पत्रात मागणी केलेप्रमाणे १२ दिवसाकरीता ०४ नग भाडोत्री जनसेटकरीता व ११ नग भाडोत्री ट्रक्स करीता विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेत यावे.**

**(कार्यवाही- उपकार्यकारी अभियंता, विद्युत विभाग)**

---

**विषय नं.७** **श्री.चंद्रकांत माणकचंद सुराणा, कंत्राटी पध्दतीने ऑफीस असिस्टंट, माहिती केंद्र, सिकंदराबाद यांचा मुदतवाढ मिळणेबाबतचा दि.१२.०६.२०१८ रोजीचे अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीमार्फत सिकंदराबाद येथे साईभक्तांना सोई-सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी माहिती केंद्र सुरु करण्यात आलेले आहे. सदर कार्यालयात संदर्भ क्र.०१ दि.१७/१०/२०१० रोजीचे आदेशाने प्रथम ०१ वर्षासाठी श्री.चंद्रकांत माणकचंद सुराणा यांची ऑफीस असिस्टंट म्हणून कंत्राटी पध्दतीने एकूण मानधनावर नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यानंतर श्री.चंद्रकांत सुराणा यांना वेळोवेळी मुदतवाढ व मानधन वाढ देण्यात आलेली आहे. त्यांना सध्या संदर्भ क्र.१० दि.११/१०/२०१७ रोजीचे आदेशाने दि.२४/०८/२०१७ ते दि.२३/०८/२०१८ अखेर एक वर्षाकरीता कंत्राटी पध्दतीने प्रतिमहा रु.१५,०००/- (अक्षरी रुपये पंधरा हजार मात्र) एकूण मानधनावर मुदतवाढ देणेत आलेली आहे. त्यांची कंत्राटी पध्दतीचे नेमणूकीची मुदत दि.२३/०८/२०१८ रोजी संपत आहे.

श्री.सुराणा यांची मुदत दि.२३/०८/२०१८ रोजी संपत असल्याने, त्यांनी दि.१२/०६/२०१८ रोजीचे अर्जाने सध्याचे अटी-शर्तीवर मुदतवाढ मिळणेची विनंती केलेली आहे. तसेच हैद्राबाद हे 'अ' श्रेणीचे शहर असल्याने येथील महागाईच्या पटीत उचित मानधनवाढ मिळणेची विनंती केलेली आहे. सदर अर्जावर प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग यांनी, श्री.सुराणा यांची सिंकदराबाद येथील संस्थानचे माहिती केंद्रात कार्यालय सहाय्यक म्हणून कंत्राटी पध्दतीने मानधन तत्वावर नेमणूक करण्यात आलेली असून, त्यांना रु.१५,०००/- दरमहा देण्यात येतात. त्यांची मुदतवाढ दि.२३/०८/२०१८ रोजी संपत असल्याने त्यांना मुदतवाढ देणेस व योग्य मानधनवाढ देण्यास हरकत नाही. सिंकदराबाद येथील माहिती केंद्रावरुन खालील प्रमाणे वार्षीक प्राप्ती व खर्च झाल्याचे कळविले आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | ऑनलाईन आरती / दर्शन बुकींग | २१,६५,८००.०० |
| ०२ | ऑनलाईन रुम बुकींग | १०,७०,५२७.०० |
| ०३ | पुस्तक विक्री | ७,४६,८०१.०० |
| ०४ | देणगी | १,४३,२४२.०० |
| ०५ | सर्व्हिस चार्ज | १३,८००.०० |
| | एकूण प्राप्ती | ४१,४०,१७०.०० |
| | वार्षिक खर्च (Pettycash Exp, Salary Exp., Transport Charges) | ४,५७,५३०.०० |

प्रस्तावः तरी श्री. चंद्रकांत माणकचंद सुराणा, ऑफीस असिस्टंट, सिकंदराबाद यांचे दि.१२/०६/२०१८ रोजीचे अर्जातील विनंती व त्यावरील प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग यांचा अभिप्राय विचारात घेता, त्यांची मुदत संपत असलेल्या तारखेपासून पुढे एक वर्ष कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने मुदतवाढ व मानधनवाढ देणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५१२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.चंद्रकांत माणकचंद सुराणा, कंत्राटी पध्दतीने ऑफीस असिस्टंट,माहिती केंद्र, सिकंदराबाद यांचे दि.१२.०६.२०१८ रोजीचे अर्जातील विनंती व त्यावरील प्र.अधिक्षक,प्रकाशने विभाग यांचा अभिप्राय विचारात घेता, श्री.चंद्रकांत माणकचंद सुराणा यांना त्यांची मुदत संपत असलेल्या दिनांकापासून पुढे एक वर्ष कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने रक्कम रु.१८,०००/- मात्र मानधनावर मुदतवाढ देण्यात यावी, असे ठरले.** **(कार्यवाही-प्र.अधिक्षक,सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.८** **सन २०१८ दिपावली निमित्त संस्थान कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणेबाबत.**

**प्रस्ताव-** (अ) अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना, शिर्डी यांनी जावक क्रमांक ७८/२०१८,दिनांक ०७ ऑगष्ट,२०१८ रोजीचे विनंती पत्राने खालीलप्रमाणे विनंती केली आहे -

" .. .. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे मा. व्यवस्थापन समितीने व आपण कर्मचा-यांच्या हिताच्या दृष्टीने वेळोवेळी करण्यात आलेल्या मागण्यांचा तातडीने विचार करुन कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी, मार्फत दर वर्षी संस्थानचे कायम व कंत्राटी कर्मचारी यांना दिपावली सानुग्रह अनुदान मिळत असते त्याबद्दल "श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना"

आपले व श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डीचे मनःपुर्वक आभारी आहे. सन २०१८ या वर्षी दिपावली दिनांक ०७/११/२०१८ रोजी असून संस्थानमार्फत दरवर्षी कर्मचा-यांच्या पगारा- इतके सानुग्रह अनुदानाची रक्कम दिली जात आहे. परंतु दिवसेंदिवस महागाई मोठ्या प्रमाणात वाढलेली असल्यामुळे दिपावली निमित्त कर्मचा-यांना सानुग्रह अनुदानात वाढ करुन दोन महिन्यांचे पगाराइतकी रक्कम सानुग्रहअनुदान दिल्यास कर्मचा-यांना दिपावली श्री साईबाबांचे अशिर्वादाने व आपल्या प्रयत्नाने आनंदाने साजरी करता येईल.

श्री साईबाबा संस्थानच्या वतीने श्री साईबाबा समाधी वर्षास १०० वर्ष पूर्ण झाले असल्यामुळे सन २०१७-२०१८ शताब्दी वर्ष साजरे केले जात आहे. या शताब्दी वर्षामध्ये संस्थान कर्मचा-यांनी संस्थान प्रशासनाच्या सुचनांचा अवलंब करुन चांगली कामगिरी बजावत आहे. यापूर्वी श्री साईबाबांच्या ७५ वी अमृत महोत्सवानिमित्त श्री साईबाबा संस्थानने सर्व कर्मचा-यांना भेट वस्तू दिलेली होती. या शताब्दी वर्षानिमित्त संस्थानमधील कर्मचा-यांना श्री साईंचा आशिर्वाद म्हणून शताब्दी वर्षकर्मचा-यांच्या कायम स्मरणात राहील अशी अगळी-वेगळी भेटवस्तू मिळावी."

(ब) उपरोक्त संघटनेच्या मागणीस अनुसरुन विवेचन असे की,सन १९७७ पासून तत्कालीन मा.व्यवस्थापन मंडळ/समितीचे निर्णयानुसार तसेच संस्थानचे व्यवस्थापन पहाणारे मा.कोर्ट रिसीव्हर यांचे अधिकारात व मा.न्यायालयाचे निर्णयानुसार,संस्थान सेवकांना दिपावली उत्सवानिमित्त दरवर्षी दिपावलीपुर्वी सानुग्रह अनुदान देणेत येत आहे. त्यानंतर सन १९८४ मध्ये मा.सिटी सिव्हील कोर्ट, मुंबई यांनी संस्थान व्यवस्थापनासाठी स्किम तयार करुन, मा.धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे नियंत्रणाखाली तत्कालीन मा.व्यवस्थापन मंडळानेही संस्थानचे व्यवस्थापन पहात असतांना दरवर्षी संस्थान सेवकांना सानुग्रह अनुदान देणेस मान्यता दिलेली आहे.

दरम्यानचे कालावधीत, माहे ऑगस्ट, २००४ मध्ये महाराष्ट्र शासनाने संस्थानचे दैनंदिन व्यवस्थापन व प्रशासन पहाणेकरीता, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ (अधिनियम क्रमांक १४) हा कायदा पारीत केला आहे. या अधिनियमात संस्थान कर्मचा-यांचे बाबतीत प्रामुख्याने खालील तरतुदी करणेत आलेल्याआहेत -

कलम १५- मुख्य कार्यकारी अधिकारी आणि इतर अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवेच्या अटी व शर्ती या शीर्षाखालील पोटकलम (३) समितीच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांचे आणि इतर अधिका-यांचे व कर्मचा-यांचे वेतन व भत्ते आणि इतर खर्च हे व्यवस्थापन निधीतून देण्यात येतील.

कलम १६- सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे कर्मचारी संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडे नेमून देणे या शीर्षाखालील "नियत दिवसाच्या लगतपुर्वी जी व्यक्ती पूर्वीच्या विश्वस्तव्यवस्थेच्या सेवेत असेल आणि त्याच्या कामकाजासंबंधात काम करीत असेल अशी कोणतीही व्यक्ती ही, नियत दिवसाच्या लगतपूर्वी तीला जे वेतन लागू होते त्याच वेतनावर व सेवेच्या त्याच इतर अटी व शर्तीवर, नियत दिवसापासून समितीच्या नियंत्रणाखाली, संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या कामकाजांशी संबंधीत अशा सेवेसाठी नेमून देण्यात आल्याचे व नियुक्त केल्याचे मानण्यात येईल; आणि सेवेच्या अशा शर्तीमध्ये राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेखेरीज त्या व्यक्तीचे अहित होईल अशा रितीने समितीकडून कोणताही बदल करण्यात येणार नाही किंवा अशा व्यक्तीला सेवेतून काढून टाकण्यात येणार नाही.

कलम १७- समितीची कर्तव्ये व अधिकार या शीर्षाखालील पोटकलम (२) (घ) समितीच्या सदस्यांना व मुख्य कार्यकारी अधिका-याला व इतर अधिकारी व कर्मचारी यांना व्यवस्थापन निधीतून वेतन, मानधन, फी व भत्ते आणि इतर देय रकमा नियमित प्रदान करील.

तसेच या व्यतिरिक्त कलम १५ चे तरतुदीत उल्लेख केलेल्या व्यवस्थापन निधीबाबत या अधिनियमात कलम २२ - व्यवस्थापन निधी व त्याचा विनियोग या शीर्षाखालील तरतुदीत पोटकलम (३) (ख) मध्ये समितीचे इतर अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्ते देणे असे स्पष्टपणे नमूद करणेत आलेले आहे.

उपरोक्त अधिनियमातील तरतुदीनुसार, महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने तसेच महाराष्ट्र शासनाचे मान्यतेने दरवर्षी संस्थान सेवकांना दिपावली उत्सवाकरीता त्यांच्या एकूण वार्षीक वेतनाच्या ८.३३% इतके सानुग्रह अनुदान देण्यात येत आहे.

मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन पत्र क्र. सासंवि -२०११/ ५३८/ प्र.क्र.६९ /पुर्नबांधणी-१२/का.१६, दि.२३/०१/२०१३ चे पत्रान्वये शासनाने शासनाच्या प्रचलित धोरणानुसार कर्मचा-यांना बोनस देण्याचे बंद असतांना संस्थानच्या आस्थापनेवरील कर्मचा-यांना शासनाची मान्यता न घेता परस्पर बोनस आदा करणेत आला आहे याबाबत खुलासा करणेत यावा, असे कळविलेले होते.

तथापी तदनंतर, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी त्यांचेकडील शासन निर्णय क्रमांक सासंवि १०१६/१४३२/प्र.क्र.१८२/कार्या-१६, दि.२९ ऑक्टोबर, २०१६ आणि शासन निर्णय क्र. सासंवि १०१७/१५३९/प्र.क्र.१६६/कार्या-१६,दि.०५ ऑक्टोबर, २०१७ तसेच आता शासन निर्णय क्रमांक सासंवि १०१८/१९६३/प्र.क्र.३७/कार्या-१६, दि.२९ मे, २०१८अन्वये अनुक्रमे सन २०१६, सन २०१७ व सन २०१२ ते २०१५ या कालावधीतील सानुग्रह अनुदान वाटपास मान्यता दिलेली आहे.

सन २०१७ मध्ये मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०८/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७६५नुसार व मा. शासनाकडील दि. ०५ ऑक्टोबर,२०१७चे शासन निर्णयानुसार व मान्यतेनुसार,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या सेवेतील पात्र स्थायी (कायम) व कंत्राटी कर्मचा-यांना दि.०१/१०/२०१६ ते दि.३०/०९/२०१७ या कालावधीत मिळालेल्या त्यांच्या एकूण वार्षिक वेतनाच्या८.३३% इतके सानुग्रह अनुदान मंजूर करण्यात आलेले होते.याकामीलेखाशाखा विभागाकडील दिनांक १०/०८/२०१८ रोजीचे अहवालानुसार,एकूण रु. ७,७०,९८,०७८/- मात्र इतकी रक्कम पात्र संस्थान स्थयी (कायम) व अस्थायी (कंत्राटी) सेवकांना सानुग्रह अनुदानापोटी आदाकरण्यात आलेली आहे.

(क) उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, प्रचलित पध्दतीप्रमाणे श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटनेचे मागणीनुसार सन-२०१८ चे दिपावली उत्सवाचे सानुग्रह अनुदानाकरीता खाली नमुद केलेल्या अटी शर्तीनुसार संस्थान आस्थापनेवरील स्थायी (कायम), अस्थायी (कंत्राटी), एकत्रित मानधन / वेतनावरील कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देणेबाबत प्रस्तावीत करणेत येत आहे.

(०१) सन-२०१८ दिपावली उत्सवानिमित्त सानुग्रह अनुदानासाठी प्रचलित नियमाप्रमाणे पात्र ठरणा-या स्थायी (कायम) व अस्थायी (कंत्राटी) संस्थान सेवकांना दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि. ३० सप्टेंबर, २०१८ अखेर या कालावधीत त्यांच्या एकूण वार्षिक वेतनाच्या ८.३३ टक्के दराने व लेखाशाखेकडील दिनांक १०/०८/२०१८ रोजीचे अहवालानुसार अंदाजे रक्कम रुपये ९,५०,००,०००/- मात्र (अक्षरी रुपये नऊ कोटी पन्नास लाख मात्र) इतका खर्च येणार आहे.

(०२) दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१७ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१८ या कालावधीत संस्थान आस्थापनेवरील स्थायी (कायम) तसेच मानधनावर सेवेत असलेले अधिकारी व कर्मचारी, कंत्राटी पध्दतीने नेमणूका देण्यात आलेले अधिकारी / कर्मचारी, कंत्राटी सल्लागार / मोजणीदार, डीटीपी ऑपरेटर, ग्रंथपाल, अर्धवेळ सहाय्यक शिक्षक यांना दिलेल्या त्यांच्या एकूण वार्षिक वेतनाचे / पगाराच्या ८.३३ टक्के दराने होणारी रक्कम अदा करता येईल.

(०३) दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१७ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१८ या कालावधीत ज्या कर्मचा-यांवर गैरवर्तनाचा ठपका ठेवून अथवा ज्या कर्मचा-यांवर शिस्तभंगाची कारवाई करुन, सेवेतून कमी केलेले आहे.तसेच ज्या कर्मचा-यांनी या कालावधीत संस्थान सेवेचा राजीनामा दिला आहे,अशा कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देय होणार नाही.

(०४) दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१७ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१८ या कालावधीत संस्थानला कंत्राटी पध्दतीने कामगार पुरविणेसाठी नेमलेल्या लेबर व सुरक्षा कंत्राटदारामार्फत कामास असलेल्या कंत्राटी कुशल, अकुशल व एकत्रित वेतन / मानधनावरील तसेच माजी सैनिक सुरक्षा रक्षकासह इतर सुरक्षा कर्मचारी यांना दिलेल्या त्यांच्या एकूण वार्षिक वेतनाचे ८.३३ टक्के दराने होणारी सानुग्रह अनुदानाची रक्कम संबंधीत कंत्राटी कामगार यांना कंत्राटदारामार्फत अदा करता येईल.

उपरोक्त प्रस्तावीत केलेप्रमाणे दिपावली सन-२०१८ साठी अट-शर्त क्र.०२ व ०४ नुसार पात्र होणा-या संस्थानचे स्थायी (कायम) व अस्थायी (कंत्राटी) कर्मचा-यांना दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.३० सप्टेंबर, २०१८ या कालावधीत त्यांच्या एकूण वार्षिक वेतनाच्या ८.३३ टक्के दराने अंदाजे रक्कम रुपये ९,५०,००,०००/- मात्र (अक्षरी रुपये नऊ कोटी पन्नास लाख मात्र) इतके सानुग्रह अनुदान वाटप/ आदा करणेकामीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेस तसेच मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने शासनाचे दि. २३/०१/२०१३ रोजीचे पत्रातील निर्देशास अनुसरुन मा. प्रधान सचिव विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे मान्यतेसाठी पाठविणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

निर्णय क्र.५१३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, दिपावली सन-२०१८ करीता अट-शर्त क्र.०२ व ०४ नुसार पात्र होणाऱ्या संस्थानचे स्थायी (कायम) व अस्थायी (कंत्राटी) कर्मचाऱ्यांना दि.०१ आक्टोंबर.२०१७ ते दि.३० सप्टेंबर,२०१८ या कालावधीतील त्यांच्या एकुण वार्षिक वेतनाच्या ८.३३ टक्के दराने सानुग्रह अनुदान देण्यास मान्यता देण्यात**

आली, तत्पुर्वी सदरचा प्रस्ताव मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन यांचेकडे मान्यतेसाठी सादर करणेत यावा, त्यांचे मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करण्यात यावी, असे ठरले.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक,सामान्य प्रशासन विभाग)

---

**विषय नं.९** **आयकर कायदा १९६१ च्या तरतुदीनुसार सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाचे अखर्चित उत्पन्न रु.३४३.९१ कोटी रकमेचा दि.३१.०७.२०१८ अखेर झालेल्या विनीयोगा बाबत.**

**प्रस्ताव-** आर्थिक वर्ष २०१३-१४ चे अखर्चित उत्पन्न रु.३४४ कोटी आर्थिक वर्ष २०१८-१९ अखेर विनियोगाबाबत संबधीत विभागांनी प्रस्तावीत व चालू असलेल्या प्रकल्पांवर दि.३१.०३.२०१९ अखेर अपेक्षित खर्च कळविला होता. मा.व्य.स.निर्णय क्र. ४१७/दि.३०.०६.२०१८ अन्वये नमुद केलेल्या बाबींवर प्रत्येक महिन्यात होणा-या खर्चाचा तपशिल मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावा असे ठरले आहे. त्यास अनुसरुन माहे जुलै २०१८ अखेर झालेल्या खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे:-

(रुपये कोटी मध्ये )

| अ.नं. | विभागाचे नांव | प्रकल्प / योजनेचे नांव | प्रकल्प खर्च | दि.३१.०३.२०१९ प्रस्तावित खर्च | माहे जुलै २०१८ अखेर प्रत्यक्ष खर्च | मार्च २०१९ अखेर करावयाचा खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पाणीपुरवठा विभाग | निळवंडे धरण – टप्पा क्र.१ | २६६.८८ | ६०.०० | | ६०.०० |
| २ | ध्वनीक्षेपण व टेलिफोन विभाग | अद्ययावत दुरध्वनी यंत्रणा<br>Public Address System & Emergency Call Box | १.४२<br>२.६० | १.४२<br>२.६० | ०<br>० | १.४२<br>२.६० |
| ३ | सीसीटीव्ही विभाग | CCTV & Surveillance<br>LED Wall Screen | ७२.५८<br>७.९० | ७२.५८<br>७.९० | ०<br>० | ७२.५८<br>७.९० |
| ४ | संरक्षण विभाग | सुरक्षा साहित्य खरेदी<br>व्यायाम शाळा साहित्य खरेदी | १.८५<br>०.७८ | १.८५<br>०.७८ | ०<br>० | १.८५<br>०.७८ |
| ५ | बांधकाम विभाग | नविन दर्शनरांग प्रकल्प | ११२.४० | ७०.०० | ०.२१ | ६९.७९ |
| | | घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प | ७.१७ | ३.५० | | ३.५० |
| | | स्वागत कमानी– दोन | १.६७ | १.६७ | | १.६७ |
| | | स्कायवॉक | १.३० | १.०० | | १.०० |
| | | साई आश्रम-१ येथे टेन्साईल फॅब्रिक शेड उभारणे | १.३६ | १.०३ | ० | १.०३ |
| | | श्री साईबाबा समाधी मंदिर परिसरातील फ्लोअरींगचे नुतनीकरण करणे (दुसरा टप्पा) | २.७५ | ०.६५ | ०.५६ | ०.०९ |
| | | साईनाथ रुग्णालयावर वाढीव मजल्याचे बांधकाम | ४.०० | ४.०० | | ४.०० |
| | | नगरपालिका हद्दीतील रस्ता क्र.५ चे उर्वरीत काम पूर्ण करणे (टप्पा-१) | १.७० | १.७० | | १.७० |
| | | मंदिर परिसरातील इमारतीचे आतील व बाहेरील रंगकाम करणे. | ०.६४ | ०.६३ | ०.२८ | ०.३५ |
| | | साई नॉलेज पार्क प्रकल्प | १६६.३९ | १.०० | | १.०० |
| | बांधकाम विभाग | साईबाबा भक्तनिवास (५०० रुम) नुतनीकरण | १८.५६ | ५.०० | | ५.०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | साईप्रसादालय फरशी बदलणे | १.९० | १.९० | ०.३५ | १.५५ |
| | | लाडू व बुंदी प्रोसेसिंग युनिट | १४.४१ | ५.०० | | ५.०० |
| | | साईप्रसादालय आतील व बाहेरील रंगकाम करणे. | ०.६२ | ०.६२ | | ०.६२ |
| | | नविन शैक्षणिक संकुल उभारणी | १३५ .०० | ५.०० | | ५.०० |
| | | नगर-मनमाड रस्ता दुरुस्ती व सुशोभिकरण | ३.५ | ३.५ | | ३.५ |
| | | साई आश्रम-१ रंगकाम व दुरुस्ती | ६.५० | ४.८३ | | ४.८३ |
| | | मौजे निघोज येथील देणगी दाखल मिळालेल्या इमारतीत (साईपालखी निवारा) आय.एस.ए. ॲकॅडमी सुरु करणेकामी अंतर्गत फेरबदल करणे. | १०.९३ | ३.०० | | ३.०० |
| | | साईनाथ रुग्णालय सर्व संडास बाथरुमचे नुतनीकरण करणे. | १.३१ | १.०० | | १.०० |
| | | श्रीसाईचरित्र पारायणाकरीता मंडप व इतर अनुषंगिक सुविधा तयार करणे. | ०.९१ | ०.९१ | | ०.९१ |
| | | श्री साईबाबा समाधी मंदिर परीसरातील ऐतिहासिक इमारतीचे सुदृडीकरण करणे. | ०.७३ | ०.५० | ०.५० | ०० |
| | | कुंभमेळा कालावधीत शिर्डी व परीसरात विकसीत केलेल्या ०७ वाहनतळांचे कामाबाबत | २.८९ | ०.५२ | | ०.५२ |
| | | संस्थानमार्फत साजरे करणेत येणारे उत्सव, उन्हाळा व पावसाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व्यवस्था करणे. | ०.५० | ०.५० | ०.०८ | ०.४२ |
| | | मौजे निमगांव को-हाळे हद्दीतील चर रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ०.५७ | ०.५७ | | ०.५७ |
| | | शिर्डी वाहतूक आराखडयातील रस्त्यांचे कामासाठी अनुदान देणे. | १०.०८ | १०.०८ | | १०.०८ |
| ६ | माहिती तंत्रज्ञान विभाग | Oracle License Purchase & Support Renewal | २.९३ | १.५६ | | १.५६ |
| | | Local Servers up gradation | ०.८५ | ०.८५ | | ०.८५ |
| | | Software Licenses | ०.५० | ०.५० | | ०.५० |
| | | Desktop Purchase | १.०० | १.०० | | १.०० |
| | | OFC | ०.५० | ०.५० | | ०.५० |
| | | Networking Equipment | १.२५ | १.२५ | | १.२५ |
| ७ | लेखा - अनुदान विभाग | अनुदान -<br>१) शिर्डी नगरपंचायत अनुदान – दैनंदिन स्वच्छता<br>२) शिर्डी नगरपंचायत अनुदान – | <br>३.५४<br>१.१०<br>०.३३ | <br>३.५४<br>१.१०<br>०.३३ | <br>१.१४<br>१.१०<br>०.३३ | <br>२.४०<br>००<br>०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | रस्ते<br>३) शिर्डी नगरपंचायत अनुदान – शौचालये बांधकामासाठी | | | | |
| | | अनुदान - इतर संस्था शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यवतमाळ | १३.०० | १३.०० | १३.०० | ०० |
| | | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नागपुर | ३५.२८ | ३५.२८ | ३५.२८ | ०० |
| | | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय औरंगाबाद | १५.०० | १५.०० | १५.०० | ०० |
| ८ | रुग्णालये विभाग श्री साईबाबा हॉस्पीटल | श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये वैद्यकीय उपचारापोटी देण्यात येणाऱ्या सवलतीचा अपेक्षीत खर्च. | १४.०० | १४.०० | २.३० | ११.७० |
| | | श्री साईनाथ हॉस्पीटलमध्ये वैद्यकीय उपचारापोटी देण्यात येणाऱ्या सवलतीचा अपेक्षीत खर्च. | ५.०० | ५.०० | ०.१६ | ०४.८४ |
| | श्री साईनाथ रुग्णालय अनुदान विभाग | गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकीय आर्थीक अनुदान देणे. | ५.०० | ५.०० | ०.३३ | ४.६७ |
| | रुग्णालय विभाग | औषध व सर्जिकल साहित्य खरेदी | ६०.०० | ६०.०० | ०६.०० | ५४.०० |
| | | हॉस्पिटल मशिनरी खरेदी, | ३०.०० | ३०.०० | ०४.५५ | २५.४५ |
| ९ | | शिर्डी नगरपंचायत – अमृत योजना | ०६.५८ | ०६.५८ | ०६.५८ | |
| १० | वाहन विभाग | वाहन खरेदी | ०१.१० | ०१.१० | ०१.१० | |
| | | एकुणः- | ९२३.७६ | ४७०.८३ | ८८.८५ | ३८१.९८ |

अशा प्रकारे आर्थिक वर्ष २०१८-१९ अखेर संबधीत विभागांनी कळविलेल्या प्रस्तावित व चालू असलेल्या प्रकल्पांवर होणा-या अपेक्षित खर्चाचे तुलनेत माहे जुलै २०१८ अखेर रु.८८.८५ कोटी खर्च झालेला आहे. आयकर कायद्यानुसार सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाची दि.३१.०३.२०१९ अखेर खर्च करावयाची अखर्चित रक्कम रु.३४३.९२ कोटी आहे. त्यामुळे उर्वरीत कालावधीत अद्याप रु.२५५.०७ कोटी खर्च होणे आवश्यक आहे. उपरोक्त प्रमाणे वस्तुस्थीती मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर आवलोकनार्थ सविनय सादर.

निर्णय क्र.५१४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, आर्थिक वर्ष २०१८-१९ अखेर प्रस्तावीत व चालू असलेल्या प्रकल्पांवर होणाऱ्या अपेक्षित खर्चाचे तुलनेत माहे जुलै-२०१८ अखेर रु.८८.८५ कोटी खर्च झालेला आहे. आयकर कायद्यानुसार सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाची दि.३१.०३.२०१९ अखेर खर्च करावयाची अखर्चित रक्कम रु.३४३.९२ कोटी आहे. त्यामुळे उर्वरीत कालावधीत रु.२५५.०७ कोटी खर्च होणे आवश्यक असल्याने साईभक्तांचे दृष्टीने आवश्यक असलेल्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे, कॅन्सर हॉस्पीटलची उभारणी करणे, मेडीकल व नर्सिंग कॉलेज सुरु करणे, यासाठी आवश्यक असलेल्या जमिनी खरेदी करणे इत्यादी साठी अखर्चीत रक्कमेचा विनियोग करावा असे ठरले. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)**

---

विषय नं.१० **श्री साईबाबांना अर्पण केलेल्या वस्त्राच्या विनियोगाबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबांना भेट स्वरुपात साईभक्तांकडुन दररोज मोठया प्रमाणात देणगी कांऊन्टरवर श्रींचे आरतीसाठी 3 मीटरचे साईबाबा ड्रेस, तसेच भेट स्वरुपात ०१ मीटर व त्या आतील मापाचे ब्रॅकेट शॅटीन, तसेच

मऊ मखमली शॉल, व साईराम शॉल, असे विविध रंगाचे डिझाईनचेवस्त्रे साईभक्ताकडुन देणगीकांऊन्टरवर अर्पण केली जातात. सदरचे वस्त्रांची किंमतसाईभक्तांनी खरेदी केलेल्या किंमतीची पावती बघुन तीच किंमत त्या वस्त्रांना निश्चीत केली जाते. तसेच काही साईभक्त त्यांनी आणलेली वस्त्रे हि देणगी कांऊन्टरवर न देता दक्षिणा हुडींत टाकतात त्यामुळे सदरचे वस्त्रांची किंमत दक्षिणा हुंडी मोजणीचे दिवशी वस्त्रांचे स्वरुप लक्षात घेवुन निश्चीत केली जाते.अश्या प्रकारची माहिन्याला साधारणपणे गर्दिनुसार १८ लक्ष ते २० लक्ष किंमतीची वस्त्रे, संस्थानला साईभक्तांकडुन प्राप्त होतात. त्यानुसारप्रत्येक महिन्याला श्रींचे आरतीसाठीचे वस्त्र, हे लकी ड्रॉ सोडत पद्धतीने महिन्याची एकुण तीन आरतीसाठी ९० ते ९३ वस्त्रे, बाजुला काढुन उर्वरित वस्त्र हि प्रसाद रुपाने देगणी कांऊन्टरवर ०१ रुपये ज्यादा दराने साईभक्तांस त्याची विक्री केली जाते. परंतु माहिन्याल्या प्राप्त वस्त्रांपैकी साधारणपणे १४ ते १५ लक्ष रुपयांची विक्री देणगी कांऊन्टरवर केली जाते. त्यात सर्वच वस्त्रांची विक्री देणगी काऊन्टरवर होत नाही. म्हणजेच वस्त्र विक्रीचे प्रमाणसंस्थानला प्राप्त वस्त्रांपैकी कमी प्रमाणात असल्यामुळे प्रत्येक महिन्यास प्राप्त उर्वरितवस्त्रांचा साठा मोठयाप्रमाणात शिल्लक राहात आहे. त्यामध्ये दिवसोदिवस मोठी वाढ होत आहे.सदरचे वस्त्र साठवणुकीकामी जागा अपुरी पडत असुन मोठया प्रमाणात अडचणी निर्माण होत आहेत.

सद्या:स्थिती– श्रींना अर्पण होणारे वस्त्र हे साईभक्त देणगी कांऊन्टरवर जमा करतात किंवा दक्षिणा पेटीत टाकतात. त्यात मोठया संख्येने आरतीसाठीची वस्त्र, व श्रींना भेट रुपाने ०१ मीटर व त्या आतील मापाचे ब्रॉकेट शॅटीन, तसेच मऊ मखमली शॉल, व साईराम शॉल, असे विविध रंगाचे डिझाईन वस्त्रे यातुन आरतीसाठीची महिन्याची एकुण वस्त्र व विक्री न झालेली वस्त्र यांचा साठा मोठयाप्रमाणात कापड स्टोअरला शिल्लक आहे. लिलाव पद्धत बंद असल्यामुळे दिवसोंदिवस या साठयात मोठी वाढ होतआहे.तसेचवेळेत लिलाव न झाल्याने ती वस्त्रे दिर्घकाळ पडुन राहातात. व खराब होवुन आणि पडुन राहिल्याने ते वापरासाठी योग्य राहात नाही. त्यासाठी सदरचे वस्त्रांचा वेळेत निपटारा होणे अवश्यक आहे. सद्यस्थिती पहातासंस्थानला कापड स्टोअरमध्ये दि.३१/०७/२०१८ अखेर रक्कम रुपये ४१,८२,१६९/- लक्ष मात्र. ईतके रक्कमेची ४८,१८८ इतके वस्त्रांचा साठा उपलब्ध आहेत.

अधिनियमातील तरतुद– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी. अधिनियम २००४ मधील कलम १४ (२) ग नुसार मा.व्यवस्थापन समितीच्या नियंत्रणास नाशवंत अर्पणवस्तुंची लिलावाव्दारे किंवा अन्य प्रकारे, विल्हेवाट लावण्याचे आणि त्यांचे उत्पन्न विश्वस्तव्यवस्थेच्या निधीमध्ये जमा करण्याचे अधिन राहुन याचे अधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहेत.

विभागाचा अभिप्राय– श्रींना अर्पण होणा-या आरतीसाठीची साईबाबा वस्त्र तसेच भेट स्वरुपी ०१ मीटर व त्या आतील मापाचे ब्रॉकेट शॅटीन, तसेच मऊ मखमली शॉल, व साईराम शॉल, असे विविध रंगाचे डिझाईन वस्त्रांचा वस्तुंचा वेळेत लिलाव केल्याने, अथवा साईबाबांना चढावण्यासाठी प्राप्त अपर्ण वस्त्रे हि ज्या त्या साईभक्तांनाच विनामुल्य परत दिल्यास साईभक्तांना याचे मोठयाप्रमाणात समाधान वाटेल, तसेच १ मिटर व त्या आतील मापाचे सॅटिन स्वीकारणे बंद केल्यास वस्त्राची साठवण करणेकामी जागेची समस्या निर्माण होणार नाही.

प्रस्ताव-

१) सध्याच्या शिल्लक वस्त्रांबाबत " जसे आहे तसे व जेथे आहे तेथुन घेऊन जाणे "या तत्वावर जाहिर लिलाव करणे.

२) १ मीटर लांबी पेक्षा कमी लांबीचे सॅटिन घेणे बंद करणे,

३) साईबाबांना चढविलेली वस्त्रे हि त्या भक्तांनाचत्या दिवशी ते उपस्थीत असल्यास त्यांनापरत विनामुल्य देण्यात यावीत.

४) मा.व्यवस्थापन समितीचे परवानगीशिवाय सर्व प्रकारचे कापड/कपडे देणगी कांऊन्टरवर न स्विकारणेबाबत निर्णय घेणे.

५) लिलावानंतरही प्राप्त होणारी अर्पण वस्त्रे रु.२५ हजारापेक्षा जास्त देणगी देणा-या साईभक्तांना भेट देणे.

६) कमी किंमतीची वस्त्रे जसे १ मीटर व त्या आतील मापाची शॅटीन इत्यादी मंदीरात दर्शनाचे वेळी भक्तांना मागणीप्रमाणे प्रसाद म्हणुन देणे.

उपरोक्त प्रमाणे अ.नं.१ ते ६ चे पर्यायांबाबत निर्णय होणेकामी सदर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती समोर निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.५१५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींना अर्पण होणारी एक मीटर पर्यंतच्या लांबीची वस्त्रे साईभक्तांना मोफत देण्यात यावी, एक लाख व त्यापेक्षा जास्त रक्कम देणगी देणा-या साईभक्तांना मोठ्या आकाराचे वस्त्र भेट म्हणून देण्यात यावे, तसेच सर्व समिती सदस्यांना व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना प्रत्येक महिन्याला एक या प्रमाणे प्रत्येकी १२ वस्त्रे मान्यवरांचे सत्कार करणेसाठी देण्यास मान्यता देण्यात आली.**

**तसेच मान्यवरांना सत्कारप्रसंगी वस्त्र देतांना, सदर वस्त्र ज्या आरतीचे वेळी श्रींचे समाधीवर व मुर्तीवर चढविले असेल, त्या वेळचा फोटो देखील द्यावा, असे ठरले. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)**

---

**विषय नं.११** **माहे एप्रिल व मे २०१८ जमा-खर्च तक्त्याची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** लेखाशाखा विभागामार्फत दरमहा संस्थानला सर्व मार्गाने जमा होणा-या व संस्थानकडुन खर्च होणा-या रकमांचा एकत्रित जमा खर्च तक्ता तयार करण्यात येतो. सदर जमा व खर्चाच्या आकडेवारीचा तक्ता मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात येत असतो.

त्या अनुषंगाने माहे एप्रिल व मे - २०१८ या कालावधीतील मासिक जमा-खर्चाचे तक्ते तयार करण्यात आले असून ते मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर नोंद घेणेसाठी सादर करणे आवश्यक आहे. जमा- खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे –

| अ.नं. | महिना | जमा | खर्च |
|---|---|---|---|
| ०१ | एप्रिल - २०१८ | ४०,५८,८७, ८२१/- | ४९,८२,७६,५२३/- |
| ०२ | मे – २०१८ | ४५,९७,५८,२०८/- | १५,१८,७५,५५८/- |

तरी लेखापुस्तकाप्रमाणे माहे एप्रिल व मे २०१८ या कालावधीतील जमा खर्चाची नोंद घेण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर.

**निर्णय क्र.५१६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे एप्रिल व मे २०१८ जमा-खर्च रकमेचे अवलोकन करण्यात येऊन नोंद घेणेत आली. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)**

---

**विषय नं.१२** **श्री साई महासमाधी शताब्दी महोत्सव २०१८ निमित्त संस्थानमधील अधिकारी/कर्मचारी यांना साई प्रतिमा असलेले २५ ग्रॅम वजनाचे चांदीचे नाणे सप्रेम भेट म्हणून देणेबाबत.**

**प्रस्ताव-** दररोज देशविदेशातून असंख्य साईभक्त श्री क्षेत्र शिर्डी येथे भेट देऊन साई समाधीचे दर्शन घेत असतात.सध्या श्री साईबाबांच्या समाधीचे शताब्दी वर्ष सुरु आहे.या दुर्मिळ पर्वणीचा आनंद घेता यावा यासाठी मोठया संख्येने साईभक्त श्री क्षेत्र शिर्डी येथे श्रींच्या दर्शनासाठी येत आहेत.संस्थान व्यवस्थापनामार्फत समाधी शताब्दी संस्मरणीय व्हावे म्हणून विविध/उपक्रम कार्यक्र राबविले जात आहेत.

शिर्डी येथे दर्शनासाठी येणारा भक्त हा संस्थानच्या प्रत्येक व्यवस्थेचा केंद्रबिंदू आहे.साईभक्तांसाठी सोयीसुविधा उभारण्याचे काम सातत्याने होत असते.ज्या सोयी सुविधा भक्तांना पुरविल्या जातात त्या संस्थानमध्ये काम करणा-या कर्मचा-यांमार्फत पुरविल्या जातात.साहजिकच इथे काम करणारा कर्मचारी वर्ग संस्थानच्या यंत्रणेचा फार मोठा भाग आहे.संस्थानमार्फतही कर्मचा-यांसाठी अनेक सुविधा आणि कल्याणकारी योजना पुरविण्यात येतात.

श्रींचे ७५ वी पुण्यतिथी अमृत महोत्सवा निमित्त प्रत्येक कर्मचा-यास २० ग्रॅम चांदीचे नाणे सप्रेम भेट स्वरुपात देण्यात आले होते.

मागणी:-आता श्रींच्या समाधीचे शताब्दी वर्ष सुरु आहे.संस्थानमार्फत दि.१/१०/२०१७ ते दि.३१/१०/२०१८ अखेर श्री साई समाधी शताब्दी महोत्सव साजरा करणेत येत आहे.या शतक महोत्सवाचे स्मरण म्हणून कामावर असलेल्या प्रत्येक कर्मचा-यास साईप्रतिमा असलेले २५ ग्रॅम वजनाचे चांदीचे नाणे भेट स्वरुपात देण्यात यावे,असा प्रशासनाचा मानस आहे.

सध्या रुपये -२५,०००/- व त्यापुढे देणगी देण्यात येणा-या साईभक्तास २० ग्रॅम वजन असलेली साईंची पादुका असलेली प्रतिमेची शुध्द चांदीची नाणी सप्रेम भेट म्हणून देण्यात येत असून सदरची नाणी शासन निर्णयाप्रमाणे शासनाचे भारत टकसाळ, फोर्ट, मुंबई यांचेकडून तयार करुन घेण्यात येत आहेत.

त्यांचेकडेस प्राथमिक चौकशीकामी दरपत्रक मागणी केली असता त्यांनी दि.७/८/२०१८ रोजीचे ई मेल व्दारे चांदीचे २५ ग्रॅम प्रति नाण्यास रुपये १,७५०/- व त्यावर ३% प्रमाणे जीएसटीची रक्कम द्यावी लागेल.तसेच

या व्यतिरिक्त सुरुवातीस साई प्रतिमेची चांदीची डाय बनविणेकामी येणारा खर्च वेगळा असेल.असे कळविले आहे. चांदीची प्रतिमा तयार करणेकामी डाय डिझाईन सोबत जोडली आहे.

सध्या संस्थानमध्ये कायम/इनसोर्स कंत्राटी/आऊटसोर्स कंत्राटी/मानधनावरील कर्मचारी यांची अंदाजे खालीलप्रमाणे संख्या आहे.

| अ.नं. | तपशिल | कर्मचारी संख्या (अंदाजे) |
|---|---|---|
| १. | कायम कर्मचारी/अधिकारी/प्रतिनियुक्तीवरील अधिकारी | २०६१ |
| २. | कंत्राटी कामगार (इनसोर्स) | २६०० |
| ३. | कंत्राटी कामगार (आउटसोर्स) | १७५० |
| ४. | मानधनावरील कामगार संख्या | ६० |
| ५. | मा.विश्वस्त/मान्यवर | २९ |
| | एकूण संख्या (अंदाजित ) | ६,५०० |

श्री साई समाधी शताब्दी महोत्सवानिमित्त सर्व कर्मचा-यांना २५ ग्रॅम वजनाची साई प्रतिमा असलेली शुध्द चांदीची नाणी भेट स्वरुपात द्यावयाची झाल्यास खालीलप्रमाणे कार्यवाही करावी लागेल.

१. कर्मचा-यांना भेट स्वरुपात देणेकामी २५ ग्रॅम वजनाची साई प्रतिमा असलेली अंदाजे किमान १००००नग ( नग दहा हजार मात्र) शुध्द चांदीची नाणी तयार करुन घ्यावी लागतील.

सदरची नाणी शासनाचे भारत सरकार टकसाळ, फोर्ट, मुंबई यांचेकडून तयार करुन घेता येतील.त्यासाठी सुरुवातीस त्यांना सदरची नाणीच्या डिझाईनचे डाय तयार करावी लागणार असल्याने डिझाईन अंतिम करुन द्यावी लागणार आहे.

भारत सरकार टकसाळ, फोर्ट,मुंबई यांचेकडील दि.७/८/२०१८ चे प्राथमिक माहितीकामी दर पत्रकानुसार २५ ग्रॅमचे प्रति नग नाणीसाठी रुपये १,७५०/- अधिक ३% जीएसटी याप्रमाणे १०००० नग नाणींसाठी अंदाजित रक्कम रुपये- १,८०,२५,०००/- खर्च येईल.

तसेच साईभक्तांस सप्रेम भेट स्वरुपात देण्यात येणा-या २० ग्रॅम चांदीचे नाणीच्या पुर्वी डाय बनविणेस रक्कम रुपये-१,७१,५९८/- मात्र इतका खर्च आलेला आहे.त्यास अनुसरुन आता नव्याने साईप्रतिमा डिझाईनची चांदीची डाय बनविणेकामी अंदाजे खर्च-२,००,०००/- मात्र अपेक्षित आहे.असा एकूण अंदाजित रक्कम रुपये-१,८२,२५,०००/- (अंदाजे अक्षरी रक्कम रुपये एक कोटी ब्याऐंशी लाख पंचवीस हजार मात्र.) एवढा खर्च अपेक्षित आहे.

कर्मचा-यांना सप्रेम भेट स्वरुपात देणेकामी २५ ग्रॅम वजनाची चांदीची साईप्रतिमा असलेली चांदीची नाणी सप्रेम भेट स्वारुपात देणेकामी खालील पध्दतीप्रमाणे कार्यवाही करता येईल.

कायम कर्मचारी - श्री साई समाधी शताब्दी कालावधीमध्ये किमान सहा महिने किंवा त्यापेक्षा जास्त सेवा कालावधीनंतर सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांस, इनसोर्स/आऊटसोर्स/मानधनावरील कर्मचारी-श्री साई समाधी शताब्दी कालावधीमध्ये किमान सहा महिने किंवा त्यापेक्षा जास्त सेवा दिलेल्या परंतु सध्या कार्यरत असलेल्या कर्मचा-यास, उपरोक्त नमूद बाबींमुळे खालील तपशिलाप्रमाणे अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | प्रकार | कर्मचारी संख्या अंदाजे | रक्कम |
|---|---|---|---|
| ०१. | कायम कर्मचारी/अधिकारी/प्रतिनियुक्ती वरील अधिकारी | २०६१ | ३७,५७,२०३/- |
| ०२. | इनसोर्स कंत्राटी कामगार | २६०० | ४७,३९,८००/- |
| ०३. | आउटसोर्स कंत्राटी कामगार | १७५० | ३१,९०,२५०/- |
| ०४. | मानधनावरील कामगार | ६० | १,०९,३८०/- |
| ०५ | मा.विश्वस्त/मान्यवर | २९ | ५२,८६७/- |
| | एकूण ... | ६५०० | १,१८,४९,५००/- |

(अक्षरी रक्कम रुपये एक कोटी आठरा लाख एकोणपन्नास हजार पाचशे मात्र )

वरीलप्रमाणे कर्मचारी/कामगार संख्येमध्ये चांदीचे नाणी वाटपाचे वेळी विभागांकडून प्रमाणीत करुन येणा-या प्रत्यक्ष संख्येनुसार वाटप करण्यास व त्यासाठी येणारे प्रत्यक्ष खर्चास मान्यता मिळावी. सप्रेम भेट वाटप झाल्यानंतर उर्वरीत शिल्लक राहीलेली चांदीची नाणी बाजारभावाप्रमाणे साईभक्तांना प्रसादरुपाने विकत घेणेसाठी कापड विक्री कांऊटरवर विक्रीसाठी उपलब्ध ठेवता येतील.

प्रस्ताव- श्री साई महासमाधी शताब्दी महोत्सव २०१८ निमित्त संस्थानमधील मा.विश्वस्त/मान्यवर व अधिकारी/कर्मचारी यांना साई प्रतिमा असलेले २५ ग्रॅम वजनाचे चांदीचे नाणे सप्रेम भेट म्हणून देणेबाबत व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेकामी, तसेच नाणी बनविणेसाठी सोबत जोडलेल्या डायचे डिझाईन अंतीम करणेकामी, तसेच मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळालेनंतर सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाचे मा.विधी व न्यायविभागाकडे मान्यतेसाठी पाठविणेकामी, मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सविनय सादर,

निर्णय क्र.५१७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई महासमाधी शताब्दी महोत्सव २०१८ निमित्त संस्थानचे सर्व मा.विश्वस्त, माजी विश्वस्त, मान्यवर व प्रतिनियुक्तीवरील शासकीय अधिकारी, इतर अधिकारी/कर्मचारी यांना प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे कंत्राटी कर्मचारी १७५० (आऊटसोर्स) वगळता इतरांना साई प्रतिमा असलेले २५ ग्रॅम वजनाचे चांदीचे नाणे सप्रेम भेट म्हणून देणेस मान्यता देण्यात आली व याकामी १०,००० चांदीची नाणी नमुन्या प्रमाणे तयार करण्यास येणाऱ्या अंदाजे खर्चास मान्यता देण्यात आली. सदर चांदीच्या नाण्यावर सन १९१८–२०१८ असा उल्लेख करावा, सप्रेमभेट म्हणून दिलेल्या चांदीची नाणे व्यतिरीक्त उर्वरीत चांदीची नाणे साईभक्तांना विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्यात यावी, तसेच भविष्यात देखील सदर नाणे 'शताब्दी नाणे' म्हणून विक्रीसाठी उपलब्ध करावे. सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाचे मा.विधी व न्याय विभागाकडे मान्यतेसाठी पाठविणेत यावा शासनाची मान्यता मिळालेनंतर त्यानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)**

---

विषय नं.१३ **साईभक्त कै.प्रेमबाई दामके, मध्यप्रदेश यांचा दर्शनरांगेमध्ये मृत्यु झाला असल्याने त्यांना एक विशेष बाब म्हणून अनुदान मंजूर करणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि. १०/०४/२०१८ रोजीचे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झाले असून, सदर पत्रामध्ये साईभक्त श्री राकेश दामके यांचे वडील श्री शोभाराम दामके, रा.१४३, पालदा नाका, चितावद काकड, इंदौर. हे दि. २५/०३/२०१८ रोजी त्यांची पत्नी प्रेमबाई दामके, व त्यांचे मित्र आनंद व त्यांचे भाऊ पंकज व नातेवाईक श्री सुरेश यांचेसमवेत श्री साईबाबांचे दर्शनासाठी शिर्डी येथे आले होते. त्यावेळी रामनवमी असल्याने मंदिर परिसरामध्ये गर्दी होती. त्यामध्ये त्यांचे आईला (श्रीमती प्रेमबाई दामके यांना) गर्दीमध्ये धक्का लागला असता त्या खाली पडल्या व त्यावेळी त्यांना तीव्र असा ह्दय विकाराचा झटका आला. त्याचवेळी त्यांना लगेचच मंदिर परिसरामध्ये असणा-या रुग्णवाहीकेमधुन रुग्णालयात नेण्यात आले. परंतू, उपचारापुर्वीच तेथे त्यांचा मृत्यु झाला. अर्जदाराने तयांचे पत्रासोबत मयत भक्ताचे मृत्यु प्रमाणपत्र, दर्शन पास, व सदर साईभक्त अपंग असल्याचे प्रमाणपत्र जोडले आहे. सदर साईभक्ताचा मृत्यु मंदिर परिसरातील श्री साईबाबा संस्थानच्या दर्शनरांगेमध्ये झाला असल्यामुळे, अर्जदाराने मृत्यु झालेल्या साईभक्तावर अवलंबून असलेल्या त्यांचे वारसांना नुकसान भरपाई किंवा विमा संरक्षणाची रक्कम मिळणेबाबत विनंती केली आहे.

त्याअनुषंगाने, संस्थानच्या संरक्षण विभागाकडे चौकशी/तपासणी केली असता, दि.२५.०३.२०१८ रोजी, दिवसभरातील घडलेल्या घटनाबाबतच्या रजिस्टरमध्ये सदर घटनेची नोंद घेतलेली आहे.

श्री साईबाबांच्या दर्शनार्थ येणा-या भक्तांचे सुरक्षिततेसाठी दरवर्षी संस्थानमार्फत साईभक्ताकरीता राष्टीयकृत विमा कंपनीकंडून अपघाती व घातपाती विमा पॉलीसी घेतली जाते. यामध्ये सदरहु दुर्दैवी घटना संस्थान मालकीचे सर्व इमारती व त्यांचा परिसर, निवासस्थाने, रुग्णालये व गर्दीच्या काळात फुटपाथवर जिथपर्यंत भक्तांची दर्शन रांग जाईल, तिथपर्यंत तसेच मंदिर परिसर (चावडी, व्दारकामाई, गुरुस्थान व त्यांचा परिसरात) पालखी/रथ मिरवणूकीच्या दिवशी शिर्डी गावातील पालखी रोड, श्री रामनवमी उत्सवाच्या वेळेस बाबांच्या स्नानासाठी कावडीने पाणी आणणारे साईभक्त, खंडोबा मंदिर ते साई समाधी मंदिरापर्यंत पालखी घेऊन येणारे साईभक्त, असा वर्षात एकूण २५ साईभक्तांसाठी एक वर्षाकरीता कोणत्याही वयाचे स्त्री-पुरुष भक्तांसाठी एखाद्या दुर्घटनेत मृत्य झाल्यास राष्ट्रीयकृत विमा कंपनीकडून अपघाती/घातपाती विमा संरक्षण घेण्यात येत असते. त्यास अनुसरुन सन २०१७-१८ याही वर्षी अशा प्रकारची विमा पॉलीसी घेण्यात आलेली होती.

तथापी, साईभक्त कै. श्रीमती प्रेम बाई दामके, मध्य प्रदेश, यांचा मृत्यु हा घातपाती किंवा अपघाती स्वरुपाचा नसून, त्यांचा मृत्यु हा ह्दय विकाराच्या झटक्याने झाला असलेबाबत, डॉक्टरांनी दिलेल्या मृत्यु प्रमाणपत्रात नमूद केलेले आहे. त्यामुळे त्यांचा क्लेम विमा कंपनीकडे करता येणार नाही.

परंतु, काही दिवसांपुर्वी संस्थान परिसरामध्ये अशाच प्रकारे श्री साईसेवक कै.प्रमोद उपाध्ये, रोहा, रायगड व साईभक्त कै. थालूरी केशवराव, खमाम, आंन्ध्र प्रदेश, यांचा ह्दय विकाराच्या झटक्याने मृत्यु झाला

होता. त्यांच्या नातेवाईकांना एक विशेष बाब म्हणुन, संस्थानमार्फत रु.२५०००/- देण्यात आले आहेत. त्याच धर्तीवर कै. श्रीमती प्रेमबाई दामके, यांना एक विशेष बाब म्हणून त्यांच्या कुटुंबास रक्कम रु. २५,०००/- मात्र आर्थिक मदत देता येईल. असे मत आहे.

तरी, कै.श्रीमती प्रेमबाई दामके, मध्य प्रदेश,यांचा मृत्यु दर्शन रांगेत झालेला असल्याने तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी अधिनियम २००४ मधील कलम १७ (ण) नुसार मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहायय करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईन या तरतुदिनुसार त्यांना विशेष बाब म्हणून रु.२५,०००/- मात्र मदत देणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.५१८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कै.श्रीमती प्रेमाबाई दामके, मध्य प्रदेश यांचा मृत्यु दर्शन रांगेत झालेला असल्याने तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम १७ (ण) नुसार मानवजातीचे कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल या तरतुदीनुसार त्यांचे वारसास विशेष बाब म्हणून रु.२५,०००/- मात्र मदत देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)**

---

**विषय नं.१४** **दिनदयाळ बहुद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ यांना आत्महत्याग्रस्त परिवारातील महिलांच्या पुर्नवसनासाठी देण्यात आलेल्या निधीचे विनीयोगासाठी दुसऱ्यांदा सहा महिने मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** दीनदयाळ बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ यांनी आत्महत्याग्रस्त शेतकरी परिवारातील महिलांच्या पुर्नवसनासाठी कुटुंब आधार योजनेच्या माध्यमातून योजना राबविली आहे. पोशिंद्याचा आत्महत्या हा कलंक पुसण्याच्या माध्यमातून त्यांना प्रयत्न सुरू केला आहे. त्यास अनुसरून त्यानी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे आर्थिक अनुदान मागणी केली होती.

मा.व्यवस्थापन समितीचा निर्णय:-

दि.२७.०३.२०१७ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन मंडळाचे बैठकीत निर्णय क्र. २२९ अन्वये चर्चा होऊन दीनदयाळ बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ ही संस्था आत्महत्याग्रस्त शेतकरी परिवारांचे पालकत्व स्विकारून आधार देत आहे. त्यामुळे मानव जातीचे कल्याण या उद्दात्त हेतूने छाननी समितीचे मान्यतेने दीनदयाळ बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ या संस्थेस तुर्तास रु. १ कोटी मात्र रक्कम अनुदान स्वरुपात देण्यात यावी व सदरहू रकमेचा विनीयोग ते कशा प्रकारे करणार याबाबतचा त्यांचेकडून अहवाल घेण्यात यावा.

तसेच सदरहू अनुदान देणेपुर्वी छाननी समितीच्या पुर्व परवानगीने विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.

छाननी समितीचा निर्णय :-

आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील महिलांचे पुर्नवसनासाठी आर्थीक मदत देणेबाबतच्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात येऊन, दि.२७. ०३.२०१७ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. २२९ अन्वये रक्कम रु.१ कोटी मात्र अनुदान स्वरुपात आर्थिक मदत दिनदयाळ बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ यांना देणेस मान्यता देण्यात आली. परंतु वरील आर्थिक मदत वितरण करणेपुर्वी दिनदयाळ बहुउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ या संस्थेकडून रु. १ कोटी मात्र रकमेचा विनीयोग ती संस्था कशाप्रकारे, कोणत्या प्रकल्पातंर्गत व किती दिवसात करतील याची माहिति व बाधीत कुटुंबाची यादीसह सादर करावी. तसेच छाननी समितीचे मदतीबद्दलचे निकष क्र. २ ते ६ यांची पुर्तता करून घेण्यात यावी. त्याबाबत सर्व अटी शर्ती नमुद करून दिनदयाल बहूउद्देशीय प्रसारक मंडळ यांचेशी करारनामा करणेत यावा, असे ठरले.

शासन निर्णय:-

१. शासन निर्णय क्र. सासंवि-१०१७/९१२/प्र. क्र.९८/का.१६ दि. ०१ ऑगस्ट २०१७ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ च्या कलम १७ (१) मधील तरतुदीस अनुसरून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडून आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या परिवारातील महिलांच्या

पुर्नवसनासाठी दीनदयाळ बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, जिल्हा यवतमाळ या संस्थेमार्फत राबविण्यात येणा-या ''कुटूंब आधार योजना'' या योजनेसाठी एक विशेष बाब म्हणून रु. १ कोटी इतके अर्थसहाय्य देण्यास शासन मान्यता देण्यात आलेली आहे. त्यामधील अट क्रं. २ व ३ खालीलप्रमाणे आहे.

२. श्री संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडून अर्थसहाय्य करण्यात येणा-या सदर रकमेचा विनीयोग ६ महिन्यांच्या कालावधीत श्री साईबाबा संस्थानला सादर केलेल्या यादीतील बाधित कुटुंबासाठी शेळी पालन, गोपालन, किरणा दुकान, आटा चक्की, शिवणकाम मशिन इ. उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देण्यासाठी संस्थेने करणे बंधनकारक राहील.

३. श्री साईबाबा संस्थानमार्फत उपलब्ध करून देण्यात येणा-या सदर निधीचा उपयोग योग्य प्रकारे करण्यात आला आहे. याबाबत श्री साईबाबा संस्थानकडून दीनदयाळ बहूउद्देशीय प्रसारक मंडळ या संस्थेच्या कार्यालयास प्रत्यक्ष भेट देऊन निरीक्षण व पडताळणी करण्यात येईल.

मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय :-

मा. छाननी समितीच्या निर्णयाचे अनुषंगाने दिनदयाल बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ या संस्थेला रु.१.००कोटी देणेपुर्वी करारनाम्याच्या अटी शर्ती मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०.०८.२०१७ रोजीचे सभेत सादर केल्या असता, त्यावर निर्णय क्र. ७०८ अन्वये चर्चा होऊन, दीनदयाल बहुउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ यांचेशी करावयाच्या करारनाम्यातील अटी व शर्ती यांना मान्यता देण्यात आली.

करारनामा:- दि. २४.०८.२०१७ रोजी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे तर्फे मुख्यलेखाधिकारी यांनी व दीनदयाल बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ यांचेतर्फे सचिव श्री विजय पुरूषोत्त्म कद्रे यांचेशी अटी शर्ती नुसार करारनामा झाला आहे.

इंडेम्निटी बॉंड:- याबाबत संस्थान पॅनलवरील ॲड. यांचेशी संपर्क साधला असता त्यांनी दीनदयाल बहुउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ यांना रक्कम रु.१ कोटी देणेपुर्वी त्यांचेकडून क्षतीपुर्ती बंधपत्र (इंडेम्निटी बॉंड) लिहून घेणेबाबत कळविले आहे.

त्यानुसार दि.०३.१०.२०१७ रोजी दीनदयाल बहुउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ यांचे कडून क्षतीपुर्ती बंधपत्र (इंडेम्निटी बॉंड) लिहून घेण्यात आलेला आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:- दि.२५.०९.२०१७ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन मंडळाचे बैठकीत निर्णय क्र. ७९२ अन्वये मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद, खंडपीठात सदर अनुदान वितरणासंदर्भात जनहित याचिका दाखल केलेबाबत विस्तृत चर्चा करण्यात आली. पी. आय. एल. एस. टी नं. ३००६०/२०१७ मा. उच्च न्यायालयामध्ये दाखल आहे. परंतु मा. उच्च न्यायालयाने निधी देण्यास मनाई आदेश दिलेला नाही. याकरिता पंडीत दिनदयाळ बहुउद्देशीय संस्था यवतमाळ यांना मंजूर झालेला निधी देणेस हरकत नाही. असे समिती सदस्यांचे मत झाले व याबाबतची पुढील कार्यवाही प्रशासनाने सुरू करावी, असे ठरले.

दिनदयाल बहुउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ या संस्थेला रु. १.०० कोटी देणेसाठी मा. व्यवस्थापन समिती, छाननी समिती व महारष्ट्र शासन, यांनी मान्यता दिलेली आहे. तसेच सबंधीतांशी छाननी समितीच्या निर्णयाप्रमाणे करारनामा, इंडेम्निटी बॉंड झालेला आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील चर्चा:-

मात्र विधी विभागाचे दि. ०९.०९.२०१७ रोजीच्या टिपण्णीनुसार मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद, खंडपीठात सदर अनुदान वितरणासंदर्भात जनहित याचिका दाखल केल्याचे दिसते. त्यासंदर्भात दि. २५.०९.२०१७ रोजीचे सभेत सदरहू विषयावर विस्तृत चर्चा झाली. पी. आय. एल. एस. टी नं. ३००६०/२०१७ मा. उच्च न्यायालयामध्ये दाखल आहे. परंतु मा. उच्च न्यायालयाने निधी देण्यास मनाई आदेश दिलेला नाही. त्यामुळे पंडीत दिनदयाळ बहुउद्देशीय संस्थेस अनुदान देणेबाबत मा. व्यवस्थापन समितीने सहमती दर्शविली आहे.

रक्कम आदा:- मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयान्वये दीनदयाल बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ यांनी त्यांचा बचत खाते नंबर- 34537996235, IFSC- SBIN0011428 असा कळविला होता. सदरची रक्कम रु. १,००,००,०००/- (अक्षरी रु. एक कोटी मात्र) RTGS द्वारे स्टेट बॅंक ऑफ इंडिया, शाखा यवतमाळ येथे बचत खात्यामध्ये दि. ९.१०.२०१७ रोजी जमा झालेली आहे.

शासन निर्णय अट क्रं. २:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी विधी व न्याय विभागाचे निर्णयाप्रमाणे दीनदयाल बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ रक्कम आदा करण्यात आली. शासन निर्णयातील अट क्रं. २ अन्वये "श्री संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडून अर्थसहाय्य करण्यात येणा-या सदर रकमेचा विनीयोग ६ महिन्यांच्या कालावधीत श्री साईबाबा संस्थानला सादर केलेल्या यादीतील बाधित कुटुंबासाठी शेळी पालन, गोपालन, किरणा दुकान, आटा चक्की, शिवणकाम मशिन इ. उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देण्यासाठी संस्थेने करणे बंधनकारक राहील." अशी अट घालण्यात आली होती.

अहवाल मागणी:- दीनदयाल बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ यांना अनुदान देऊन तीन महिने झालेनंतर जा. नं. एसएसएस/वशी-लेखा-अनुदान/५५९४/२०१८ दि. २० जानेवारी २०१८ अन्वये १) साहित्य वितरणाची सद्यस्थिती काय आहे २) जिल्हाधिकारी यांनी मंजूर केलेली आत्महत्याग्रस्त शेतक-यांची मंजूर यादीची प्रत पाठवावी. ३) साहित्य वितरणाची कार्यवाही सुरू केली असल्यास, आतापर्यंत वितरीत केलेल्या साहित्याचा तपशील खालील नमुन्याप्रमाणे पाठविण्यात यावा.

| अ न. | लाभार्थींचे नाव व पत्ता | जिल्हाधिका यांच्या- यांच्या- शेतकग्रस्तआत्महत्या यादीतील अनुक्रमांक | वाटप केलेले साहित्य | साहित्याची किंमत |
|---|---|---|---|---|
| | | | | |

तसेच उपरोक्त नमुन्यातील अहवाल दरमहा १० तारखेपर्यंत पाठविण्यात यावा. असे कळविण्यात आले होते.

माहिती:- त्यास अनुसरून दीनदयाल बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ यांचे दि. ०८.०२.२०१८ रोजीचे पत्र प्राप्त झाले असून सदर पत्रात त्यांनी आमचे संस्थेतर्फे प्रकल्पाचे अंमलबजावणीकरिता उपसमिती स्थापन करण्यात आलेली आहे. २) संस्थानला सादर केलेल्या ३८८ परिवाराचे सर्वेक्षण सुरू केले असून ७२ कटुंब जिल्हाधिकारी यांनी पात्र असल्याचे कळविले असून त्यापैकी ५२ कुटुंबाची आवश्यक कागदपत्र संकलित करण्यात आली असून उर्वरीत परिवारांच्या कागदपत्रांचे संकलनाचे कार्य चालु असुन सोबत व्यवसाय निश्चितीचे काम देखील सुरु आहे. ३) आत्महत्याग्रस्त शेतकरी परिवाराकरिता आरोग्य शिबीराचे आयोजन संस्थेच्या दीनदयाल प्रबोधिनी मध्ये करण्यात आले असून त्यासाठी पुणे येथील ख्यातनाम स्त्रीरोग तज्ञ यांनी तपासणी करून उपचार केले आहेत. ४) पात्र कुटुंबातील विद्यार्थ्यांना शैक्षणीक अर्थसहाय्य देखील करण्यात आले. ५) कुटुंब आधार योजनेचा एक भाग म्हणून भाऊबीज निमीत्त परिवारांना भेट देवून साडी चोळी देण्यात आली. ६) पात्र परिवारांचे सर्वेक्षण तसेच कागदपत्रे संकलनाचे काम पुर्ण झालेनंतर व्यवसाय निश्चितीकरिता तालुकानिहाय बैठकीचे आयोजन करण्यात येणार असून त्यानंतर या परिवारांना संबंधीत व्यवसायाचे तज्ञांकडून प्रशिक्षण देण्याची सुद्धा संस्थेची योजना आहे. त्यानंतर सबंधीत परिवारांना निवडलेल्या व्यवसायानुसार सहाय्य करण्यात येणार आहे. ७) पात्र परिवारांना वस्तु वितरीत करतांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे पदाधिका-यांना निमंत्रीत करण्यात येईल असे कळविले आहे.

अहवाल मागणी:- त्यानंतर पुनश्चः जा.नं.एसएसएस/वशी-लेखा-अनुदान/६८५६/२०१८ दि.२१ मार्च २०१८ अन्वये दीनदयाल बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ यांचेशी शासन निर्णयातील अट क्रं.२ अन्वये "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडून अर्थसहाय्य करण्यात येणा-या सदर रकमेचा विनीयोग ६ महिन्यांच्या कालावधीत श्री साईबाबा संस्थानकडे सादर केलेल्या यादीतील बाधित कुटुंबियांसाठी शेळी पालन, गोपालन, किराणा दुकान, आटा चक्की, शिवणकाम मशिन इ. उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देण्यासाठी सदर संस्थेने बंधनकारक राहील" अशी तरतुद आहे.

आपणांस अनुदान दिलेल्या रकमेचा कालावधी दि. ०८.०४.२०१८ रोजी पुर्ण होत असून, आपणांस यापुर्वीच्या पाठविलेल्या पत्राप्रमाणे कार्यवाही करून, खर्च झालेला निधीचे अंतिम विवरण सादर करावे तसेच शिल्लक राहिलेला निधी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकडे जमा करण्यात यावा. असे कळविण्यात आले होते.

मुदतवाढ मिळणेबाबत पत्र:- त्यास अनुसरून दीनदयाल बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ यांचे दि.१५.०३.२०१८ रोजीचे पत्र प्राप्त झाले असून त्यांनी ९३ परिवार शासकीय पात्र यादीत असल्याचे आढळून आले आहेत. कागदपत्र संकलनाचे तसेच या परिवाराशी चर्चा करून व्यवसाय निश्चितीचे कार्य आजही सुरू आहे.

या परिवारासोबत आजपर्यंत झालेल्या प्राथमिक चर्चेनुसार अधिकतम परिवार शेळीपालन व दुग्धव्यवसाय करण्यात इच्छुक आहे. परंतु यावर्षी विशेषतः यवतमाळ जिल्हयात अत्यंत कमी पाऊस पडल्यामुळे भीषण दुष्काळ आहे. लोकांना पिण्याचे पाणी देखील उपलब्ध नाही. अशा अवस्थेत पशुपालनसारखा व्यवसाय करणे अत्यंत अवघड आहे. त्याकरिता येणा-या पावसाळयाची वाट पहाणे क्रमप्राप्त आहे.

या परिवाराच्या मागणीनुसार सध्याच्या अवस्थेत शेळीपालन अथवा दुग्धव्यवसाय सुरू करणे केवळ अशक्य आहे. त्यामुळे त्यांनी संस्थेला पावसाळा सुरू झाल्यानंतर व पुरेशे पाणी व चारा उपलब्ध झाल्यानंतर त्यांना शेळीपालन अथवा दुग्ध व्यवसाय सुरू करणे जास्त उपयुक्त आणि संयुक्तीक होईल.

तेव्हा आपणांस विनंती की, सदर परिवारांचे पुर्नवसनाकरिता "कटुंब आधार योजनेअंतर्गत" संस्थेस प्राप्त झालेल्या निधीचा विनीयोग करण्यासाठी ६ महिने मुदतवाढ मिळावी अशी विनंती केली आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:- सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि.०२.०५.२०१८ चे बैठकीत निर्णयार्थ सादर केला असता त्यावर निर्णय क्रं. ३०५ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे. "दिनदयाल बहुउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ यांना कुटूंब आधार योजनेअंतर्गत देण्यात आलेल्या आत्महत्याग्रस्त शेतकरी परिवारातील महिलांच्या पुर्नवसन निधीचे विनीयोगास ६ महिने मुदतवाढ देण्यास व तसा प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे सादर करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे व करारनाम्यातील अटी व शर्तीनुसारच सदरची रक्कम खर्च करण्यात यावी याबाबत संबधीतांना सुचीत करण्यात यावे," असे ठरले.

तसेच जा.न.एसएसएसटी/वशी/लेखा-अनुदान/९३९/२०१८ दि. २५ मे. २०१८ अन्वये करारनामा, क्षतिपुर्ती बंधपत्र व शासन निर्णयाव्यतिरिक्त इतर बाबींवर खर्च करण्यात येऊ नये, सदर खर्च अमान्य करण्यात येईल याबाबत संस्थेस कळविणे आलेले आहे.

मुदतवाढीबाबत शासनास पत्र:- मा व्यवस्थापन समितीचे सभेचे मान्यतेने जा.न.एसएसएस/वशी-लेखा-अनुदान/९३१/२०१८ दि. २४ मे. २०१८ अन्वये दिनदयाल बहुउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ यांना कुटूंब आधार योजनेअंतर्गत देण्यात आलेल्या आत्महत्याग्रस्त शेतकरी परिवारातील महिलांच्या पुर्नवसन निधीचे विनीयोगास ६ महिने मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे सादर करण्यात आला होता. त्यावर शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय:- उपरोक्त संदर्भ क्रं.३ अन्वये आत्महत्याग्रस्त शेतकरी परिवारातील महिलांच्या पर्नुवसनासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मार्फत दीनदयाल बहुउद्देशिय प्रसारक मंडळ, यवतमाळ यांना रु. १ कोटी इतक्या रकमेच्या विनीयोगाच्या कालावधीस पुढील ६ महिन्यांची मुदतवाढ देण्यात आलेली आहे. मुदवाढ दि. ३१ जुलै २०१८ पर्यंत राहील असा शासन निर्णय पारीत झाला आहे. त्यानुसार दीनदयाल बहुउद्देशिय प्रसारक मंडळ, यवतमाळ यांचेकडून खालीलप्रमाणे माहिती मागविण्यात आली होती.

संस्थेस पत्र:- विधी व न्याय विभागाच्या शासन निर्णयानुसार जा. न. एसएसएसटी/वशी/लेखा-अनुदान/ ३१२३/२०१८ दि. ३१.०७.२०१८ अन्वये पत्रव्यवहार केला, असून अर्थसहाय्य उपयोगिता प्रमाणपत्र, लेखापरिक्षण अहवाल, क्षतिपुर्ती बंधपत्र व करारानामा अटी शर्तीनुसार पुर्तता अहवाल मागणी केली होती.

मुदतवाढीबाबत संस्थेचे पुन्हा पत्र:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी कडून संस्थेला दि. ०९.१०.२०१७ रोजी निधी प्राप्त झालेला होता. विधी व न्याय विभागाचा शासन निर्णय क्र. सासंवि-१०१७/९१२/प्र. क्र.९८/का.१६ दि. ०१ ऑगस्ट २०१७. नुसार रक्कम विनीयोग मुदत दि. ०८.०४.२०१८ पर्यंत होती, त्यामुळे मुदतवाढ म्हणजे दि. ०७.१०.२०१८ पर्यंतचा कालवधी संस्थेस अपेक्षीत होता परंतु विधी व न्याय विभागाचा शासन निर्णय क्र. सासंवि-१०१७/९१२/प्र. क्र.९८/का.१६ दि. ३० जुलै २०१८ चे शासन निर्णयानुसार रक्कम विनीयोग कालावधीस ६ महिने मुदतवाढ देण्यात आली असून ही मुदत वाढ दि. ३१ जुलै २०१८ पर्यंत राहील असे कळविले आहे. त्यामुळे आमच्या दि. १५ मार्च २०१८ चे पत्रान्वये केलेली मागणी मंजूर होऊन मुदत वाढ मिळावी अशी विनंती केली आहे.

विभागाचा अभिप्राय:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी कडून दीनदयाल बहुउद्देशिय प्रसारक मंडळ, यवतमाळ संस्थेला दि. ०९.१०.२०१७ रोजी रक्कम रु. १ कोटी निधी वितरीत केलेला आहे. सदर निधीचा विनयोग दि. ३० जुलै २०१८ च्या शासननिर्णयानुसार ६ महिन्यांत करणे अपेक्षित होते, मात्र संस्थेने या कालावधीत विनीयोग न करता आणखी ६ महिने मुदतवाढीची मागणी केलेली आहे. सदर विनंतीनुसार शासनाने दि. ३०. ०७. २०१८ च्या शासननिर्णयानुसार ६ महिने मुदतवाढ मंजूर केली आहे. संस्थेला अनुदान वितरीत होऊनही १० महिन्यांचा कालावधी झाला आहे. आता संस्थेला अनुदानाचा विनीयोग करण्यासाठी पुरेसा कालावधी मिळालेला आहे. त्यामुळे या संस्थेला यापुढे अनुदानाचा विनीयोग करण्यासाठी त्यांच्या विनंतीनुसार ६ महिने मुदतवाढ देणे योग्य होणार नाही.शिल्लक अनुदान दीनदयाल बहूउद्देशीय प्रसारक मंडळ यवतमाळ यांचेकडून परत मागविणेत यावे.दीनदयाल बहूउद्देशीय प्रसारक मंडळ यवतमाळ या संस्थेशी केलेल्या करारनामा, क्षतिपुर्ती बंधपत्र व शासननिर्णयातील अटी शर्ती पुर्तता व झालेल्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र मागविण्यात

यावे.संस्थेने सादर केलेले उपयोगिता प्रमाणपत्र, जिल्हाधिकारींचे लाभार्थी यादीतील नाव, दिलेला लाभ, लेखापरिक्षण अहवाल मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने शासनास सादर करण्यात येईल.

प्रस्ताव:- दीनदयाल बहुउद्देशीय प्रसारक मंडळ यवतमाळ यांना अनुदान विनीयोगासाठी ६ महिने मुदतवाढ देणेचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.५१९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, दिनदयाल बहुउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ यांना अनुदान विनियोगासाठी सहा महिने मुदतवाढ देण्यात आली, त्यांनी सदर योजनेची आवश्यक ती कार्यवाही पुर्ण केली असुन, सप्टेंबर-२०१८ मध्ये ते निधीचा विनियोग करणार आहे. त्यामुळे त्यांना १ ऑगस्ट,२०१८ पासून पुढील सहा महिने मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविणेत यावा, असे ठरले. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)**

---

विषय नं.१५ **नंदीग्राम वैद्यकीय सहकारी संस्था मर्यादित, नांदेड यांचे श्री गुरुजी सहकार रुग्णालय यांना कॅथ लॅब व सिटी स्कॅन उपकरणासाठी रक्कम रु.३.६५ कोटी आर्थिक मदत मिळणेच्या प्रस्तावावर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** अध्यक्ष नंदीग्राम वैद्यकीय सहकारी संस्था मर्यादित नांदेड यांनी त्यांचे दि. ३०.०५.२०१८ (प्राप्त दि. २१.०६.२०१८) चे पत्रान्वये संस्थेच्या नांदेड येथे सुरू होत असलेल्या श्रीगुरूजी सहकार रुग्णालयाला कॅथलॅब व सीटीस्कॅन मशीनसाठी रु. ३.६५ कोटी एवढया अर्थसहाय्याची मागणी केली आहे. मा. मुख्यमंत्री महोदय, यांनी त्यासाठी शिफारस केली आहे.

नंदीग्राम वैद्यकीय सहकारी संस्था मर्यादित नांदेड ही सेवाभावी वृत्तीने काम करणारी संस्था असून सामाजिक जाणीव ठेवून सर्वसामान्यांसाठी सर्वसुविधांनी सुसज्जीत असे अत्याधुनिक असे श्रीगुरूजी सहकार रुग्णालय सुरू करीत आहे. सदरहू रुग्णालय हे संपूर्णतः सामाजिक जाणीव ठेवून चालविले जाणार असून गोरगरीब, मध्यमवर्गीय व इतर रुग्णांसाठी हे वरदान ठरणार आहे या रुग्णालयात सर्व शाखांचे तज्ञ डॉक्टरांसोबतच अत्याधुनिक यंत्रसामुग्री राहील तसेच सुरवातीला १५० खाटांचे व पुर्ण विस्तार झाल्यानंतर ३०० खाटांची सुविधा असणार आहे. असे त्यांचे प्रस्तावात नमूद केले आहे.

मागणी:- श्री गुरूजी सहकार रुग्णालय यांनी कॅथ लॅब व सिटी स्कॅन मशीनसाठी एकूण खर्च रु. ३ .६५ कोटी (कॅथ लॅबसाठी रु. १.६५ कोटी + सीटी स्कॅन मशीनसाठी रु. २ कोटी) मिळणेबाबत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना विनंती केली आहे.

संस्थेने सी.टी स्कॅन व कॅथलॅब साठी दरपत्रके सादर केलेली आहेत त्याचा तपशील खालीलप्रमाणे

| अ.न. | उपकरण | कंपनी | तांत्रिक वर्णन | दरपत्रक |
|---|---|---|---|---|
| 1 | CT scanner | MEDIRAYS | New Insitum 64S (64 slice) CT scanner with standard accessories & 100 KVA Online UPS system | Rs.2,25,00,000/- |
| 2 | Cathlab | Allengers | Model : Allengers Life FP<br>Series :Photon F80<br>Mobile Cathlab 80KW with FPD | Rs. 1,65,00,000/- |
| | | | Total | Rs. 3,90,00,000/- |

अर्थसहाय्य करणेबाबत संस्थान अधिनियमातील तरतुद:-

अधिनियम कलम २१ (२) पोट-कलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल.

(एक) राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, किंवा क्रिडा अकादमी वा संस्था सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निरीश्रित अथवा शारीरिक दृष्टया विकलांग व्यक्तीसाठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला वा साहित्य क्षेत्राशी संबंधित असलेली एखादी नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांचेकडून अन्य कोणत्याही बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अनुदान देण्याची तरतुद आहे." मात्र यासाठी प्रथम शासन नियुक्त छाननी समितीची शिफारस घेणे आवश्यक आहे.

विभागाचा अभिप्राय:- नंदीग्राम वैद्यकीय सहकारी संस्था मर्यादित नांदेड ही संस्था २०१७ मध्ये नोंदणीकृत झालेली आहे.

मा. छाननी समितीचे नियमावलीनुसार सबंधीत संस्थेचे मागील तीन वर्षाचे लेखापरिक्षण अहवाल सादर करणे अपेक्षित आहे. मात्र संस्था नोंदणीकृत होऊन एकच वर्ष झालेले असल्याने मागील तीन वर्षाचे लेखापरिक्षण अहवाल उपलब्ध नाहीत.

संस्थेच्या रुग्णालयाची अद्याप उभारणी झाली नाही म्हणजे संस्थेच्या प्रत्यक्ष कामकाजाला अद्याप सुरवात झालेली नाही.

संस्थानच्या अधिनियमातील कलम २१(२) पोटकलम (१) मधील तरतुदीनुसार नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांना अनुदान देण्याची तरतुद आहे. नंदीग्राम वैद्यकीय सहकारी संस्था मर्यादित, नांदेड ही संस्था सोसायटी ॲक्ट हा १८६० नुसार नोंदणीकृत नसून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये नोंदणीकृत आहे. त्यामुळे अधिनियमानुसार सदर संस्था ही आर्थिक सहाय्य देणेबाबतच्या निकषात अपात्र ठरत आहे.

राज्यामध्ये ट्रस्टमार्फत, सहकारी संस्थामार्फत अनेक रुग्णालये चालविण्यात येत आहेत तेही अशीच मागणी करू शकतील.

आक्टोंबर २०१७ ते आक्टोंबर २०१८ या कालावधीत श्री साई समाधी शताब्दी वर्ष साजरे करण्याचा निर्णय व्यवस्थापन समितीने घेतलेला आहे. त्यासाठी विविध विकास कामांकरिता रु.३०२३ कोटी रुपयांचा कृतीआराखडयास शासनाने मान्यता दिलेली आहे. परंतु निधी प्राप्त नाही त्यामुळे संस्थानचा स्वतःचा निधीही खर्च होणार असल्याने सबंधीतांना मदत देणे योग्य होणार नाही.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता सदर संस्थेला अनुदान मंजूर करणे उचित होणार नाही असे मत आहे.

प्रस्ताव:- नंदीग्राम वैद्यकीय सहकारी संस्था मर्यादित, नांदेड यांचे श्रीगुरुजी सहकार रुग्णालय यांना कॅथ लॅब व सीटी स्कॅन उपकरणासाठी रक्कम रु. ३.६५ कोटी आर्थिक मदत मिळणेच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५२०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, नंदीग्राम वैद्यकीय सहकारी संस्था मर्यादित, नांदेड यांचे श्री गुरुजी सहकार रुग्णालय यांना कॅथ लॅब व सिटी स्कॅन उपकरणासाठी रक्कम रु.३.६५ कोटी आर्थिक मदत देणेबाबत मा. मुख्यमंत्री महोदय यांची शिफारस असल्याने तत्वता मान्यता देण्यात आली. तथापी सदर रुग्णालयाची नोंदणी सोसायटी ॲक्ट १९६० नुसार झालेली असल्याने आर्थीक अनुदान देता येईल काय ? याबाबत शासनाचे मार्गदर्शन घेण्यासाठी विधी व न्याय विभागाकडे प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)**

---

**विषय नं.१६** **शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना देय असलेल्या सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या मालमत्ता करावरील दंडनीय रक्कम रु.१,०१,५०१/- (रु.एक लाख एक हजार पाचशे मात्र) भरणेबाबत.**

प्रस्ताव- अधिनियमातील तरतूद– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम २१(१)(ज) मध्ये त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये विश्वस्तव्यवस्थेकडून देय असलेले कोणतेही कर,भाडे, भरपाई,आकार व इतर रकमा यांचे प्रदान करील,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना– शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांचेकडील दि.२२/०६/२०१८ रोजीच्या पत्रांन्वये सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांच्या एकूण १३० मालमत्तांवरील संकलित कर, शिक्षण कर,रोजगार हमी कर,वृक्ष कर,अग्निशमन कर इ.कराची आकारणी मागणीची एकूण रक्कम रु.९८,४१,३००/- (अक्षरी रु.अठ्ठयाण्णव लाख एक्केचाळीस हजार तीनशे मात्र) इतकी कळविलेली असून त्यासोबत त्यांनी मालमत्ता कराची यादी व बीले सादर केलेली आहेत.

तसेच सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचे शिर्डी बसस्थानक भोगवटादार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे नावे मालमत्ता क्रं.बी १००१४९४ चे कराचे बील रक्कम रु.४,११,३२६/- (अक्षरी रु.चार लाख अकरा हजार तीनशे सव्वीस मात्र) इतकी कळविलेली असून त्यासोबत मालमत्ता कराची यादी व बील सादर केलेले आहे.

उपरोक्त बीलांवरील रकमेचा चेक बीले मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत नगरपंचायत कार्यालयात भरणा केल्यास नगरपंचायत अधिनियम १९६५ चे कलम १५०(३) अन्वये संकलित करावर १% सूट देण्याची तरतूद आहे, असे नगरपंचायतने कळविलेले आहे.

त्याप्रमाणे संकलित करावर १% सूट रक्कम रु.४९,३४४/- इतकी वजा करुन रक्कम रु.९७,९१,९५६/- इतकी होत आहे. तसेच शिर्डी बसस्थानक मालमत्ता क्रं.बी १००१४९४ चे संकलित करावर १% सूट रक्कम रु.२,०८५/- वजा करुन रक्कम रु.४,०९,२४१/- इतकी होत आहे.

मात्र शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचे करांचे सादर केलेल्या बीलामध्ये सन २०१७-१८ या वर्षाचे मालमत्ता करावरील दंडनीय व्याजाची रक्कम रु.१,०१,५०१/- इतकी थकबाकी म्हणून दर्शविलेली आहे.

मागील सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे कराची रक्कम भरणा करणेच्या संदर्भात मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.७६७ प्रमाणे संस्थानमार्फत शिर्डी नगरपंचायतीस वेळोवेळी बराचसा निधी दिला जातो. याकरीता शिर्डी नगरपंचायतीने संस्थान इमारतींचा कर माफ करावा,असे त्यांना कळविणेत यावे, असेबाबत निर्णय झालेला आहे. सदर निर्णयाप्रमाणे नगरपंचायतबरोबर पत्रव्यवहार केलेला आहे. तरीदेखील मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी उपरोक्त दि.०५/१२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये मालमत्ता व इतर करांची मुळ रक्कम रु.१,०२,६६,०७३/- वरील व्याजासह होणारी रक्कम रु.१,०३,६८,७३१/- इतकी व परिवहन महामंडळाचे इमारतीची मुळ रक्कम रु,४,०७,२५३/- वरील व्याजासह होणारी रक्कम रु.४,११,३२६/- इतकी नगरपंचायतीकडे भरणा करणेबाबत कळविलेले आहे.

यास्तव उपरोक्त मालमत्ता कराची सन २०१७-१८ या वर्षाची व्याजासह होणारी कराची रक्कम रु.१,०३,६८,७३१/- इतकी व परिवहन महामंडळाचे इमारतीची व्याजासह होणारी कराची रक्कम रु.४,११,३२६/- इतकी शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना अदा करणेकामीच्या निर्णयार्थ सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/१२/२०१७ रोजीच्या सभेपूढे सादर करणेत आला. त्यात निर्णय क्रं.१०५८ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, "सन २०१७-१८ या वर्षाच्या संस्थानच्या मालमत्ता कराची रु.१,०२,६६,०७३/- मात्र रक्कम व परिवहन महामंडळाचे इमारतीच्या मालमत्ता कराची रु.४,०७,२५३/- मात्र रक्कम शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना अदा करणेस मान्यता देण्यात आली. तसेच या रकमांवरील दंडनीय व्याजाची आकारणी न करणेबाबत शिर्डी नगरपंचायतीस कळविणेत यावे,"असे ठरले.

उक्त निर्णयाच्या अनुषंगाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांची शिर्डी येथील मालमत्ता कराची सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाची मालमत्ता कराची रक्कम रु.१,०२,६६,०७३/- (अक्षरी रु.एक कोटी दोन लाख सहासष्ट  हजार त्र्याहत्तर मात्र) तसेच शिर्डी येथील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचे मालकीचे मिळकतीमधील संस्थानच्या  ताब्यात असलेल्या भक्तनिवास इमारतीच्या सन २०१७-१८ या वर्षाची मालमत्ता   कराची रक्कम रु.४,०७,२५३/- इतकी  RTGS द्वारे नगरपंचायत,शिर्डी यांचेकडेस अलाहीदा अदा करण्यात आलेली असून उपरोक्त कराच्या रकमा नगरपंचायतीस अदा करणेकामी नगरपंचायतीबरोबर संस्थानचा पत्रव्यवहार चालू होता. अशा कालावधीसाठी उक्त कराच्या रकमेवर दंडनीय व्याजाची रक्कम आकारणी करणे विधीग्राहय ठरत नाही. तरी दि.०५/१२/२०१७ रोजीच्या पत्रात नमूद केलेप्रमाणेची दंडनीय व्याजाची रक्कम आकारणी करु नये असेबाबत मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना इकडील पत्र क्रं.एसएसएसटी/ मालमत्ता/५०७५ /२०१७ दि.२२/१२/२०१७ अन्वये अलाहीदा कळविणेत आलेले आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम २१ मधील तरतुदीनुसार तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.१००९ प्रमाणे संस्थान मिळकतीचे संबंधातील नियमानुकूल शासकीय अथवा निमशासकीय कर,भाडे,भरपाई,आकार व इतर शासनास देय असलेल्या रकमा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचे स्तरावर शासनास अदा करावे, असेबाबतचा निर्णय झालेला आहे. त्यास अनुसरुन नगरपंचायत,शिर्डी यांनी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाची सादर केलेल्या मालमत्ता कराचे बीलांमध्ये दर्शविलेली खालील तक्त्यात नमूद केलेप्रमाणेची दंडाची रक्कम (थकबाकी) व १% संकलित करावरील सुट रक्कम वजा करुन उर्वरित रक्कम रु.१,००,९९,६९६/- इतकी RTGS द्वारे वर्ग करणेत आलेली आहे.

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाची मालमत्ता कराची रक्कम

| अ.नं. | मालमत्ता तपशिल | थकबाकी रक्कम | चालू मागणी रक्कम | एकूण रक्कम | १% सुट रक्कम | थकबाकी व १% सूटीची एकूण रक्कम (रकाना ३+ ६) | थकबाकी व १% सुट वजा करुन नगरपंचायतीस अदा केलेली रक्कम (रकाना ५-७) |
|---|---|---|---|---|---|---|---|

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एकूण १३० मालमत्ता | रु.९७,४२८/- | रु.९७,४३,८७२/- | रु.९८,४१,३००/- | रु.४९,३४४/- | रु.१,४६,७७२/- | रु.९६,९४,५२८/- |
| २ | एस.टी. बसस्थानकातील भक्तनिवास इमारत | रु. ४,०७३/- | रु. ४,०७,२५३/- | रु. ४,११,३२६/- | रु. २,०८५/- | रु. ६,१५८/- | रु. ४,०५,१६८/- |
| | एकूण | रु.१,०१,५०१/- | रु.१,०१,५१,१२५/- | रु.१,०२,५२,६२६/- | रु.५१,४२९/- | रु.१,५२,९३०/- | रु.१,००,९९,६९६/- |

सन २०१७-१८ या वर्षाचे संस्थानचे मालमत्ता कराचे रकमेवरील दंडनीय व्याजाची रक्कम रु.१,०१,५०१/- (उपरोक्त दर्शविलेली थकबाकी) इतकी माफ करणेत यावी. सदर दंडनीय व्याजाची रक्कम व १% सुटची रक्कम वजा जाता उर्वरित सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाची मालमत्ता कराची रक्कम रु.१,००,९९,६९६/- इतकी RTGS द्वारे नगरपंचायत,शिर्डी यांना अदा करणेत आलेली आहे व उक्त सन २०१७-१८ ची दंडनीय व्याजाची रक्कम माफ करणेकामी इकडील पत्र क्रं.एसएसएसटी/मालमत्ता/१८०७/२०१८ दि.१३/०७/२०१८ अन्वये मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना कळविणेत आलेले आहे.

त्यास अनुसरुन शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांचेकडील जा.क्रं.नपं/टे-५/१७४/२०१८ दि.२४/०७/२०१८ चे पत्रान्वये सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचे मालमत्ता कर व इतर करांचे मागणी बीलापोटी संस्थानकडून रक्कम रु.१,००,९९,६९६/- इतकी रक्कम RTGS द्वारे बॅकेत जमा झालेली असून त्याप्रमाणे पावत्या देण्यात येत आहेत. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे करांचे रकमेवरील दंडनीय व्याजाची रक्कम रु.१,०१,५०१/- मात्र सॉफटवेअरमध्ये प्रथम थकबाकी वसुल करण्याची प्रणाली असल्याने सदरची थकीत व्याजाची रक्कम प्रथम वसुल करण्यात आलेली आहे. यास्तव चालू मागणी बीलातील थकबाकीपोटी शिल्लक राहीलेली रक्कम रु.१,०१,५०१/- चा चेक नगरपंचायतीकडे जमा करावा, असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

विभागाचा अभिप्राय- नगरपंचायत,शिर्डी यांनी उपरोक्तप्रमाणे थकबाकीपोटी दर्शविलेली रक्कम रु.१,०१,५०१/- इतकी नगरपंचायतीस अदा न केल्यास सॉफटवेअर प्रणालीमुळे सदरच्या थकबाकी रकमेत यापूढेही वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यास्तव सदरची रक्कम रु.१,०१,५०१/- इतकी लेखाशाखेमार्फत RTGS द्वारे नगरपंचायतीस अदा करणे उचित होईल.

शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या करांचे रकमेवरील दंडनीय व्याजाची (थकबाकी दर्शविलेली) रक्कम रु.१,०१,५०१/- (अक्षरी रु.एक लाख एक हजार पाचशे एक मात्र) इतकी अदा करणेकामीच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५२१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना संस्थानकडून वेगवेगळया कामासाठी मोठया प्रमाणात आर्थिक निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना देय असलेल्या सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या मालमत्ता करावरील दंडनीय रक्कम रु.१,०१,५०१/- मात्र माफ करणेबाबत सर्व समिती सदस्यांनी मा.अध्यक्ष,नगरपंचायत तथा समिती सदस्या यांना विनंती केली असता दंडनीय रक्कम रु.१,०१,५०१/- मात्र माफ करणेबाबत नियमातील तरतुदीनुसार तपासुन कार्यवाही करण्याचे मान्य केले.**

**(कार्यवाही-प्र.अधिक्षक,मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.१७** **बांबूपासुन बनविलेल्या वस्तूंचे विक्रीसाठी गाळा उपलब्ध करुन देणेबाबत मा.मॅनेजिंग डायरेक्टर, महाराष्ट्र राज्य बांबु डेव्हलपमेंट बोर्ड, नागपुर यांचेकडील पत्र एमडी/ एमबीडीबी/ सी.नं.19/ 207/ 2018-19, दि.12.07.2018.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना - मा.मॅनेजिंग डायरेक्टर,महाराष्ट्र राज्य बांबु डेव्हलपमेंट बोर्ड,नागपूर यांनी त्यांचेकडील पत्र एमडी/एमबीडीबी/ सी.नं.१९/२०७/२०१८-१९ दि.१२/०७/२०१८ अन्वये बांबुपासून वस्तू बनविणारे कारागीर यांचे जीवनमान उंचावण्यासाठी त्यांना मदत व्हावी या दृष्टिकोनातून त्यांनी बांबुपासून हस्तकेलेतून बनविलेल्या

वस्तू विक्री करणेकामी संस्थान परिसरात जागा/गाळा उपलब्ध करुन देणेकामी संस्थानकडे विनंती केलेली असून त्यात त्यांनी संस्थान मालकीच्या जमीनींमध्ये बांबुची लागवड केल्यास त्यापासून सुशोभीकरणाशिवाय संस्थानला उत्पन्नाचे साधन देखील निर्माण होईल, असेबाबत सुचित केलेले आहे.

उक्त पत्राच्या अनुषंगाने संस्थानचे बगीचा विभागाने त्यांचेकडील दि.३१/०७/२०१८ रोजी कार्यालयीन टिपणी सादर करुन त्यात "महाराष्ट्र बांबु डेव्हलपमेंट बोर्ड नागपूर यांचे पत्रानुसार हस्तकलेतून बनविलेल्या बांबुच्या वस्तूंची विक्री करणेकामी साईबाबा भक्तनिवासस्थान येथे मालमत्ता विभागामार्फत जागा उपलब्ध करुन देवून त्यांना सदर वस्तूची विक्री करणेकामी परवानगी देता येईल. तसेच सदर वस्तूंच्या विक्रीबाबत महाराष्ट्र बांबु डेव्हलपमेंट बोर्ड,नागपूर यांच्या पुढील कार्यवाहीबाबत जाणून घेणेकामी त्यांना पत्रव्यवहार करता येईल. तरी त्यास मान्यता असावी,"असेबाबत नमूद केलेले आहे. सदर टिपणीवर मा.उपजिल्हाधिकारी यांनी मालमत्ता विभागामार्फत एक गाळा देण्याबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करावा, असे सुचित केलेले आहे.

त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करणेकामी सदरच्या टिपणीची छायांकित प्रत बगीचा विभागामार्फत मालमत्ता विभागाकडे प्राप्त झालेली आहे.

सदर टिपणीचे अनुषंगाने इकडील जा.क्रं.एसएसएसटी/मालमत्ता/१२९२/२०१८ दि.०४/०८/२०१८ अन्वये साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) या ठिकाणी उक्त वस्तू विक्रीसाठी गाळा उपलब्ध करुन देता येईल किंवा कसे?असल्यास गाळयाचे आकारमान किती राहील? याबाबतचे प्र.अधिक्षक,साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) यांचे अभिप्राय मागविण्यात आले.

तदनुषंगाने साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) विभागाकडील जा.क्रं.१४/७६ दि.०४/०८/२०१८ रोजीच्या पत्रान्वये इकडेस अहवाल प्राप्त झाला असून त्यात त्यांनी "आज दि.०४/०८/२०१८ रोजी दुपारी ०२.३० वाजता मा.श्री.टी.एस.के.रेड्डी,मॅनेजिंग डायरेक्टर,महाराष्ट्र बांबु डेव्हलपमेंट बोर्ड,नागपूर व त्यांचे इतर अधिकारी यांनी साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) या ठिकाणी समक्ष येवून पाहणी करुन ए विंग तळमाळा (आतील बाजूचा) गाळा नं.ए-१ ची मागणी केली आहे. सदर गाळयाचे आकारमान ११x१८=१९८ चौ.फूट इतके असून सदरच्या गाळयामध्ये सामान्य प्रशासन (आस्थापना) विभागाचे साहित्य ठेवलेले आहे. आस्थापना विभागास कळवून सदरचा गाळा खाली करुन बांबुपासून बनविलेल्या वस्तू विक्रीसाठी महाराष्ट्र बांबु डेव्हलपमेंट बोर्ड,नागपूर यांना उपलब्ध करुन देता येईल," असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

विभागाचा अभिप्राय– मा.मॅनेजिंग डायरेक्टर,महाराष्ट्र बांबु डेव्हलपमेंट बोर्ड,नागपूर यांचे उपरोक्त दि.१२/०७/२०१८ रोजीच्या पत्राचे अनुषंगाने व संस्थानचे साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाचे अभिप्रायाप्रमाणे कारागिरांनी बांबूपासून हस्तकलेतून बनविलेल्या वस्तूंची विक्री करणेकामी साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथील ए विंग तळमाळा, आतील बाजूचा गाळा नं.ए-१ आकारमान ११x१८=१९८ चौ.फूट असलेला गाळा ११ महिन्याचे लिव्ह अ‍ॅण्ड लायसन्स करारावर सार्वजनिक बांधकाम विभाग निश्चित करील त्या मासिक भाडेदराने व विद्युत बील वेगळे आकारुन गाळा वापरासाठी देता येईल.

कारागिरांनी बांबूपासून हस्तकलेतून बनविलेल्या वस्तूंची विक्री करणेकामी साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथील ए विंग तळमाळा, आतील बाजूचा गाळा नं.ए-१ आकारमान ११x१८=१९८ चौ.फूट असलेला गाळा ११ महिन्यांचे लिव्ह अ‍ॅण्ड लायसन्स करारावर सार्वजनिक बांधकाम विभाग निश्चित करील त्या मासिक भाडेदराने व विद्युत बील वेगळे आकारुन मा.मॅनेजिंग डायरेक्टर,महाराष्ट्र बांबु डेव्हलपमेंट बोर्ड,नागपूर यांना गाळा वापरासाठी देणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५२२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.मॅनेजिंग डायरेक्टर, महाराष्ट्र बांबु डेव्हलपमेंट बोर्ड, नागपुर यांना बांबुपासुन हस्तकेलतून बनविलेल्या वस्तुंची विक्री करणेकामी साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथील ए विंग तळमाळा, आतील बाजुचा गाळा नं.ए-१, आकारमान ११x१८=१९८ चौ.फुट असलेला गाळा ११ महिने कालावधीसाठी लिव्ह अ‍ॅन्ड लायसन्स तत्वावर देण्यात यावा, त्याकामी सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून मासिक भाडे निश्चीत करुन घेण्यात यावे, व मिटर रिडींग प्रमाणे विद्युत बील वेगळे आकारण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक,मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.१८** **श्री साईनाथ रुग्णालयात माहे एप्रिल २०१७ ते मार्च २०१८ अखेर रुग्णांवर मोफत वैद्यकिय उपचार पोटी खर्च झालेली रक्कम रु.३,३२,८१,७२६/- मात्र चॅरिटी खाती खर्ची टाकणे बाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद – कलम १७(१) व १७(२)(ण) मानव जातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपतीमध्ये साहय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

व्यवस्थापन समिती ठराव क्र. – १) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २२/१२/२०१६ रोजीच्या निर्णय क्र. ९४४. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २४/०२/२०१६ रोजीच्या निर्णय क्र. ०६.

प्रस्तावीक–श्री साईबाबांच्या शिकवणुकीस अनुसरुन गरीब व गरजु रुग्णांना मोफत उपचार पुरविण्याच्या दृष्टीने श्री साईनाथ रुग्णालय मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २२/१२/२०१६ रोजीच्या निर्णय क्र. ९४४ नुसार दि. ०१/०१/२०१७ रोजी पासुन संपुर्णपणे मोफत उपचार सुरु केलेले आहे. मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २४/०२/२०१६ रोजीच्या निर्णय क्र. ०६ नुसार दि. ०१/०३/२०१७ रोजी पासुन श्री साईनाथ रुणालय भरती होणा-या रुग्णांना आवश्यकते प्रमाणे उपचारासाठी लागणारे रक्त व रक्तघटक मोफत देण्यात येत आहेत.

श्री साईनाथ रुग्णालयात माहे. एप्रिल २०१७ ते मार्च २०१८ अखेर अर्थिक वर्षात ओपीडी व आयपीडी रुग्णांवर मोफत तपासणी, शस्त्रक्रिया वर झालेल्या खर्चाची रक्कमेचा तपशिल खालील दर्शविलेल्या कोष्टका प्रमाणे आहे.

| अ.नं | महिना | अंर्तरुग्ण रक्कम | बाह्यरुग्ण रक्कम | औषधांवर खर्च केलेली रक्कम | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ०१ | एप्रिल – २०१७ | ९,४८,१६३/- | ९,४७,९२१/- | १०,५२,९१७/- | २९,४९,००१/- |
| ०२ | मे – २०१७ | १०,१३,३६८/- | १०,५३,१५९/- | १२,२०,३१४/- | ३२,८६,८४१/- |
| ०३ | जुन – २०१७ | ९,७७,६०१/- | १०,३७,५२८/- | ५,९५,२४५/- | २६,१०,३७४/- |
| ०४ | जुलै – २०१७ | १०,९८,४२५/- | ११,७०,६५३/- | ६,०५,३८१/- | २८,७४,४५९/- |
| ०५ | ऑगस्ट – २०१७ | ९,९८,२३०/- | १३,१८,१४२/- | ६,३३,०९७/- | २९,४९,४६९/- |
| ०६ | सप्टेंबर – २०१७ | ९,११,१८४/- | १२,७४,५९७/- | ३,३९,९४२/- | २५,२५,७२३/- |
| ०७ | ऑक्टोबर – २०१७ | ७,५०,६७५/- | ९,४९,८२४/- | ३,८६,५२३/- | २०,८७,०२२/- |
| ०८ | नोव्हेंबर – २०१७ | ९,२२,५१२/- | १२,१५,५६३/- | ९,४९,६५६/- | ३०,८७,७३१/- |
| ०९ | डिसेंबर – २०१७ | १०,२०,६३०/- | १०,११,१९६/- | ७,०१,६३४/- | २७,३३,४६०/- |
| १० | जानेवारी – २०१८ | १४,१६,५०८/- | १०,१४,८४६/- | ८,३५,९०६/- | ३२,६७,२६०/- |
| ११ | फेब्रुवारी – २०१८ | ९,९९,९१९/- | १०,३१,२३६/- | ५,५३,३८५/- | २५,८४,५४०/- |
| १२ | मार्च – २०१८ | ९,५८,८६३/- | ९,६०,१९९/- | ४,०६,७८४/- | २३,२५,८४६/- |
| | एकुण | १,२०,१६,०७८/- | १,२९,८४,८६४/- | ८२,८०,७८४/- | ३,३२,८१,७२६/- |

विभागाचे मत / अभिप्राय - आर्थिक वर्ष २०१७ – २०१८ मध्ये माहे जुन २०१७ पासुन चॅरिटीमध्ये अंर्तरुग्ण, बाह्यरुग्ण व औषधे अशा तिन्ही खर्चेचा रक्कम एकत्रीत करुन अंदाजपत्रकात चॅरिटी खाते नोंदणी करुन सादर करणेत आले परंतु एप्रिल २०१७ व मे २०१७ ची रुग्णांना देण्यात आलेली औषधांची रक्कम नोंद घेण्यात आली नव्हती. सन २०१७ - २०१८ मध्ये श्री साईनाथ रुग्णालयातील अंर्तरुग्ण, बाह्यरुग्ण व औषधांवर एकुण रक्कम रु. ३,३२,८१,७२६/- इतकी मोफत वैद्यकिय उपचारापोटी खर्च झालेली आहे.

प्रस्ताव–सदर रक्कम चॅरिटी म्हणुन खर्ची टाकणे आवश्यक आहे. तरी कोष्टकात दर्शविलेल्या प्रमाणे मागील आर्थिक वर्षात रक्कम रु. ३,३२,८१,७२६/- इतकी श्री साईनाथ रुग्णालयाच्या गरीब व गरजु रुग्णांच्या मोफत वैद्यकिय उपचारापोटी खर्च झालेली आहे. सदर रक्कम नोंद घेऊन खर्चास मान्यता असावी.

सदर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.५२३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयात माहे एप्रिल २०१७ ते मार्च २०१८ अखेर रुग्णांवर मोफत वैद्यकिय उपचारापोटी झालेल्या खर्चाची रक्कम रु.३,३२,८१,७२६/- मात्रची नोंद घेण्यात येऊन सदरची रक्कम चॅरिटी खाती खर्ची टाकणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्र.वैद्यकीय अधिक्षिका,श्री साईनाथ रुग्णालय)**

------------------------------------------------------------

**विषय नं.१९** **सन २०१७-१८ मधील (Annual Rate Contract) वार्षिक खरेदीमधील मंजुर दराने औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी साहित्य अतिरीक्त (मंजूर नग संख्येपेक्षा जास्त नग) खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद :- १७ (२) ण

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :- (०१) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२५/०२/२०१७ निर्णय क्रमांक ०५ अन्वये औषधे अतिरिक्त खरेदीबाबत – नवीन नियमावली नुसार वार्षिक औषधांचे पुरवठा आदेश दिल्यानंतर पुढील सहा महिन्यातच अतिरिक्त औषधे खरेदी करता येणार आहे. परंतु ब-याच वेळा वार्षिक औषधे खरेदीचा कालावधी संपून पुढील वार्षिक खरेदीस विलंब लागल्याने वार्षिक औषधांची वर्षाची मागणी संपते यासाठीकमीत कमी एक वर्षाचा कालावधी पुर्ण होऊन जातो तसेच कधी कधी संसर्गजन्य रोगांची लागण झाल्यामुळे सुध्दा वार्षिक मागणी संपूण वार्षिक मागणी करावी लागते. तेंव्हा वार्षिक खरेदीकामी मा.व्यवस्थापन समिती सभेने दिलेल्या मंजूरी अंतर्गत ती औषधे / सर्जिकल साहित्य मंजूर दराने अतिरिक्त खरेदीस मंजूरी मिळालेली आहे.

(०२) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.३०/०१/२०१५ निर्णय क्रमांक २६ Clause No.9 अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठयापैकी रु.२५,०००/- पेक्षा अधिक रक्कमेच्या औषधांची अतिरीक्त मागणी करावयाची झाल्यास दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये, म्हणून ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने खरेदी करुन केवळ नोंद घेण्यासाठी / माहितीस्तव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावे, असे ठरले आहे.

(०३) दि.३०/११/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेत निर्णय क्र.७५६(५) अन्वये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता वार्षीक (सन२०१६-१७) या वर्षाकरीता लागणारे औषधे व सर्जिकल साहित्य खरेदी करणेकामी प्रस्तावात नमुद केलेल्या कार्यवाहीचे अवलोकन करणेत येऊन, रुग्णालय उपसमितीने खालीलप्रमाणे शिफारशी केल्या, त्या मान्य करण्यात आल्या आहेत.

बऱ्याचशा नामांकित रुग्णालयांमध्ये जनरीक औषधे वापरली जातात. त्यामुळे संस्थान रुग्णालयांकरीता प्राधान्याने जनरीक औषधे खरेदी करावीत. काही जनरीक औषधांचा रुग्णांवर प्रभाव होत नाही, असे डॉक्टर्स सांगतात, अशी औषधे संबंधीत कंपनीकडून बदलून घेण्यात यावी व तरीही तक्रारी आल्यास सदरहू औषध निर्माती कंपनीस काळया यादीत टाकण्यात यावे.

औषध खरेदी प्रक्रिया राबविणेपुर्वी कोकीळा बेन हॉस्पिटल, नागपुर, रुबी हॉल क्लिनिक, पुणे, माऊट अबु, राजस्थान अशा नामांकित तसेच राज्य शासन/ भारतीय लष्करांच्या रुग्णालयांमध्ये वापरण्यात येणाऱ्या औषधांची व औषध खरेदी प्रक्रियेची माहिती संकलीत करुन, उपकार्यकारी अधिकारी, मुख्यलेखाधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, रुग्णालय वैद्यकिय संचालक यांनी औषध खरेदी करणेकामी अटी/ शर्ती निश्चित करुन सभे समोर प्रस्ताव सादर करावा. तोपर्यंत औषधां अभावी रुग्णांची गैरसोय होऊ नये, याकरीता सध्याचे मंजुर निम्नतम दराने औषधे खरेदी करण्यात यावीत, असे ठरले आहे.

त्यानूसार सन २०१५ – २०१६ मध्ये मंजूर दराने औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब केमीकल्स, कन्झुमेबल्स व किरकोळ साहित्य अतिरिक्त खरेदी करण्यात आलेली आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे –

| अ. नं. | मंजूर टिप्पणीची दिनांक | प्रस्तावाची रक्कम रु. |
|---|---|---|
| १ | दि.२३/०५/२०१६ | ७१८५३०२.०० |
| २ | दि.१२/११/२०१६ | ११८९८८३७.०० |
| ३ | दि.०९/०२/२०१७ | १७०३८८०२.०० |
| ४ | दि.०१/०६/२०१७ | ७८९८५६८.०० |
| ५ | दि.०५/१२/२०१७ | २०५८२२९६.०० |
| ६ | दि.१३/०४/२०१८ | १६४४१३७.०० |
| | एकूण रक्कम | ६६२४७९४२.०० |

प्रास्ताविक :- श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता दैनंदिन वापरासाठी लागणा-या औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब केमीकल्स, कन्झुमेबल्स व किरकोळ साहित्य खरेदीकामी सन २०१७-१८ या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील दरानेएकुण रक्कम रु.४४०८५७०२८.२४ इतक्या रक्कमेचे पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत, त्याचा तपशील खालील प्रमाणे –

| अ. नं. | पुरवठा आदेशाची दिनांक | पुरवठा आदेशाची रक्कम | मा. व्यवस्थापन समिती सभेची मान्यता |
|---|---|---|---|
| १ | २८/०७/२०१७ | १६४९५१४९९.०८ | दि.२५/०७/२०१७ निर्णय क्र.५२४ (A-१४) |
| २ | ०७/१२/२०१७ | २२९७४९४३४.७५ | दि.१४/११/२०१७ निर्णय क्र.१००६ (०१) |
| ३ | १६,१७,/०१/२०१८ | ४६५५५०७.०० | दि.०८/१२/२०१७ निर्णय क्र.१०५१ (१३) |
| ४ | १५/०१/२०१८ | २७७०८७१.८६ | दि.२५/१२/२०१७ रोजीची मंजूर टिप्पणी |
| ५ | १०/०४/२०१८ | १७११४२५७.९८ | दि. ०२/०४/२०१८ रोजीची मंजूर टिप्पणी |
| ६ | २३,२४/०४/२०१८ | २१६१५४५७.५७ | दि.०४/०४/२०१८ निर्णय क्र.२२५ (२३) |
| | एकूण रक्कम | ४४०८५७०२८.२४ | |

सन २०१७ -१८ या वर्षाकरीता वार्षिक औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब केमीकल्स, कन्झुमेबल्स व किरकोळ साहित्य खरेदीकामी मंजुर रक्कम रु.५५,९१,९१,८३६/- इतकी आहे त्यामधून रु.४४०८५७०२८.२४ इतक्या रक्कमेचे पुरवठा आदेश देण्यात आलेले असून रु.११,८३,३४,८०७.७६ इतकी रक्कम शिल्लक आहे, त्यामुळे आपणास अतिरीक्त खरेदी ही शिल्लक रक्कमेतुन करता येणार आहे.

सदर पुरवठा आदेशाप्रमाणे पुरवठाधारकांकडून मालाचा पुरवठा चालु आहे, तर त्यातील काही मालाचा पुरवठा पुर्ण झालेला आहे. त्यापैकी सध्या सोबतच्या यादीतील औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब केमीकल्स, कन्झुमेबल्स व किरकोळ साहित्य इत्यादींचा औषधांचा भांडारात साठा शिल्लक नाही, सदर साठयाची वार्षिक मागणी पुर्ण झालेली आहे. तथापि सदरहू औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब केमीकल्स, कन्झुमेबल्स व किरकोळ साहित्य हे दैनंदिन वापरासाठी आवश्यक असल्यामुळे तेंव्हा गरज पाहता काही औषधे / सर्जिकल साहित्य मंजुर दराने खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे. सदर औषधे / सर्जिकल साहित्य हे आपण जर मंजुर दराव्यतिरीक्त खरेदी केले तर त्यासाठी जास्त खर्च येऊन त्यात संस्थानचे नुकसान होणार आहे. त्यामुळे सदर मटेरीयल हे मंजुर दरानेच खरेदीचे प्रस्तावित करण्यात येत आहे. तसेच ब-याच ठिकाणी मागील खप पाहता तसेच पुढील वार्षिक खरेदीचा कालावधी बघता वार्षिक मंजुर नग संख्या व्यतिरीक्त जास्त नग संख्याची मागणी करण्यात आलेली आहे.

सन २०१८-१९ या वर्षाकरीता लागणारे औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब केमीकल्स, कन्झुमेबल्स व किरकोळ साहित्य इत्यादी खरेदीकामीचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात येत असून त्यासाठी कालावधी लागणार आहे. वार्षिक खरेदीमधील काही औषधे ही वार्षिक मागणीपेक्षा कमी लागतात तर काही औषधे ही मुळ मागणीपेक्षा जास्त लागतात, अशी औषधे मंजुर दराने (Annual Rate Contract) खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे. सन २०१७-१८ या वार्षिक खरेदीमध्ये रक्कम रु.४४०८५७०२८.२४इतक्या मंजुर रक्कमेचे पुरवठा आदेश देण्यात आलेले असून यावर्षी आतापर्यंत अतिरीक्त औषधे खरेदीचा प्रस्ताव ठेवण्यात आलेला नाही

मागणी – सोबतच्या तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :- अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये महाराष्ट्र शासनाच्या राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत रुग्ण दाखल होत असतात. सदर योजनेअंतर्गत होणा-या शस्त्रक्रिया व उपचार चालु असताना रुग्ण पुर्ण बरा होऊन डिसचार्ज दिल्यापासून १ वर्षासाठी औषधे मोफत दयावी लागतात, त्यामुळे औषधांचा खप हा कधी कधी अचानक वाढतो.

महात्मा फूले जीवनदायी योजने अंतर्गत रुग्णांना दिलेल्या औषधांचा परतावा शासनाकडून संस्थानला मिळत असतो. तसेच दि.०१/०१/२०१७ पासून श्री साईनाथ रुग्णालय हे पूर्णतः मोफत सेवा देण्यात येत असल्यापासून तेथील रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून त्यासाठी सुध्दा लागणारी औषधे / सर्जिकल साहित्यांचा खप वाढलेला आहे. त्यामुळे जशी जशी लागतील तशी तशी औषधे वार्षिक मंजुर दराने खरेदी करण्यात येतील. कारण एकाच वेळेस खरेदी करुन ठेवल्यास ती मुदतबाहय होण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्यामुळे संस्थानचे मोठे अर्थिक नुकसान होण्याची शक्यता असते.

तसेच सन २०१८-१९ या वर्षाच्या पुढील वार्षिक औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब केमीकल्स, कन्झुमेबल्स व किरकोळ साहित्य इत्यादी खरेदीकामी बराच कालावधी लागणार आहे, त्यामुळे रुग्णांना उपचारासाठी लागणा-या औषधांची गैरसोय होऊ नये म्हणून सोबतच्या यादीतील औषधे सन २०१७-१८ या वर्षातील मंजुर दराने खरेदी करुन देता येतील. त्यामुळे मंजुर दराने सोबतच्या तक्त्यातील औषधे तातडीने खरेदी करणेचे गरजेचे आहे.

तरी सन २०१७-१८ च्या वार्षिक मंजुर दराने व सदर वर्षाच्या वार्षिक औषधे खरेदीकामी मंजुर रक्कम रु.५५,९१,९१,८३६/- पैकी शिल्लक रक्कम रु.११,८३,३४,८०७.७६ मधून सोबतच्या तक्त्यातील औषधे तातडीने मंजूर दराने अतिरिक्त खरेदी करणेत आलेली असून व याकामी आलेल्या रक्कम रु.१,४५,११,११४/- चे खर्चाचा प्रस्ताव नोंद घेणेसाठी सविनय सादर.

प्रस्ताव –सन २०१७-१८ च्या मंजूर दराने मंजूर नगापेक्षा जास्त नग खरेदी करणेस व त्या अनुशंगाने येणा-या रक्कम रु.१,४५,११,११४/- चे खर्चाचा प्रस्ताव नोंद घेणेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.५२४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१७-१८ च्या मंजूर दराने करण्यात आलेली तातडीची अतिरिक्त औषधे खरेदीची नोंद घेण्यात येऊन, त्याकामी आलेल्या रक्कम रु.१,४५,११,११४/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)**

---

**विषय नं.२०** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील सर्व प्रशासकिय पदांवर (मुळ किंवा प्रभारी/अतिरिक्त) असलेल्या डॉक्टरांना प्रोत्साहन भत्ता (इन्सेंटीव्ह) लागू करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेमार्फत श्री साईबाबा रुग्णालय व श्री साईनाथ रुग्णालय ही दोन रुग्णालये चालविली जात आहेत. सदर रुग्णालयांमध्ये वेगवेगळया आजारांवर विविध तपासण्या/ उपचार/ शस्त्रक्रिया केल्या जातात. शिर्डीसारख्या लहान गावात सुपरस्पेशालिटी दर्जाच्या वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने व त्यासाठी आवश्यक असलेले डॉक्टर्स उपलब्ध होवून ते टिकून राहणेसाठी श्री साईबाबा रुग्णालयातील डॉक्टरांना त्यांचे मासिक वेतनाव्यतिरिक्त रुग्णांकडून आकारण्यात येणा-या बिलातील काही विशिष्ट रक्कम प्रोत्साहन भत्ता म्हणून दिली आहे. तसेच श्री साईनाथ रुग्णालयातील डॉक्टरांना प्रोत्साहन भत्ता, (इन्सेंटीव्ह) लागु करणे तसेच श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णायातील सर्व प्रशासकीय पदांना वेतना व्यतिरीक्त प्रोत्साहन भत्ता दयावे असा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर केले असुन उपरोक्त संदर्भ कं. २ अन्वये, यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईनाथ रुग्णालयामध्ये रुग्णांना विनामुल्य रुग्णसेवा उपलब्ध करुन दिली जाते. त्यामुळे या रुग्णालयामध्ये रुग्णांची संख्या जास्त असते. सदरहू रुग्णालय ग्रामीण भागातील असल्यामुळे तज्ञ डॉक्टर्स कमी वेतनावर काम करत नाहीत व श्री साईबाबा हॉस्पिटलमधिल डॉक्टरांच्या वेतनाबरोबर तुलना करीत आहेत. श्री साईनाथ रुग्णालयामध्ये रुग्णसेवा संपुर्णपणे मोफत केलेली असल्याने सदर डॉक्टरांना रुग्णांच्या बिलाच्या रकमेतुन इन्सेन्टींव्ह देणे शक्य नाही. त्यामुळे एक विशेष बाब म्हणून व श्री साईबाबा रुग्णालयाशी तुलना करुन श्री साईनाथ रुग्णालयातील डॉक्टरांना त्यांचे मुळ वेतन + ग्रेड पे यावर २००% असा फिक्स इन्सेन्टींव्ह लागु करणेत यावा. हा इन्सेन्टींव्ह लागु केल्यास संस्थानवर अंदाजे प्रति माह रु.१२ लाख मात्र आर्थिक बोजा पडेल, त्यास मान्यता देण्यात आली.

तसेच नव्याने भरती होणा-या स्थायी, मानधनावर, कंत्राटी वैद्यकीय अधिकारी त्याचप्रमाणे श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील सर्व प्रशासकीय पदांना प्रस्तावात नमुद केलेल्या नियमावलीप्रमाणे इन्सेंन्टींव्ह लागु करणेत यावा व ७ वा वेतन आयोग लागू झाल्यानंतर या इन्सेंन्टींव्हमध्ये बदल करणेसाठी प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.

त्यानुसार सदर प्रस्ताव मा.विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई येथे पाठवले असुन संदर्भ क्र. ४ अन्वये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामधिल डॉक्टरांना मासीक वेतनाव्यतीरीक्त प्रोतसाहन भत्ता अदा करणेबाबत खालीलप्रमाणे शासन आदेश पारीत करण्यात आलेला आहे.

शासन निर्णयः- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम, २००४ च्या कलम १७ (२) (ण) मधील तरतुदीनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी संचलीत श्री साईबाबा रुग्णालयातील डॉक्टर्सना मासिक वेतनाव्यतिरीक्त प्रोत्साहन भत्ता (Incentive) मंजुर करण्याबाबत खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

१.श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी रुग्णालयातील डॉक्टरांना प्रोत्साहन भत्ता अदा करण्याबबात व्यवस्थापन समितीने घेतलेल्या निर्णयास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

२. श्री साईबाबा सुपरस्पेशालिटी रुग्णालयाप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयांतील डॉक्टरांना प्रोत्साहन भत्ता लागु करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. दोंन्ही रुग्णालयातील डॉक्टर्संना प्रोत्साहन भत्ता अदा करण्याबाबतची नियमावली/अटी व शर्ती तसेच प्रोत्साहन भत्याचे दर व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने निश्चीत करण्यात यावेत.

उपरोक्त शासन निर्णयामध्ये नमुद केल्याप्रमाणे श्री साईबाबा सुपर स्पेशिलिटी रुग्णालयातील डॉक्टरांना प्रोत्साहन भत्ता अदाकरणे साठी वेळोवेळी मा.व्यवस्थापन समितीच्या मान्यतेनुसार प्रोत्साहन भत्ता अदा केला जात आहे. तसेच श्री साईनाथ रुग्णालयासाठी दि.२३.१०.२०१७ रोजीच्या झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णय क्र. ८६८ चे नियमावली/अटी व शर्तीनुसार डॉक्टरांना त्याचे मुळ वेतन + ग्रेड पे यावर २००% असा फिक्स इनसेंटिव्ह दि.२७/०६/२०१८ रोजी पासुन दिले जाणार आहे.

तसेच श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील सर्व प्रशासकीय पदांना प्रस्तावात नमुद केलेल्या नियमावलीप्रमाणे इन्सेंटिव्ह लागु राहील.

परंतु श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील सर्व प्रशासकीय पदांवर काम करणारे डॉक्टर्स हे अतिरिक्त कार्यभार किंवा प्रभारी म्हणून कामकाज पाहत आहेत.

त्यानुसार अतिरिक्त भार किंवा प्रभारी पदावर असलेल्या सर्व प्रशासकीय पदासाठी प्रोत्साहन भत्ता देणेस उल्लेख नसलेमुळे प्रोत्साहन भत्ता द्यावा किंवा कसे?

विभागाचे अभिप्राय:- श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील सर्व प्रशासकीय पदासाठी मंजुर झालेला प्रोत्साहन भत्ता अतिरिक्त/प्रभारी पदावर असलेल्या सर्व प्रशासकीय पदांना खालील प्रमाणे देण्यात यावा.

१. अतिरिक्त किंवा प्रभारी पदावर कार्यरत असलेल्या सर्व प्रशासकीय पदांना संदर्भ क्र.२ अन्वये प्रोत्साहन भत्ता देता येईल.

२. जे वैद्यकीय अधिकारी अतिरिक्त/प्रभारी प्रशासकीय पदांवर कार्यरत आहेत. व त्यांच्या मूळ पदाला प्रोत्साहन भत्ता लागू असेल तर कोणत्याही एकाच पदाचा (मुळ किंवा प्रभारी / अतिरिक्त) प्रोत्साहन भत्ता देय होईल. कोणत्या एकाच पदाचा प्रोत्साहन भत्ता लागू करणेचा संपूर्ण अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहील.

३. ज्या वैद्यकीय अधिका-यांकडे अतिरिक्त / प्रभारी प्रशासकीय पदाचा कार्यभार सोपविलेला असेल व त्यांच्या मूळ पदाला प्रोत्साहन भत्ता लागू नसेल तर अतिरिक्त / प्रभारी प्रशासकीय पदाचा नियमाप्रमाणे प्रोत्साहन भत्ता देता येईल.

४. दि.२३.१०.२०१७ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील विषय नं.२२ निर्णय क्र.८६८ मध्ये मुद्दा क्र.६ अन्वये शासनाच्या मंजुरी आदेशाच्या दिनांकापासुन प्रोत्साहन भत्ता लागु होईल,असे नमुद केले आहे. त्यानुसार दि.२७/०६/२०१८ रोजी झालेल्या शासनाचे आदेशानुसार प्रोत्साहन भत्ता द्यावा लागणार आहे. परंतु अकौंन्टींगच्या दृष्टीकोनातून विचार केल्यास दि.०१/०७/२०१८ पासून प्रोत्साहन भत्ता देणेकामी निर्णय घेता येईल व प्रोत्साहन भत्ता देणेकामी बनविण्यात आलेल्या नियमावलीतील मु.क्रं.६ मध्ये तशा स्वरुपाचा बदल करण्यात यावा, असे वाटते.

५. अशा अतिरिक्त / प्रभारी प्रशासकीय पदांवर कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिका-यांचा प्रोत्साहन भत्ता हा सद्यस्थितीला असलेल्या (दि.०१/०७/२०१८च्या ) मूळ वेतन +ग्रेड पे च्या २००% असेल.

६. श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील अतिरिक्त /प्रभारी प्रशासकीय पदावर काम करणा-या सर्व वैद्यकीय अधिका-यांना प्रोत्साहन भत्ता देण्यात येईल. तसेच अशा पदांवर नवीन भर्ती होईल त्यावेळी याबाबत वेळोवेळी परिस्थिती अनुसार निर्णय घेणेत येईल.

तरी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५२५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तुत प्रकरणी खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

१. **अतिरिक्त किंवा प्रभारी पदावर कार्यरत असलेल्या सर्व प्रशासकीय पदांना संदर्भ क्र.०२ (दि.२३.१०.२०१७ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील विषय नं.२२ निर्णय क्र.८६८) अन्वये प्रोत्साहन भत्ता देण्यास मान्यता देण्यात आली.**

२. **जे वैद्यकीय अधिकारी अतिरिक्त /प्रभारी प्रशासकीय पदांवर कार्यरीत आहेत व त्यांच्या मूळ पदाला प्रोत्साहन भत्ता लागू असेल तर कोणत्याही एकाच पदाचा (मुळ किंवा प्रभारी/अतिरिक्त) प्रोत्साहन भत्ता देय होईल. कोणत्याही एकाच पदाचा प्रोत्साहन भत्ता लागू करणेचा संपुर्ण अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहील.**

३. ज्या वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे अतिरिक्त / प्रभारी प्रशासकीय पदाचा कार्यभार सोपविलेला असेल व त्यांच्या मुळ पदाला प्रोत्साहन भत्ता लागू नसेल तर अतिरिक्त / प्रभारी प्रशासकीय पदाचा नियमाप्रमाणे प्रोत्साहन भत्ता देता येईल.

४. संदर्भ क्र.०२ (दि.२३.१०.२०१७ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील विषय नं.२२ निर्णय क्र.८६८) चे निर्णयामध्ये मध्ये मुद्दा क्र.६ अन्वये शासनाच्या मंजूरी आदेशाच्या दिनांकापासून प्रोत्साहन भत्ता लागु होईल, असे नमुद केले आहे. त्यानुसार दि.२७.०६.२०१८ रोजी झालेल्या शासनाचे आदेशानुसार प्रोत्साहन भत्ता द्यावा लागणार आहे. परंतु अकौन्टींगच्या दृष्टीकोनातून विचार केल्यास दि.०१.०७.२०१८ पासून प्रोत्साहन भत्ता लागू करणे योग्य राहिल. सबब प्रोत्साहन भत्ता देणेकामी बनविण्यात आलेल्या नियमावलीतील मुद्दा क्र.६ मध्ये तशा स्वरुपाचा बदल करण्यात यावा.

५. अशा अतिरिक्त / प्रभारी प्रशासकीय पदांवर कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांचा प्रोत्साहन भत्ता हा सद्यस्थितीला असलेल्या (दि.०१.०७.२०१८ च्या) मुळ वेतन+ग्रेड पे च्या २०० % देण्यात यावा.

६. श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील अतिरिक्त / प्रभारी प्रशासकीय पदावर काम करणाऱ्या सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता देण्यात येईल. तसेच अशा पदांवर नविन भर्ती होईल त्यावेळी याबाबत वेळोवेळी परिस्थिती अनुसार निर्णय घेण्यात यावा.

७. तसेच शासनाच्या धोरणानुसार डॉक्टर्सना यापुर्वी प्रोत्साहनपर तीन व सहा वेतनवाढी मंजूर करण्यात आल्या आहेत. आता स्वतंत्र प्रोत्साहन भत्ता मंजूर करण्यात आल्याने दि.०१.०७.२०१८ पासून प्रोत्साहनपर देण्यात आलेल्या वेतनवाढी रद्द करण्यात याव्यात.

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२१** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये जुन-२०१८ महिन्यात वैद्यकिय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.८९,६६,३८३/- ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकिय बिलात सवलत देण्या संबंधित मा.व्य.स.निर्णय क्र.५१९/दि.२४.०७.२०११ संमत झाला आहे. वैद्यकिय बिलात सवलत देण्याचे अधिकार उप.वै.संचालक/वै.संचालक यांना देण्यात आलेले आहेत त्यांचे गैर हजेरीत वै.प्रशासक/जनसंपर्क अधिकारी यांना अधिकार सुपुर्त् करण्यात येऊन रुग्णांना मासिक वैद्यकिय बिलात सवलत देण्यात येते.

जनसंपर्क अधिकारी/सोशल वर्कर हे रुग्णांची आर्थिक परिस्थीती जाणून घेतात व आवश्यक कागदपत्रांसह सवलत मंजुरी करीता प्रस्तावीत करतात. अशा प्रकारे हॉस्पिटलमध्ये वैद्यकिय बिलात सवलत देण्याकरीता स्वतंत्र विभाग कार्यरत आहे. निर्णय क्र.५६४/२६.०६.२०१४ अन्वये प्रत्येक महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मा.कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेण्यात येऊन आर्थिक वर्षाच्या शेवटी एकत्रित अहवाल मा.व्य.स.चे सभे समोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावा असे ठरले आहे. माहे सप्टेंबर २०१७ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मान्यतेचे प्रस्तावावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दर महा मा.व्य.समिती सभेसमोर सादर करण्यास शेरा दिला आहे. त्याप्रमाणे माहे जुन २०१८ मध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलला ओपीडी रुग्ण १४,२४० व १,०८९ आयपीडी रुग्णांपैकी ३,५९६ ओपीडी व ६५६ आयपीडी रुग्णांना वैद्यकिय बिलात एकुण रु.८४,०५,३३३/- इतकी सवलत देण्यात आली व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकीय बिलात सवलत देण्या संबंधीत मा.व्य.स.निर्णय क्रं.३४६/दि.१८-१९.०८.२००१ संमत झाला आहे, जा.नं.एसएसएस/एसएसएच/३३१/२०१७ दि.३०.०३.२०१७ आदेश. दि.०६.०३.२०१० ची सिकल सेल आजाराच्या रुग्णांना मोफत रक्त देणेबाबत टिपणी प्रमाणे एकुण ३७२ रुग्णाना रक्कम रु.५,६१,०५०/- इतकी मोफत/सवलत देण्यात आली आहे. सवलत/मोफतचे विवरण खालील प्रमाणे–

श्री साईबाबा हॉस्पिटल

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | गरीब/दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ११३ | ९,९७,२०३/- | - | ९,९७,२०३/- |
| २ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना दिलेली | ३३८ | २७,८७,०२४/- | १२,८५,४१६/- | १५,०१,६०८/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | सवलत रक्कम | | | | |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १५ | १४,४९९/- | - | १४,४९९/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्ययोजना इ. | ६९२ | ५६,९१,६८२/- | ३६,४८,६५७/- | २०,४३,०२५/- |
| ५ | महात्मा फुले आरोग्या योजना आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३२८ | १,५८,००,४९९/- | १,३४,९८,७३६/- | २३,०१,७६३/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २,७६६ | १५,४७,२३५/- | - | १५,४७,२३५/- |
| | एकुण | ४,२५२ | २,६८,३८,१४२/- | १,८४,३२,८०९/- | ८४,०५,३३३/- |

(ब) श्री साईनाथ रक्तपेढी

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | थॅलॅसिमिया | ४२ | ४२,८००/- | - | ४२,८००/- |
| २ | हिमोफिलीया | ० | - | - | - |
| ३ | सिकल सेल ॲनेमीया फ्रि | ० | - | - | - |
| ४ | फ्रि डन बाय एमएडी/एमएस | ७ | ६,६००/- | - | ६,६००/- |
| ५ | व्हॉलंटरीब्लड डोनेशन फ्रि | २६ | २,६००/- | - | २,६००/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना | १४१ | २,९८,८५०/- | - | २,९८,८५०/- |
| ७ | संस्थान एम्प्लॉयी फ्रि | ५ | ३,६००/- | - | ३,६००/- |
| ८ | कॉन्ट्रक्ट एम्प्लॉयी फ्रि | १ | १२००/- | - | १२००/- |
| ९ | श्री साईनाथ हॉस्पिटल फ्रि | १५० | २,०५,४००/- | - | २,०५,४००/- |
| | एकुण | ३७२ | ५,६१,०५०/- | - | ५,६१,०५०/- |
| | एकुण अ+ब | ४,६२४ | २,७३,९९,१९२/- | १,८४,३२,८०९/- | ८९,६६,३८३/- |

प्रस्ताव - उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये माहे जुन २०१८ मध्ये वैद्यकिय बिलात सोशल वर्कर विभागामार्फत विहित पध्दतीने देण्यात आलेली सवलत रक्कम रु.८९,६६,३८३/- ची नोंद घेऊन, दिलेल्या सवलतीस मान्यता मिळणेबाबत सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.५२६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये जुन-२०१८ मध्ये वैद्यकिय बिलात विहित पध्दतीने देण्यता आलेल्या रक्कम रु.८९,६६,३८३/- मात्र सवलतीची नोंद घेण्यात येऊन, सदर रकमेस मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)**

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०१** **शासन निर्णय/परिपत्रके यांचे वाचन.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाकडून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे कामकाजा संबंधीत शासन निर्णय, परिपत्रके व इतर पत्र प्राप्त होतात. सदर पत्रांची एकत्रित रित्या मागासवर्ग कक्षाकडे नोंद घेऊन सदर पत्रावर उचित कार्यवाहीसाठी संबंधीत विभागाकडे पाठविण्यात येते. सदर शासन

पत्रावर संबंधीत विभागाने काय कार्यवाही केली आहे त्याबाबतचा अहवाल प्रत्येक महिन्यास वरिष्ठांकडे सादर करण्यात येतो.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०२/०५/२०१८ चे सभेत आयत्या वेळचा विषय क्र.१७, निर्णय क्र.३४६ "संस्थानचे कामकाजासंबंधी शासनाचे निर्णय,परिपत्रके वेळोवेळी समितीचे बैठकीत सर्व समिती सदस्यांना बैठकीच्या अजेंडयासोबत देण्यात यावी व सदर शासन निर्णय, परिपत्रके यांचे वाचन असा विषय अजेंडयामध्ये समाविष्ट करण्यात यावा."असा झालेला आहे.

उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार दि.२६/०७/२०१८ ते दि. २१/०८/२०१८ अखेर या कालावधीत महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाकडून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे कामकाजासंदर्भात खालीलप्रमाणे प्राप्त झालेली पत्रे सोबत सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | शासन पत्र क्र. व दिनांक | प्राप्त दिनांक | विषय |
|---|---|---|---|
| ०१ | शासन निर्णय क्र.सासंवि-१०१८/६५६/ प्र.क्र.५६/का.१६ दि.१२/०७/२०१८ | २६/०७/२०१८ | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेतर्फे नविन कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचे वरिष्ठ महाविद्यालय सुरु करण्यास व त्यासाठी आवश्यक असलेल्या आकृतीबंधास प्रशासकीय मान्यतेबाबत |
| ०२ | शासन निर्णय क्र.सासंवि-१०१८/७७४/ प्र.क्र.८०/का.१६ दि.०२/०८/२०१८ | १५/०८/२०१८ | शिर्डी बस स्थानक व भक्तनिवास इमारतीतील मध्यवर्ती ओपन टू स्काय भागावर पॉलीकार्बोनेट डोमचे छत करण्यासाठी येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत |
| ०३ | शासन निर्णय क्र.सासंवि-१०१८/४९९/ प्र.क्र.३८/का.१६ दि.०२/०८/२०१८ | १६/०८/२०१८ | श्री साईबाबा रुग्णालयातील रेडिओलॉजी विभागातील जुने सी.टी.स्कॅन मशिन परत (Buyback) करण्यास मान्यता देण्याबाबत |
| ०४ | क्र.ससंवि-१०१८/१७१/प्र.क्र.६४/का.१६ दि.३०/०७/२०१८ | १६/०८/२०१८ | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी साईउद्यान इमारतीतील शिर्डी पोस्ट ऑफिसचे वापरात असलेल्या जागेस मुदतवाढ देणेबाबत |
| ०५ | शासन निर्णय क्र.सासंवि-१०१८/०४/ प्र.क्र.०२/ का.१६ दि.१६/०८/२०१८ | २०/०८/२०१८ | अपारंपारीक ऊर्जा अंतर्गत श्री साईबाबा संस्थानकरीता १० मेगावॅट क्षमतेची सोलर पी.व्ही.सिस्टीम बसविण्यासाठी येणा-या खर्चास मंजूरी देण्याबाबत |
| ०६ | शासन आदेश क्र.सासंवि-१०१८/ ४४३/ प्र.क्र.६०/ का.१६ दि.१४/०८/२०१८ | २१/०८/२०१८ | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथील कंत्राटी कर्मचा-यांना त्यांच्या पाल्यांचा सन २०१७-१८ या वर्षाचा शैक्षणिक शुल्क परतावा करण्याबाबत. |
| ०७ | शासन निर्णय क्र.सासंवि-१०१८/ १०३१/ प्र.क्र.११३/ का.१६ दि.२०/०८/२०१८ | २२/०८/२०१८ | श्री साईबाबा समाधी वर्षानिमीत्त योगीराज सदगुरु गंगागिरीजी महाराज १७१ अखंड हरिनाम सप्ताहासाठी समितीस रु.७५ लक्ष मात्र इतके अर्थसहाय्य करणेबाबत |

**निर्णय क्र.५२७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शासनाचे विधी व न्याय विभागाकडून संस्थान कामकाजासंबधी प्राप्त झालेले उपरोक्त शासन निर्णय व परिपत्रक यांचे वाचन करुन त्यांची नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक,मागासवर्ग कक्ष)**

---

आयत्या वेळेचा
विषय नं.०२ **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष सन २०१८ चे कालावधीत माहे ऑगस्ट सप्टेंबर महिन्यामध्ये श्रींचे पादुका दर्शन सोहळयाचे आयोजन करणेसंबधी देशातील विविध राज्ये, शहरे व आयोजक इ. बाबी निश्चित करणेसाठी दि.१३.०८.२०१८ रोजी झालेल्या मा.पादुका दर्शन सोहळा छाननी समिती इतिवृत्ताबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जात आहे. यासाठी संपूर्ण वर्षभर वेगवेगळ्या

धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणेत येत असून, त्याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्रासह संपूर्ण देशभरातील विविध राज्यांमध्ये श्री साईबाबा पादुका दर्शन सोहळा याकार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८७ अन्वये श्रींचे पादुका दर्शन सोहळा आयोजित करणेकामी प्राप्त झालेले अर्ज हे पादुका दर्शन सोहळ्याच्या अर्जांची छाननी करणेकामी गठीत करण्यात आलेल्या समितीसमोर सादर करावेत व या समितीने पादुका दर्शन सोहळ्याची रूपरेषा ठरवून त्याचा प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करावा असे ठरलेले आहे.

त्यानुसार श्रींचे पादुका दर्शन सोहळयाचे कार्यक्रमाचे आयोजन होणेसाठी शनिवार, दि.१३/०८/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता बैठक पार पडलेली असून, या बैठकीस खालीलप्रमाणे श्री साईबाबा संस्थानचे मा. विश्वस्त व अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा. श्री. बिपीनदादा कोल्हे, अध्यक्ष, पादुका अर्ज छाननी समिती.
मा. श्री. भाऊसाहेब वाकचौरे, सदस्य, पादुका अर्ज छाननी समिती.
मा. श्रीमती, रुबल अग्रवाल, भा.प्र.से, मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी तथा सदस्य पादुका दर्शन छाननी समिती.
मा. श्री. धनंजय निकम, उपजिल्हाधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी
मा. श्री. मनोज घोडे पाटील, उपजिल्हाधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी
मा. श्री. बाबासाहेब घोरपडे, प्र. उपकार्यकारी अधिकारी
मा.श्री. सुर्यभान गमे, प्रशासकीय अधिकारी
श्री. राजतिलक बागवे, प्र.अधिक्षक, शताब्दी कक्ष
श्री. अतुल कुंभकर्ण, लिपिक-टंकलेखक, शताब्दी कक्ष

श्री साईबाबा समाधी शताब्दी निमित्ताने पादुका दर्शन सोहळा आयोजित करणेसाठी संपूर्ण माहिती सादर केलेले अर्जधारकांना पादुका दर्शन सोहळ्याच्या अर्जांची छाननी करणेसाठी गठीत करणेत आलेल्या समितीसमोर चर्चेसाठी बोलविणेत आलेले होते. त्यानुसार उपस्थित आयोजक व त्यांचे प्रतिनिधी यांची नोंद घेण्यात आली असून, त्याचा तपशिल खालील तक्त्यात दर्शविलेला आहे.

| अ.नं. | शहर | मंदिर/ट्रस्टचे नांव | प्रतिनिधीचे नांव | बैठकीस उपस्थिती |
|---|---|---|---|---|
| ०१. | सांगली | श्री साई राम मंदिर, संजयनगर | श्री राजाराम माने व इतर | हजर |
| ०२. | जिंतुर | श्री साईबाबा मंदिर | श्री. नंदलाल बिहारीलाल भूतडा | हजर |
| ०३. | कल्याण | श्री संत राममारुती समाधी संस्थान | --- | गैरहजर |
| ०४. | बोरीवली | श्री साई मंडळ | श्री. विलास परळकर | हजर |
| अ.नं. | शहर | मंदिर/ट्रस्टचे नांव | प्रतिनिधीचे नांव | बैठकीस उपस्थिती |
| ०५ | सिन्नर | श्री सदगुरू चॅरिटेबल ट्रस्ट | श्री. राजेंद्र चव्हाणके | हजर |
| ०६. | जयपूर | श्री शिर्डी साईनाथ सामाजिक विकास समिती | --- | गैरहजर |
| ०७. | भिलवाडा | शिव साई मंदिर | श्री. रमेश पाटील | हजर |
| ०८. | तिरूपूर | श्री शिर्डी साई पिठम ट्रस्ट | ---- | गैरहजर |
| ०९. | करूर | श्री शिर्डी साई चॅरिटेबल ट्रस्ट | श्री. नटराजन | हजर |
| १०. | रायपूर | श्री साई अनुराग सेवा समिती | डॉ.नविन गुप्ता | हजर |
| ११. | हिंगोली | श्री सदगुरू साईसेवा संस्थान | श्री साईप्रसाद कोत्तावार | हजर |

मा. पादुका दर्शन सोहळा छाननी समिती अध्यक्ष व सदस्य यांनी विविध राज्यातील उपस्थित प्रस्तावधारक / आयोजकांशी विविध मुद्यांवर चर्चा करून खालीलप्रमाणे निर्णय घेतलेले आहेत.

अ) सांगली, जिंतुर, हिंगोली या ठिकाणी आयोजीत करावयाच्या श्रींचे पादुका दर्शन सोहळयाबाबत संपूर्ण माहिती घेऊन पादुका दर्शन सोहळयाची तारीख त्यानंतर निश्चित करावी. तसेच तामिळनाडू राज्यातील करूर, मदुराई, तिरूपुर, इत्यादी ठिकाणी श्रींचे पादुका दर्शन कार्यक्रमांचे आयोजन करणेसाठी त्यांना पुढील बैठकीत एकत्रित बोलविण्यात यावे.

ब) मा. पादुका दर्शन सोहळा छाननी समितीने आयोजकांनी पाठविलेल्या प्रस्तावाची छाननी तथा आयोजकांशी चर्चा करुन खालील ठिकाणी पादुका दर्शन सोहळ्या कार्यक्रम आयोजीत करण्याचे निश्चित केले.

| अ.नं. | राज्य | शहर | आयोजक/ ट्रस्टचे / मंदिराचे नांव | मा. छाननी समिती मार्फत निश्चित करण्यात आलेली दिनांक व महिना | कि.मी. | प्रवासाचे साधन |
|---|---|---|---|---|---|---|
| माहे-ऑगस्ट-२०१८ | | | | | | |
| ०१. | महाराष्ट्र | सिन्नर | श्री सदगुरू चॅरिटेबल ट्रस्ट | दि.३० ऑगस्ट, २०१८ | ६५ | साईरथ |
| माहे-सप्टेंबर-२०१८ | | | | | | |
| ०२. | छत्तीसगड | रायपूर | श्री साई अनुराग सेवा समिती | दि. ०८ सप्टेंबर, २०१८ | ८७७ | साईरथ / विमान |
| ०३. | राजस्थान | भिलवाडा | शिव साई मंदिर, (श्री शिर्डी साईबाबा भक्त परिवार सेवा संस्था) | दि.२९ ते ३० सप्टेंबर,२०१८ | ६१८ | साईरथ/ विमान |
| माहे-ऑक्टोबर-२०१८ | | | | | | |
| ०४. | महाराष्ट्र | बोरीवली | श्री साई मंडळ, बोरीवली | दि.०६/१०/२०१८ रोजी (संध्या ४.०० ते रात्रौ ०९.०० पर्यंत) दि.०७/१०/२०१८ रोजी (सकाळी ०९.०० ते रात्रौ०७.००) | २५० | साईरथ |

मा. पादुका अर्ज छाननी समितीने निश्चित केलेल्या पादुका दर्शन सोहळ्याचे ठिकाणांची पूर्व पहाणी दौ-यामध्ये अथवा प्रत्यक्ष दौ-यामध्ये आयोजकांबाबत अथवा आयोजनाबद्दल प्रतिकुल अहवाल प्राप्त झाल्यास किंवा काही अपरिहार्य कारणांमुळे दौ-याची तारीख बदलावयाची गरज भासल्यास दौरा रद्द करण्याचे किंवा तारखांमध्ये बदल करण्याचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आले.

तरी मा. पादुका दर्शन अर्ज छाननी समितीच्या दि. १३/०८//२०१८ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्तातील शिफारसी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र. ५२८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.१३.०८.२०१८ रोजी झालेल्या मा.पादुका दर्शन सोहळा छाननी समिती ने खालील तक्तयात दर्शविले प्रमाणे श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष सन २०१८ चे कालावधीत माहे ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर -२०१८ या महिन्यामध्ये श्रींचे पादुका दर्शन सोहळयाचे आयोजन करणेस मान्यता देण्यात आली.**

| अ.नं. | राज्य | शहर | आयोजक/ ट्रस्टचे / मंदिराचे नांव | मा. छाननी समिती मार्फत निश्चित करण्यात आलेली दिनांक व महिना |
|---|---|---|---|---|
| माहे-ऑगस्ट-२०१८ | | | | |
| ०१. | महाराष्ट्र | सिन्नर | श्री सदगुरू चॅरिटेबल ट्रस्ट | दि.३० ऑगस्ट, २०१८ |
| माहे-सप्टेंबर-२०१८ | | | | |
| ०२. | छत्तीसगड | रायपूर | श्री साई अनुराग सेवा समिती | दि. ०८ सप्टेंबर, २०१८ |
| ०३. | राजस्थान | भिलवा | शिव साई मंदिर, (श्री | दि.२९ ते ३० सप्टेंबर,२०१८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | डा | शिर्डी साईबाबा भक्त परिवार सेवा संस्था) | |
| माहे-ऑक्टोबर-२०१८ | | | | |
| ०४. | महाराष्ट्र | बोरीवली | श्री साई मंडळ, बोरीवली | दि.०६/१०/२०१८ रोजी (संध्या ४.०० ते रात्रौ ०९.०० पर्यंत) दि.०७/१०/२०१८ रोजी (सकाळी ०९.०० ते रात्रौ०७.००) |

**तसेच मा.पादुका दर्शन सोहळा छाननी समितीचे शिफारशी नुसार दि. १४/०९/२०१८ ते दि. १७/०९/२०१८ याकालावधीत खालील तक्त्यात नमुद केल्या प्रमाणे श्रींचे पादुका दर्शन सोहळयाचे आयोजन करणेस मान्यता देण्यात आली.**

| अ.नं. | राज्य | शहर | आयोजक/ ट्रस्टचे / मंदिराचे नांव | मा. छाननी समिती मार्फत निश्चित करण्यात आलेली दिनांक व महिना | कि.मी. | प्रवासाचे साधन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | तमिळनाडू | श्रीरंगम | श्री साई फाउंडेशन | १४ सप्टेंबर २०१८ | १०६६ | साईरथ / विमान/ वाहनाव्दारे |
| २ | | करुर | शिर्डी साई चॅरिटेबल ट्रस्ट | १५ सप्टेंबर २०१८ | ७५ | |
| ३ | | त्रिरुपूर | शिर्डी साई पिठम ट्रस्ट | १६ सप्टेंबर २०१८ | ८० | |
| ४ | | कोइमतुर | शिर्डी साईबाबा देहोती | १७ सप्टेंबर २०१८ | ६५ | |

**तसेच पादुका दर्शन सोहळा शताब्दी वर्ष समाप्तीनंतरही भविष्यात पुढे सुरु ठेवावेत, असे ठरले.**

**(कार्यवाही-शताब्दी कक्ष प्रमुख)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०३ **श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव व श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कालावधीत आयोजित करावयाच्या सांस्कृतीक कार्यक्रमांचे कलाकार व त्यांचे मानधन निश्चित करणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :-**

मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६८२

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७५०

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०२/०२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ८१

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०७/०३/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. १५१

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर २०१८ रोजी (विजयादशमी) १०० वर्षे पूर्ण होत आहेत. श्री साईबाबा संस्थानच्यावतीने दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ हा कालावधी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष म्हणून साजरा करण्यात येत आहे. यासाठी शताब्दीचे संपूर्ण वर्षभरात वेगवेगळया धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक व प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

जेणेकरुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल यादृष्टीने कामकाज चालू आहे.

श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे प्रारुप वेळापत्रकास मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८.०९.२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र. ७५० अन्वये मान्यता मिळालेली असुन यामध्ये दि. १० ते १९ ऑक्टोबर २०१८ या कालावधीत विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करावेत असे ठरले आहे.

**विभागाचा अभिप्राय:-**श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव कालावधीतील कलाकार कार्यक्रम नेहमीचे प्रथेप्रमाणे साईनगर मैदानावर आयोजित करण्यात येतात. शताब्दी वर्षाची सांगता पुण्यतिथी उत्सवाने होणार असल्याने साईभक्तांची मोठ्या प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता असल्याने कलाकारांचे कार्यक्रमाची जागा निश्चित करावी लागणार आहे.

श्री साईबाबा सच्चरित पारायण सोहळ्यात सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते तथापि शासनाने राष्ट्रीय दुखवटा जाहीर केल्याने सदरचे कार्यक्रम रद्द करण्यात आले आहेत. परंतु कार्यक्रम रद्द झाल्याने निमंत्रीत कलाकारांनी शताब्दी वर्षात श्री साईबाबांची सेवा करण्याची संधी मिळावी असे दूरध्वनीवरुन विनंती केली आहे. त्यातील खालील नमुद केलेले काही नामंवत कलाकारांचे कार्यक्रम उपरोक्त कालावधीत आयोजित करता येतील.

| अ.नं. | कलाकाराचे नांव | ठिकाण | कार्यक्रम |
|---|---|---|---|
| १ | श्री प्रसाद कांबळी | मुंबई | धार्मिक - नाटक-देवबाभळी |
| २ | कुडाळेश्वर मित्रमंडळ, | कुडाळ | नाटक-दशावतारी |
| ३ | श्री मनहर उधास, | मुंबई | साई भजन |
| ४ | स्वर निनाद वाद्यवृद वसंतराव आजगांवकर | मुंबई | नाद विठ्ठल विठ्ठल |
| ५ | नक्षत्र वादय वृंद | मुंबई | परंपरा महाराष्ट्राची |
| ६ | श्री प्रमोद पवार | मुंबई | सामाजिक नाटक-अनन्या |
| ७ | कलापिनि कोमाकली कुमार गंधर्व यांच्या कन्या | देवास (म.प्र.) | भजन व अभंग |

याशिवाय खाली नमुद केलेल्या कलाकारांचेही कार्यक्रम आयोजित करता येतील.

| अ.नं. | कलाकाराचे नांव | ठिकाण | कार्यक्रम |
|---|---|---|---|
| १ | श्री राहुल देशपांडे / महेश काळे | मुंबई | भक्तीगीत व नाट्यगीत |
| २ | श्री हरीहरण | मुंबई | भक्तीगीत |
| ३ | श्री शिव मणी | मुंबई | इंटरनॅशनल ड्रम मास्टर – फ्युजन |
| ४ | श्री शंकर महादेवन | मुंबई | भक्तीगीत |
| ५ | श्री. एस.पी. बालसुब्रह्मण्यम | तमिळनाडु | भक्तीगीत |
| ६ | श्री सुखविंदर सिंग | मुंबई | भक्तीगीत |
| ७ | श्री अजय अतुल | मुंबई | भक्तीगीत, भावगीत, भजन संध्या |
| ८ | श्रीमती आशा भोसले | मुंबई | भक्तीगीत, भावगीत, भजन संध्या |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | श्री सुदेश भोसले | मुंबई | भक्तीगीत, भावगीत, भजन संध्या |
| १० | श्री साईबाबा - हिंदी नाटक | मुंबई | नाटक |
| ११ | श्रीमती अनुराधा पौडवाल | मुंबई | भजन संध्या |
| १२ | श्री सुरेश वाडकर | मुंबई | भजन संध्या |
| १३ | नितीन मुकेश | मुंबई | भजन संध्या |

उपरोक्त नावांशिवाय मा. व्यवस्थापन समितीने सुचविलेले कलाकार कार्यक्रम ही आयोजित करता येतील.

**प्रस्ताव:-** तरी श्रीसाईबाबा पुण्यतिथी उत्सव व श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कालावधीत आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी खालील बाबींवर निर्णय होणे आवश्यक आहे.

१) दि. १० ते १९ ऑक्टोबर २०१८ या कालावधीत आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी जागेची निश्चिती करणे.

२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८.०९.२०१७ रोजीचे सभेत ठरलेप्रमाणे दि. १० ते १९ ऑक्टोबर २०१८ या पुर्ण दहा दिवसाच्या कालावधीत सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करावेत किंवा कसे

३) मा. व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने श्री साईचरित्र पारायण कालावधीत आयोजित केलेल्या निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम घ्यावेत किंवा नव्याने कलाकार निश्चितीकरावी

४) निमंत्रीत कलाकारांचे मानधन निश्चित करणे

तरी श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव व श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कालावधीतआयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी उपरोक्त् नमुद बाबींवर धोरणात्मक निर्णय होणेसाठी सविनय सादर.

निर्णय क्र.५२९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव व श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१८ समारोप कालावधीत आयोजित करावयाच्या सांस्कृतीक कार्यक्रमाबाबत प्रसतावातील कलाकार हे किती मानधन घेणार हे विचारुन नामांकीत कलाकारांचे कार्यक्रम निश्चीत करुन मा. स्थानिक उपसमिती सभेपुढे प्रस्ताव सादर करावा, असे ठरले.** **(कार्यवाही- शताब्दी कक्ष प्रमुख)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०४ **आयकर विभागाकडून आलेल्या आर्थिक वर्ष २०१२-१३ चे फेर कर निर्धारण नोटीस बाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी चे आर्थिक व्यवहारांचे विहीत पध्दतीने वैधानिक लेखापरिक्षण करण्यात येऊन, वार्षिक कर विवरणपत्र भरण्यात येते. अशाप्रकारे आर्थिक वर्ष २०१२-१३ चे वार्षिक कर विवरणपत्र विहीत वेळेत दाखल करण्यात आले असुन, आयकर विभागाकडून त्याचे कर निर्धारण सुध्दा करण्यात आले आहे.

तथापी दि.०३.०८.२०१८ रोजीचे मा.उपआयुक्त (आयकर विभाग), पिरामल चेंबर, लालबाग मुंबई. यांनी आर्थिक वर्ष २०१२-१३ चे संबधीत फेर कर निर्धारणाकरिता आवश्यक कागदपत्रांची मागणी केली आहे. आर्थिक वर्ष २०१४-१५ कर निर्धारण करण्यात येऊन रु.१८३.८६ कोटी देय भरणेबाबत दि.३१.२१.२०१७ रोज कर निर्धारण आदेश करण्यात आला आहे, याप्रमाणे आर्थिक वर्ष २०१२-१३ चे फेर कर निर्धारण करण्याचे आयकर विभागाचे नियोजन यावरुन स्पष्ट होत आहे.

आर्थिक वर्ष २०१४-१५ संबधीत प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करण्यात आला होता. यावर मा.उच्च न्यायालय मुंबई येथे रीट याचिका दाखल करणे, जेष्ठ नामांकित विधिज्ञांचे नियुक्ती करणे, आवश्यकता भासल्यास आयकर लवादाकडे आयकर दाखल करणे तसेच समिती सदस्य ॲड. मोहन जयकर यांनी यासाठी समन्वय करणे असा निर्णय संमत झाला होता. त्याच प्रमाणे आर्थिक वर्ष २०१२-१३ चे फेर कर निर्धारण करणेकामी, कर निर्धारण आदेश झाल्यानंतर योग्य ती कार्यवाही करणेस मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

निर्णय क्र.५३० **यावर सविस्तर चर्चा करण्यात आली आर्थिक वर्ष २०१२-१३ व त्यापुढीलही वर्षा संबंधीत आलेल्या नोटीसी संदर्भात आवश्यकते नुसार फेर कर निर्धारण करणे, अपिल, आवश्यकतेनुसार मा. उच्च न्यायालयात याचीका दाखल करणेबाबत तसेच त्यासाठी कर सल्लागार, सी.ए., विधीज्ञांची नियुक्ती करणे, त्यांचे मानधन ठरविणेबाबत निर्णय घेण्याचे अधिकार समिती सदस्य ॲड मोहन जयकर यांना देण्यात यावे असे ठरले.**

तसेच व्हॅट कर वसुलीबाबतच्या नोटीशी विरुध्द मा.मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेली रिट याचीका औरंगाबाद खंडपीठाकडे वर्ग झाली असुन त्यासाठी औरंगाबाद येथील ॲडआर.एन.धोर्डे यांचेशी चर्चा झाली असुन त्यांना सर्व माहिती देण्यात आली आहे. असे मा.ॲड मोहन जयकर यांनी नमुद केले, तसेच ॲडआर.एन.धोर्डे यांना वकीलपत्र देणेबाबत सुचीत केले, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०५ **संस्थानमार्फत सन २०१८-१९ या वर्षभरात साजरे करणेत येणारे उत्सव तसेच उन्हाळा व पावसाळा कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था उभारणेकामी अंदाजे रक्कम रु. ६३,८६,७१८/- इतक्या अपेक्षित अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता देणे.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूद-** अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट- कलम (१) च्या खंड (ख) अन्वये “ रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा- अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करणे व पार पाडणे” या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये “ भक्तांना मंदिरात देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे” या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.”

**प्रस्तावना**:- संस्थान मार्फत वर्षभरात साजरे करणेत येणारे उत्सव तसेच दिपावली, नाताळ, उन्हाळा, पावसाळयाचे कालावधीत, तसेच संस्थान मार्फत वेळोवेळी आयोजित विविध कार्यक्रमाचे वेळी मंडप व्यवस्था केली जाते. याकामी ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप, बॅरेकेडींग, स्टेज, कनात, कमानी इ. अनुषंगीक व्यवस्था करणेत येते.

संस्थानमार्फत सन २०१७-२०१८ या कालावधीत साजरे करणेत येणारे उत्सव तसेच उन्हाळा व पावसाळयाचे कालावधीत मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी ठेकेदार ऋतूजा मंडप डेकोरेटर्स, औरंगाबाद यांना इकडील जा.नं.४४३० दि.१८/११/२०१७ रोजीचे कार्यादेशान्वये देणेत आले होते. ठेकेदार यांचा मंडप व्यवस्थेचा कालावधी दि.३०/०९/२०१८ पर्यंत आहे. करीता सन २०१८-२०१९ या वर्षभरात संस्थानमार्फत साजरे करणेत येणारे उत्सव, दिपावली, नाताळ तसेच उन्हाळा व पावसाळयाच्या कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणे आवश्यक आहे. सदर व्यवस्था करणेकामी येणा-या खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

०१) **श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०१८ निमित्त साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्थाः-**

**०१) एम.एस .पाईपकैच्या वापरुन वरील बाजूने ताडपत्री व आतिल बाजुने सुशोभित काडप असलेले मंडप.**

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण व तपशिल | परिमाण | कालावधी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | एम.एस .पाईपकैच्या वापरुन वरील बाजूने ताडपत्री व आतिल बाजुने सुशोभित काडप असलेले मंडप. | ९११७.०० चौ. फुट | १७/१०/२०१८ ते १९/१०/२०१८ अखेर ०३ दिवस | ४.०३ प्र.चौ. फुट प्र. दिवस | १,१०,२२४.५३ |
| २. | पाईप / बांबु व गोल्टे वापरुन वरील बाजूने ताडपत्री व आतिल बाजुने सुशोभित कापड असलेले मंडप. | ६६३३५.०० चौ. फुट | | ४.०३ प्र.चौ. फुट प्र. दिवस | ८,०१,९९०.१५ |
| ३. | साईनगर मैदानावर कलाकारांचे कार्यक्रमासाठी स्टेज व्यवस्थाः- | ६००. चौ. फुट | | २७.५० प्र.चौ. फुट प्र. दिवस | ४९,५००.०० |
| ४. | दर्शन रांगेसाठी व श्री साईप्रसादालय येथे तिकीट रेलिंगसाठी बॅरेकेटींग करणेः | ३००० रनिंग फुट | | १४.६६ प्र.र. फुट प्र. दिवस | १,३१,९४०.०० |
| | | | | **एकूण रक्कम रु.** | **१०,९३,६५५.००** |

०२) **दिपावली सुट्टीचे कालावधीत तसेच डिसेंबर २०१८ मधील नाताळ सुट्टी व नववर्षा निमित्ताने साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्थाः-**

अ) दिपावली मंडप

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण व तपशिल | परिमाण | कालावधी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप उभारणे | १३,०५५.०० चौ. फुट | दि.०७/११/२०१८ ते २१/११/२०१८ अखेर १५ दिवस. | १.०२ प्र.चौ. फुट प्र. दिवस | १,९९,७४१.५० |
| | | | | एकूण रक्कम रु. (अ) | १,९९,७४१.०० |

ब) नाताळ मंडप

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण व तपशिल | परिमाण | कालावधी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप (एम.एस. पाईप व कैच्याचे स्ट्रक्चर असलेले ) | १४३४३.०० चौ. फुट | दि.२५/१२/२०१८ ते दि.०२/०१/२०१९ अखेर ०९ दिवस. | १.४७ प्र.चौ. फुट प्र. दिवस | १,८९,७५८.०० |
| २. | श्री साईप्रसादालयातील भोजन प्रतिक्षालय रेलींगला संरक्षण कठडे बांधणे कामी बांबुची ४ फुटी उंचीची बॅरेकेडींग करणे. | ६५१ र. फुट | | ४.९० प्र.र. फुट प्र. दिवस | २८,७०९.१० |
| ३. | साईनगर मैदानाकडे जाणारा रस्त्यावर स्वागत कमान उभारणे. (१ दिवस) साईज -२० 'x१५ ' | ०१ नग | ०१ दिवस | १६५०/- प्र. नग | १,६५०.०० |
| ४. | साईनगर मैदान येथे शिर्डी महोत्सव कार्यक्रमासाठी ग्रीनरुमसह स्टेजची उभारणी करणे ( १ दिवस) साईज - ३० 'x२० ' | ६००.०० चौ. फुट | ०१ दिवस | २७.५० प्र.चौ. फुट प्र. दिवस | १६,५००.०० |
| | | | | एकूण रक्कम रु. (ब) | २,३६,६१७.०० |
| | | | | एकूण रक्कम रु. (अ+ब) | ४,३६,३५८.०० |

०३) श्री रामनवमी उत्सव २०१९ निमित्त करावयाची व्यवस्थाः-

(अ) मंदिर परिसर, साई धर्मशाळा तसेच पालखी स्वागतासाठी करावयाचे मंडप, स्टेज, बॅरेकेडींग इ. व्यवस्था करणे.

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण व तपशिल | परिमाण | कालावधी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | मंगल कार्यालय, लेंडीबाग तसेच पालखी स्वागतासाठी मंडप, कनात व बिछायतीसह उभारणे, | ३३९०.०० चौ. फुट | दि.१२/०४/२०१९ ते दि.१४/०४/२०१९ अखेर ०३ दिवस | ४.०० प्र.चौ. फुट प्र. दिवस | ४०,६८०.०० |
| २. | साईनगर मैदानावर कलाकारांचे कार्यक्रमासाठी ३०x२० साईजचे स्टेज व इतर व्यवस्था करणे. | ६००.०० चौ. फुट | | २७.५० प्र.चौ. फुट प्र. दिवस | ४९,५००.०० |
| ३. | दर्शन व भोजन व्यवस्थेसाठी बॅरेकेडींग व्यवस्था. | ११००.०० र. फुट | | १४.६६ प्र.र. फुट प्र. दिवस | ४८,३७८.०० |
| ४. | कुस्ती ग्राऊंडवर १ दिवसाकरीता मंडप उभारणे. | ४७२५.०० चौ. फुट | १ दिवस | २.६४ प्र.चौ. फुट प्र. दिवस | १२,४७४.०० |
| | | | | एकूण रक्कम रु. (अ) | १,५१,०३२.०० |

(ब) मुंबई येथून पायी पालखी घेवून येणारे साईभक्त यांचे सोयीसाठी कापडी / शामियाना मंडप, कनात, बिछायत तसेच विद्युतीकरणासह व्यवस्था करणे.

१) मुंबई ते सिन्नर मार्गावर

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण व तपशिल | परिमाण | कालावधी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | मुंबई ते शिर्डी मार्गावर खर्डी गोलभान, कसारा बायपास, लतिफवाडी पोलीसस्टेशन, घोटी येथे कापडी मंडप, कनात व बिछायतीसह तसेच जनरेटर, लाईट व्यवस्थेसह. | ३१५९०.०० चौ. फुट | दि.०६/०४/२०१९ ते दि.१०/०४/२०१९ अखेर ०५ दिवस | १.१० प्र.चौ. फुट प्र. दिवस | १,७३,७४५.०० |
| २. | सिन्नर ते वावी मार्गावर सिन्नर एमआयडीसी, खोपडी दत्त मंदिराजवळ, पांगरी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे जागेत व वावी येथे मंडप, कनात व बिछायतीसह तसेच जनरेटर, लाईट व्यवस्थेसह. | ७६,६४८.०० चौ. फुट | दि.७/०४/२०१९ ते दि.११/०४/२०१९ अखेर ०५ दिवस | १.१० प्र.चौ. फुट प्र. दिवस | ४,२१,५६४.०० |
| अ.नं. | मंडपाचे ठिकाण व तपशिल | परिमाण | कालावधी | दर | रक्कम |
| ३. | वावी ते शिर्डी मार्गावर पाथरे वनराई हॉटेलजवळ , श्री चक्रधर स्वामी महानूभाव मंदिर, दुशिंगवाडी जिल्हा परिषद शाळेमध्ये, मलढोन फाटा श्री. पवार यांचे जागेमध्ये, झगडे फाटा, येथे मंडप, कनात व बिछायतीसह तसेच जनरेटर, लाईट व्यवस्थेसह. | २५,३२३.५० चौ. फुट | दि.०८/०४/२०१९ ते दि.१२/०४/२०१९ अखेर ०५ दिवस. | १.१० प्र.चौ. फुट प्र. दिवस | १,३९,२७९.०० |
| | | | | एकूण – (ब) | ७,३४,५८८.०० |
| | | | | **एकूण रक्कम रु. (अ+ब)** | **८,८५,६२०.००** |

०४) <u>सन २०१९ मधिल उन्हाळयाच्या कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्थाः-</u>
(ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप (बांबु बल्ल्याचे स्ट्रक्चर असलेले ) उभारणे.

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण व तपशिल | परिमाण | कालावधी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| अ) | मंदिर परिसर, साई प्रसादालय व भक्तनिवास (५०० रुम) परिसरात ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप (बांबु बल्ल्याचे स्ट्रक्चर असलेले ) उभारणे. | ५५,९३५.०० चौ. फुट | दि.०१/०३/२०१९ ते दि.१५/०६/२०१९ अखेर एकूण १०७ दिवस | ०.२० प्र.चौ. फुट प्र. दिवस | ११,९७,००९.०० |
| ब) | समाधि मंदिर उत्तर बाजू चावडीगेट ते नगरद्वार गेटपर्यंत एमचे पाईप व कैच्यां.एस. .र असलेले कापडी मंडप उभारणेक्चस्ट्र (१८’ उंचीचा) | ६५६७.०० चौ. फुट | | ०.२० प्र.चौ. फुट प्र. दिवस | १,४०,५३३.८० |
| | | | | **एकूण रक्कम रु. -** | **१३,३७,५४३.००** |

०५) <u>श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१९ निमित्त साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्थाः-</u>

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण व तपशिल | परिमाण | कालावधी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | एम.एस .पाईपकैच्या वापरुन वरील बाजूने ताडपत्री व आतिल बाजुने सुशोभित काडप असलेले मंडप. | १०६०८.०० चौ. फुट | दि.१५/०७/२०१९ ते दि.१७/०७/२०१९ अखेर ३ दिवस | ४.०३ प्र.चौ. फुट प्र. दिवस | १,२८,२५०.७२ |
| २. | पाईप/ बांबु व गोल्टे वापरुन वरील बाजूने ताडपत्री व आतिल बाजुने सुशोभित कापड असलेले मंडप. | ६७८३.०० चौ. फुट | | ४.०३ प्र.चौ. फुट प्र. दिवस | ८२,००,६.४७ |
| ३. | पालखी पदयात्री साईभक्तांचे निवासस्थानी ताडतत्रीछत, कनात व बिछाईत इ. व्यवस्थेसह | ७२००.०० चौ. फुट | | ४.०३ प्र.चौ. फुट | ८७,०४८.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | शिंगवे नाईक, गुहा ता. राहुरी, निर्मळ पिंप्री ता. राहाता येथे मंडप उभारणी करणे. | | | प्र. दिवस | |
| ४. | दर्शन रांगेसाठी व श्री साईप्रसादालय येथे तिकीट रेलिंगसाठी बॅरेकेटींग करणेः | ६३५ रनिंग फुट | | १४.६६ प्र.र. फुट प्र. दिवस | २७,९२७.३० |
| | | | | **एकूण रक्कम रु.** | **३,२५,२३२.००** |

**०६) <u>सन २०१९ मधिल पावसाळयाच्या कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्थाः-</u>**

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण व तपशिल | परिमाण | कालावधी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| अ) | मंदिर परिसर, साई प्रसादालय व भक्तनिवास (५०० रुम) परिसरात ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप उभारणे. (बांबु बल्ल्याचे स्ट्रक्चर असलेले) | ३१४५३ चौ. फुट | ०१/०७/२०१९ ते ३०/०९/२०१९ अखेर एकूण ९२ दिवस | ०.२४ प्र.चौ. फुट प्र. दिवस | ६,९४,४८२.२४ |
| ब) | समाधी मंदिर उत्तर बाजूस गेट नं.३ ते गेट नं.४ पर्यत ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप उभारणे. (एम.एस.पाईप व कैच्यां चे स्ट्रक्चर) | ६३९०.०० चौ. फुट | | ०.२४ प्र.चौ. फुट प्र. दिवस | १,४१,०९१.२० |
| | | | | **एकूण रक्कम रु. -** | **८,३५,५७३.००** |

**०७) <u>सन २०१८-२०१९ मधिल उत्सव व सुटयांचे कालावधीत संस्थान परिसरात साईभक्तांचे तात्पुरते निवास व्यवस्थेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्थाः-</u>**

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण व तपशिल | परिमाण | कालावधी | दर प्र.चौ.फुट | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| | **एम.एस.पाईप कैच्या / बांबु बल्यांचे स्ट्रक्चर सुशोभित कापड असलेले मंडप उभारणे. (बिछायत व कनातीसह)** | | | | |
| १) | साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथे 45’ x 325’ , साई धर्मशाळा येथे 90’ x 60’ – 2 No., 90’ x 35’ – 1 No. जुने प्रसादालय येथील मैदानावर 150’ x 60’ x 3 Nos. | ५५५७५ चौ. फुट | ०३ दिवसांकरीता | ७.०० | ३,८९,०२५.०० |
| | | | ०५ दिवसांकरीता | ८.५० | ४,७२,३८७.०० |
| | | | ०८ दिवसांकरीता | ११.०० | ६,११,३२५.०० |
| | | | | **एकूण रक्कम रु. -** | **१४,७२,७३७.००** |
| | | | | **एकूण पुर्णांकीत रक्कम रु. (१ ते ७)** | **६३,८६,७१८.००** |

उपरोक्त प्रमाणे संस्थान मार्फत वर्षभरात साजरे करणेत येणारे उत्सव, उन्हाळयाच्या व पावसाळयाच्या कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता उन, वारा, पाऊस यापासून संरक्षण होणेकामी संस्थान परिसरात तसेच पायी पालखी घेऊन येणारे साईभक्तांचे निवास व्यवस्थेकरीता तात्पुरते पालखी मार्गावर मंडप व्यवस्थेकरीता रक्कम रु.६३,८६,७१८/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

तसेच वर्षभरात साईभक्तांचे व इतर विभागाचे मागणीनुसार धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमासाठी तसेच उदघाटने इ. करीता आवश्यकतेनुसार मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करावयाची झाल्यास ती याच मंजूर दराने करुन घेता येईल.

प्रस्ताव-संस्थान मार्फत वर्षभरात साजरे करणेत येणारे उत्सव, उन्हाळयाच्या व पावसाळयाच्या कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर व्यवस्था तसेच उत्सव व सुटयांचे कालावधीत तात्पुरते निवास व्यवस्था करणेकामी येणारे अंदाजे रक्कम रु.६३,८६,७१८/- मात्रचे खर्चास व सदर व्यवस्थेसाठी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन ई –निविदा मागविणेस मान्यतेकरीता सदरहू प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५३१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमार्फत सन २०१८-१९ या वर्षभरात साजरे करणेत येणारे उत्सव तसेच उन्हाळा व पावसाळा कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था उभारणेकामी अंदाजे रक्कम रु. ६३,८६,७१८/- इतक्या अपेक्षित अंदाजपत्रकीय खर्चास तत्वत: मान्यता देण्यात आली. तसेच पुण्यतिथी उत्सव २०१८ साठी सुधारीत अंदाजपत्रक तयार करणेत यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही- कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

आयत्या वेळेचा

विषय नं.०६ **सिटी स्कॅन व एम.आर.आय.मशिन स्कॅनिंगचे दराबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा हॉस्पीटलकरीता मे. विप्रो जिई हेल्थकेअर प्रा.लि. बंगलोर यांना जा.क्र.१००६/२०१८ दि.१५/०६/२०१८ नुसार १२८ स्लाईस सिटी स्कॅन मशिन व जा.क्र.१००३/२०१८ दि.१५/०६/२०१८ नुसार 3T एम.आर. आय मशिन करीता पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. तसेच नविन मशिन बसविण्याकरीता सध्याची रेडिओलॉजी विभागात अद्यावतीकरण करण्यासाठी उपरोक्त पुरवठा आदेशात टर्न की कामाचे देखील कार्यादेश देण्यात आले आहेत. सदर टर्न की काम पुर्ण करुन नविन मशिन बसविण्यासाठी कंपनीला वेळापत्रकानुसार अंदाजे साडे तीन महिने म्हणजेच दि.०५/१२/२०१८ पर्यत कालावधी लागेल. सदर कालावधीत श्री साईबाबा हॉस्पीटलमधीलसिटी स्कॅन व एम.आर.आय स्कॅनिंगच्या सुविधा उपलब्ध नसतील. त्यामुळे सदर कालावधीत रुग्णांना शिर्डी परिसरातील जवळच्या सिटी स्कॅन व एम.आर.आय सेंटरला स्कॅनिंगकरीता पाठविणे आवश्यक आहे.

त्यानुसार कोपरगांव येथील गणपती सिटी स्कॅन सेंटर व कोपरगांव एम.आर.आय सेंटर यांचे सिटी स्कॅन व एम.आर.आय स्कॅनिंगचे दर तसेच प्रवरा मेडीकल ट्रस्ट यांचेकडून सिटी स्कॅन व एम.आर.आय स्कॅनिंगचे दर मागविण्यात आले आहे. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

CT-SCAN

| Sr. No | Test Name | ShriSaibaba Hospital | Pravara Medical Trust, Loni Plain/Contrast | Ganpati Scan Centre, Kopargaon |
|---|---|---|---|---|
| 1 | Brain | 1350 | 1200 | 1800 |
| 2 | Brain P+C | 1550 | 1700 | 2800 |
| 3 | Brain 3D face | 2010 | 1600 | - |
| 4 | 3D Face | 1550 | 2000 | 3200 |
| 5 | PNS | 1550 | 1200 | 3200 |
| 6 | Temporal Bone | 1550 | 1600/2100 | 3200 |
| 7 | Thorax (P or P+C) | 2200 | 1600/2750 | 3800 |
| 8 | Abdomen (P or P+C) | 2750 | 1600/2100 | 3800 |
| 9 | Pelvis (P or P+C) | 2750 | 2100 | - |
| 10 | Kub Plane | 2750 | 1600 | - |
| 11 | IVP | 5500 | 2850 | - |
| 12 | Abdomen & Pelvis (P or P+C) | 5500 | 1600 | 5800 |
| 13 | Neck (P or P+C) | 2200 | 1600/2100 | 3800 |
| 14 | Coronary Angio | 2750 | 2850 | - |
| 15 | Peripheral Angio Upper or Lower Limb | 5500 | 2750 | - |
| 16 | Aortogram | 5500 | 2850 | - |
| 17 | Pulmonary Angio | 2750 | 2750 | - |
| 18 | Brain Angio | 2750 | 2750 | - |
| 19 | Spine ( Single spine) | 2750 | 1600/2300 | - |
| 20 | Spine with Screening of whole spine | 5500 | 1600 | - |
| 21 | Joint (Any) | 2450 | 1600/2100 | - |

M.R.I

| Sr. No | Test Name | ShriSaibaba Hospital, Shirdi. | Pravara Medical Trust, Loni | Kopargaon MRI Centre, Kopargaon |
|---|---|---|---|---|
| 1 | Screening Brain | 1100 | 2000(Single Part) | 1800 |
| 2 | Brain | 2750 | 500(Addl.Region) | 2750 |
| 3 | Brain (P+C) | 3300 | | 3500 |
| 4 | Brain Angiography | 3300 | | 3300 |
| 5 | Brain Vengfiography | 3300 | | 3300 |
| 6 | Brain with Screening of Whole | 3850 | | 4500 |
| 7 | Brain Orbit | 2750 | | 2750 |
| 8 | Only Angio (Head Neck) | 1100 | | 1500 |
| 9 | Only Veno | 1100 | | 1500 |
| 10 | Brain with CISS | 2750 | | 2750 |
| 11 | Brain with Pitutary | 3850 | | 3850 |
| 12 | Brain with Spectroscopy | 3850 | | 3850 |
| 13 | Orbit | 2750 | | 2750 |
| 14 | Screening of Whole Spine | 1100 | | 1800 |
| 15 | Screening of Whole Spine & Screening Brain | 1650 | | 3500 |
| 16 | Screening of Whole Spine & Screening Pelvis | 1650 | | 3000 |
| 17 | Screening Brain Angio | 1650 | | 2750 |
| 18 | Screening Brain Veno | 1650 | | 2750 |
| 19 | Lumbo – Sacral Spine | 2750 | | 2750 |
| 20 | Lumbo – Sacral Spine with SCR of Whole Spine | 3300 | | 3300 |
| 21 | Cervical Spine | 2750 | | 2750 |
| 22 | Cervical Spine with SCR of Whole Spine | 3300 | | 3300 |
| 23 | Dorso Lumber Spine | 2750 | | 2750 |
| 24 | Dorso Lumber | 3300 | | 3300 |

| Sr. No | Test Name | ShriSaibaba Hospital, Shirdi. | Pravara Medical Trust, Loni | Kopargaon MRI Centre, Kopargaon |
|---|---|---|---|---|
| | Spine with SCR of Whole Spine | | | |
| 25 | Abdomen | 3300 | | 3300 |
| 26 | Pelvis | 3000 | | 3000 |
| 27 | Abdomen & Pelvis | 3850 | | 3850 |
| 28 | Brachial Plexus | 3300 | | 3300 |
| 29 | CV Junction | 2750 | | 2750 |
| 30 | Chest | 3000 | | 3000 |
| 31 | Fistulagram | 3850 | | 3850 |
| 32 | Joint ( Any) | 3300 | | 3300 |
| 33 | Leg | 3300 | | 3300 |
| 34 | MRCP | 3850 | | 3850 |
| 35 | Neck | 3300 | | 3300 |
| 36 | Paranasal Sinuses | 2750 | | 2750 |
| 37 | Perianal Region | 3850 | | 3850 |
| 38 | Contrast ( Any) | 550 | | 750 |

उपरोक्तप्रमाणे शिर्डी परिसरात उपलब्ध असलेल्या सी.टी स्कॅन व एम.आर. आय स्कॅनिंग सेंटरचे दर आहेत. श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये उपरोक्त स्कॅनिंगकरीता बाहयरुग्ण विभागातील रुग्ण त्यांचे इच्छा व सुविधानुसार स्कॅनिंगकरीता उपरोक्त दोन सेंटरपैकी कुठेही जाऊ शकतात. परंतु श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये दाखल झालेल्या अंतर्गत रुग्णांना ऑपरेशनपुर्व व पश्चात तसेच इतर अंतर्गत रुग्णांना निम्नत्तम दर असलेल्या प्रवरा मेडीकल ट्रस्ट, लोणी येथे स्कॅनिंगकरीता पाठविता येईल. तसेच महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य अंतर्गत येणा-या रुग्णांना तेथे जाणेयेणे करीता मोफत ॲम्बूलन्स देणे व स्कॅनिंगच्या दरा इतकी रक्कम प्रती महिना प्रवरा मेडीकल ट्रस्ट लोणी यांना अदा करता येईल असे मत आहे.

तरी उपरोक्तपैकी सिटी स्कॅन व एम.आर.आय स्कॅनिंगचे प्रवरा मेडीकल ट्रस्ट लोणी यांचे दर निम्नत्तम असुन त्यांचेकडे श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये दाखल झालेल्या अंतर्गतरुग्णांना स्कॅनिंग करण्यासाठी पाठविण्यास व अंतर्गत रुग्णांपैकी महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य अंतर्गत येणा-या रुग्णांना तेथे जाणे येणेकरीता मोफत ॲम्बूलन्स देणेस व प्रवरा मेडीकल ट्रस्ट लोणी यांना स्कॅनिंगचे दर प्रति महिना अदा करणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीपुढे अवलोकनार्थ सादर.

निर्णय क्र.५३२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सिटी स्कॅन व एम.आर.आय स्कॅनिंगचे प्रवरा मेडीकल ट्रस्ट लोणी यांचे दर निम्नत्तम असुन त्यांचेकडे श्री साईबाबा हॉस्पीटल मध्ये दाखल झालेल्या अंतर्गतरुग्णांना स्कॅनिंग करण्यासाठी पाठविण्यास व अंतर्गत रुग्णांपैकी महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत येणा-या रुग्णांना तेथे जाणे येणे करीता मोफत ॲम्बुलन्स देणेस व प्रवरा मेडीकल ट्रस्ट लोणी यांना स्कॅनिंगचे दर प्रति महिना अदा करणेस मान्यता देण्यता आली, तसेच यासाठी प्रत्येक महिन्याला येणाऱ्या खर्चाचा तपशिल व्यवस्थापन समितीपुढे सादर करणेत यावा, असे ठरले. (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)**

---

**आजचे व्यवस्थापन समिती सभेमध्ये मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळी खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७ निर्णय क्र.५३३ नुकत्याच केरळ राज्यात आलेल्या अतिवृष्टीमुळे राज्यातील जनतेवर नैसर्गिक संकट कोसळून मोठया प्रमाणात जिवित व आर्थिक हानी झालेली आहे, मानवतेच्या दृष्टीकोणातून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या वतीने मदत म्हणून रु. ५ कोटी (अक्षरी रुपये पाच कोटी मात्र) इतकी रक्कम शासनाच्या पूर्व मान्यतेने 'मुख्यमंत्री केरळ पुरग्रस्त सहायता निधी' (Chief Minister Kerala Flood Relief Fund) यांचेकडे जमा करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०८ निर्णय क्र.५३४ श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटल मधील जे डॉक्टर्स ड्युटी व्यतिरिक्त बाहेर खाजगी प्रॅक्टीस करतात अशा डॉक्टरांचा अहवाल पुढील सभेपुढे सादर करण्यात यावा.

श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटल मधील दैनंदिन प्रशासकीय कामकाजात गैरशिस्त वर्तन करणा-या कर्मचा-या विरुध्द अनुक्रमे डॉ. विजय नरोडे, व डॉ. मैथीली पितांबरे, यांनी योग्य ती कार्यवाही करावी. (कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पीटल , श्री साईनाथ रुग्णालय)

-------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

आयत्या वेळेचा

विषय नं.०९ निर्णय क्र.५३५ 'साई महिमा ' या कार्यक्रमासाठी साई आश्रम येथील ॲम्पिथिएटरची जागा Immersity Info Tech. Pvt.Ltd., Mumbai या कंपनीस B.O. तत्वावर देणेबाबतचा करारनामा मसुद्यास शासनाने मान्यता दिलेली असून Immersity Info Tech. Pvt.Ltd., Mumbai यांनी तयार केलेल्या करारनाम्याच्या मसुद्याप्रमाणे करारनामा करावा अशी मागणी केलेली आहे. यावर शासनाने मान्यता दिलेला मसुदा व Immersity Info Tech. Pvt.Ltd., Mumbai यांनी दिलेला मसुदा हे दोन्हीही करारनामा मसुदा शासनाकडे पाठवून मार्गदर्शन घ्यावे. (कार्यवाही- ध्वनिक्षेपन विभागप्रमुख)

-------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

वरील निर्णय क्र.५०६ ते ५३५ सर्वानुमते घेण्यात आले.

यानंतर सायंकाळी ०६.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| श्रीमती रुबल अग्रवाल (भा.प्र.से.) | (सुरेश हावरे) |
| मुख्यकार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.